## पवारांना रुग्णालयातून डिस्चार्ज

**पुणे :** राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या प्रकृतीत सुधारणा होत असल्याने त्यांना शनिवारी रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला आहे. ते पुढचे काही दिवस पुण्यातील घरी विश्रांती घेणार असल्याची माहिती आहे. शरद पवार यांना खोकला आणि इतर काही व्याधींमुळे पुण्यातील रुबी हॉल रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. गेले पाच दिवस त्यांच्यावर उपचार सुरु होते. आता त्यांच्या प्रकृती सुधारणा होते आहे. त्यामुळे डॉक्टरांनी त्यांना घरी विश्रांती घेण्याच्या सल्ला दिला आहे. दरम्यान, शरद पवार यांच्या छातीत संसर्ग झाला होता. त्यामुळे त्यांना खोकल्याचा त्रास होत होता. त्यामुळे त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं.


# कृषीवल

रायगड, रविवार, दि. १५ फेब्रुवारी २०२६

किंमत ४ ₹


## बॅलेट पेपरवर काँग्रेसची बाजी

**नवी दिल्ली :** तेलंगणातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ईव्हीएमऐवजी बॅलेट पेपरवर घेण्यात आल्याने निकालांकडे देशाचे लक्ष लागले होते. या पार्श्वभूमीवर सत्ताधारी काँग्रेस पक्षाने प्रभावी कामगिरी करत ११६ पैकी ७० नगर परिषदांमध्ये स्पष्ट बहुमत मिळवले, तर सातपैकी चार महानगरपालिकांवरही विजय मिळवला. नगर परिषदांच्या २,९९५ प्रभागांपैकी काँग्रेसने १,५३७ जागा जिंकल्या. भारत राष्ट्र समितीला ७८१, तर भाजपाला ३३६ जागांवर समाधान मानावे लागले. मुख्यमंत्री रेवनाथ रेड्डी यांच्या नेतृत्वाखालील सरकारसाठी हा निकाल बळकटी देणारा मानला जात आहे.

**वेधक**

## ‘व्हॅलेंटाईन’लाच प्रेमाचा अंत

**नवी दिल्ली :** व्हॅलेंटाईन डेच्या दिवशी नोएडामध्ये कारमध्ये तरुण आणि तरुणीचा मृतदेह सापडल्याची भयंकर घटना समोर आली आहे. कारमध्ये दोघांचे मृतदेह सापडल्यानंतर पोलीस तपासात असं समोर आलं आहे की, दोघेही गेल्या १५ वर्षांपासून रिलेशनशिपमध्ये होते आणि त्यांच्यात लग्नावरून वाद सुरू होता. मिळालेल्या माहितीनुसार, रेखा असं मृत्यू झालेल्या तरुणीचं नाव असून, ती नोएडा सेक्टर-५८ परिसरातील रहिवासी होती. सुमित असं मुलाचं नाव असून, तो दिल्लीतील त्रिलोकपुरीचा रहिवासी होता. हे दोघेही दीर्घकाळापासून एकमेकांच्या संपर्कात होते आणि रिलेशनशिपमध्ये होते. दोघेही एक दिवसापूर्वीच आपापल्या घरातून बेपत्ता झाले होते, असे पोलीस तपासात समोर आले आहे.

# नार्वेकरांना पळवलं?

## शेतकरी नडला, जमीन लाटण्याचा प्रयत्न फसला?

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

**सत्ता मिळाली की कायदेही आपल्या सोयीने वाकवायचे, असा प्रश्न उपस्थित करणारी धक्कादायक चर्चा सध्या अलिबाग तालुक्यात रंगत आहे. एका सर्वसामान्य शेतकऱ्यांनी स्वत:च्या जागेत बेकायदेशीरपणे येणारे विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांच्यासह त्यांच्या सहकाऱ्यांनाही चालते केल्याचा व्हिडिओ सध्या सर्वत्र व्हायरल होत आहे. या प्रकरणामुळे लोकशाही व्यवस्थेत सर्वसामान्य नागरिकांना नियमांच्या चौकटीत अडकवले जाते; मात्र सत्ताधाऱ्यांसाठी वेगळीच मोजपट्टी वापरली जाते का, अशी संतप्त प्रतिक्रिया स्थानिकांमधून उमटत आहे. म्हात्रोळी परिसरातील जमीन व्यवहार आणि त्यानंतर सुरू झालेल्या कथित मोजणीच्या हालचालींमुळे प्रशासनाच्या निष्पक्षतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.**



अलिबाग तालुक्यातील जमिनींचे भाव सध्या गगनाला भिडले आहेत. सेलिब्रिटींसह राजकीय नेतेही अलिबागमध्ये जमिनी खरेदी करण्यामध्ये अग्रेसर असल्याचे अनेकदा दिसून आले आहे. जमिनींच्या वाढत्या भावामुळे सत्ताधारी पक्षातील काही नेत्यांनी तालुक्यातील शेतकऱ्यांना आमिष दाखवून व वेळप्रसंगी दबाव आणून कवडीमोल किमतीत हजारो एकर जागा विकत घेतली असल्याचे अलीकडेच समोर आले. तो सत्ताधारी नेता कोण, हा प्रश्न संबंध अलिबागकरांना पडला होता.

अशातच गुरुवारी विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांचा जागेसंदर्भातील व्हिडिओ व्हायरल झाला आणि अलिबागकरांच्या मनात संशय निर्माण झाला. कालपासून व्हायरल झालेल्या व्हिडिओमागील नेमकं सत्य काय? व्हिडिओ तंत्रज्ञानाचा वापर करुन बनविला आहे की खरा आहे, हे ‘कृषीवल’च्या टीमने जाणून घेतलं. त्यातूनच नार्वेकरांचा तो व्हिडिओ खरा असल्याचे •> पान २ वर

### नार्वेकरांच्या नावावर किती जमिनी?

म्हात्रोळी येथे ॲड. राहुल नार्वेकर यांचा भाऊ मकरंद नार्वेकर यांच्या नावाने १.८६ हेक्टर जागा, तर पत्नी सरोजिनी नार्वेकर यांच्या नावाने ६.२२.४० हेक्टर जागा यापूर्वीच खरेदी करण्यात आली आहे.

> “कोकणातील जमिनी गुजरातमधील गुंतवणूकदारांच्या फायद्यासाठी ताब्यात घेतल्या जात आहेत. महसूल यंत्रणेवर दबाव टाकून जमिनीचे व्यवहार करण्यात येत आहे. कोकणाला पैशांच्या मोहापायी गुजरात बनवण्याचा प्रयत्न सुरू आहे. विधानसभा अध्यक्षांनी घटनात्मक पदाची मर्यादा विसरुन जमीन व्यवहांत हस्तक्षेप करणे अत्यंत गंभीर बाब आहे. सत्तेचा वापर करुन स्थानिकांवर दबाव टाकला जात असेल, तर तो लोकशाहीवरील आघात आहे. राज्य सरकारने सामान्य शेतकरी व स्थानिकांच्या हक्कांचे संरक्षण करावे.”
>
> – खा. संजय राऊत

### ‘तो’ सत्ताधारी नेता कोण?

अलिबाग तालुक्यातील हजारो एकर जागा घेणारा तो सत्ताधारी नेता कोण? अलिबाग तालुक्यातील हजारो एकर जागा घेणारा तो सत्ताधारी नेता कोण? याबाबतचे पुरावे ‘कृषीवल’च्या हाती आले असून, लवकरच लँड डिलिंग करणारे आणि बेछूटपणे जागा खरेदी करणाऱ्या सत्ताधारी नेत्यांचे पितळ उघडे पडणार आहे. खारेपाटासह मांडवा, रेवस, बोडणी, मिळकतखार, म्हात्रोळी, झिराड, वाघ्रण आदी ठिकाणी कोणता सत्ताधारी नेता जमिनीचे व्यवहार करीत आहे, साठेकरार कसे झाले आहेत, दलालांची रखडलेली टक्केवारी याबाबतची माहितीही ‘कृषीवल’च्या हाती आली असून, कोणत्याही शेतकऱ्याला त्यांच्या जागेबाबत कसलीही तक्रार असल्यास आमच्याशी संपर्क साधा. तुमचे नाव कायम गुलदस्त्यात राहील, ही जबाबदारी आमची राहील.

### नार्वेकरांचे व्यवहार सुरुच!

राहुल नार्वेकर यांना अलिबाग तालुक्यातील म्हात्रोळी गावात सेजल शहा यांची जागा खरेदी करायची आहे. अडीच एकर जागा खरेदी करण्याचा व्यवहार सुरू होता. शुक्रवारी राहुल नार्वेकर हे जागा मोजण्यासाठी तिथे पोहोचले होते. त्यांच्यासोबत जागा मोजणी करणारे कर्मचारीही होते. सेजल शहा यांच्या जागेला लागून शेतकऱ्याची जागा आहे. मोजणी करताना लगतच्या जागा मालकांना नोटीस देणे बंधनकारक असतानाही मोजणीची कोणतीही नोटीस न देता राहुल नार्वेकर हे मोजणी करीत होते, असे समजते. या कारणावरून शेतकऱ्यांनी आक्रमक पवित्रा घेत जाब विचारला असता त्यावरून बाचाबाची झाली, अशी चर्चा आहे.

## विमानतळावरुन शेतकरी आक्रमक


**पुणे :** पुरंदर तालुक्यातील विमानतळ प्रकल्पामुळे बाधित सात गावांमध्ये भूमीअभिलेख व महसूल विभागाने शेतकऱ्यांच्या परस्पर ड्रोनच्या माध्यमातून मोजणी करण्याचा प्रयत्न केला. याची माहिती शेतकऱ्यांना मिळताच सात गावांतील शेतकऱ्यांनी जमिनीच्या मोजणीला जोरदार विरोध दर्शवला. शेतकऱ्यांनी अधिकाऱ्यांना प्रश्न विचारताच, अधिकारी मोजणीच्या ठिकाणाहून निघून गेले. पुरंदर तालुक्यातील उदाचीवाडी पारगाव-मेमाणे येथे विमानतळाच्या जागेच्या मोजणीसाठी वन विभागाने ड्रोनच्या माध्यमातून मोजणी सुरू केली होती. त्यानंतर स्थानिक नागरिकांनी या मोजणीला तीव्र विरोध व्यक्त केला.

## आमदारांच्या घराजवळ कोयता घेऊन दहशत

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण येथील भाजपचे आमदार महेश बालदी यांच्या राहत्या घराजवळ शुक्रवारी (दि. १३) रात्री हातात कोयता घेऊन दहशत निर्माण करणाऱ्या विशाल जयसिंग पवार (२५) याला उरण पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. या घटनेमुळे परिसरात काही काळ भीतीचे वातावरण पसरले होते. संबंधित इसम दारूच्या व्यसनाधीन असून, त्यातूनच हा प्रकार केल्याचे प्राथमिक चौकशीत समोर आले आहे.

शुक्रवारी रात्री उरण शहरात एक तरुण हातात धारदार शस्त्र (कोयता) घेऊन फिरत असल्याची माहिती नागरिकांना मिळाली. रात्रीच्या अंधारात तो आमदार महेश बालदी यांच्या घराजवळ पोहोचल्याने परिसरात खळबळ



■ विशाल पवार अटकेत

उडाली. रस्त्यावरून जाणारे नागरिक भयभीत झाले होते. काही काळासाठी परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. घटनेची माहिती मिळताच उरण पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत संबंधित इसमाला ताब्यात घेतले.

पोलिसांच्या या तात्काळ कारवाईमुळे नागरिकांनी सुटकेचा नि:श्वास सोडला. चौकशीत सदर तरुण हा साई दर्शन अपार्टमेंट, ठाकूरनगर, कामठा, उरण येथील रहिवासी विशाल जयसिंग पवार असल्याचे निष्पन्न झाले. प्राथमिक तपासात तो दारूच्या व्यसनाधीन असल्याचे समोर आले असून त्यातूनच त्याने हा प्रकार केल्याचे सांगितले जात आहे. याप्रकरणी फिर्यादी मिलिंद गणपत कारंडे यांनी विशाल पवार विरोधात तक्रार दाखल केली आहे. उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हनीफ मुलाणी यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस यंत्रणा करत आहे.

## रस्त्याच्या कामातून धुळीचे साम्राज्य

### ■ एमएसआयडीसी प्रशासनाचे दुर्लक्ष ■ नागरिकांचे आरोग्य धोक्यात

**। चौल । प्रतिनिधी ।**

एमएसआयडीसीकडून सुरू असलेल्या अलिबाग-रोहा आणि अलिबाग-मुरुड रस्त्यांच्या रुंदीकरणाच्या कामामुळे परिसरात धुळीचे साम्राज्य पसरले असून, नागरिकांचे आरोग्य व सुरक्षितता धोक्यात आली आहे. अनेकजण या धुळीमुळे श्वसनासंबंधीच्या आजाराने बाधित झाल्याचे समजते. संबंधित प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे धुळीचा त्रास नागरिकांसह प्रवाशांना असह्य झाला असून, तातडीने दिवसातून किमान दोन ते तीन वेळा रस्त्यावर पाण्याचा मारा करावा, अशी संतप्त मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

अलिबाग तालुक्यातील अलिबाग-रोहा आणि अलिबाग-मुरुड या महत्त्वाच्या रस्त्यांच्या रुंदीकरणाचे काम मागील चार-पाच •> पान २ वर



### व्यावसायिकांना बसतोय आर्थिक फटका

रस्त्यालगत असलेल्या दुकानदार आणि व्यावसायिकांना या धुळीचा मोठा फटका बसत आहे. दिवसभर उडणाऱ्या धुळीमुळे दुकानातील वस्तूंवर थर साचतो, सामान काळवंडते. ग्राहकांची वर्दळ घटल्याने व्यवसायावर परिणाम झाला आहे. स्वच्छता राखणे कठीण झाल्याने ग्राहक दुकानात येण्यास कचरतात, अशी व्यावसायिकांची तक्रार आहे.

### काम वेळेत पूर्ण करा; पण नागरिकांची काळजी घ्या

रुंदीकरणाचे काम नियोजित वेळेत पूर्ण व्हावे, याला नागरिकांचा विरोध नाही. मात्र, काम करताना नागरिकांच्या आरोग्याची व सुरक्षिततेची जबाबदारी प्रशासनाने स्वीकारली पाहिजे. दिवसातून किमान दोन ते तीन वेळा सिमेंट खडी व मुरुमावर पाणी टाकून धूळ नियंत्रणात ठेवावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा स्थानिकांनी दिला आहे.

## आग लागल्याने लोकल उशिरा



(छायाचित्र : संजय गायकवाड)

**कर्जत :** पळसदरी रेल्वे स्थानकाजवळ रुळांच्या दोन्ही बाजूंना गवताला आग लागल्याने दुपारची खोपोलीमुंबई लोकल सुमारे ३५ मिनिटे उशिराने धावली. प्रसंगावधान राखत रेल्वे कर्मचाऱ्यांनी तत्काळ आग आटोक्यात आणल्याने मोठा अनर्थ टळला. दुपारी सुमारे १ वाजण्याच्या सुमारास पळसदरी स्थानक परिसरात रुळांलगत गवताला आग लागल्याचे निदर्शनास आले. आग वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन स्थानकावर •> पान २ वर

## मंत्री झिरवाळ ‘नॉट रिचेबल’

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी मंत्रालयात मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या दालनातून २५ हजार रुपयांची लाच घेताना एका लिपिकाला अटक केली आहे. चौकशीदरम्यान त्याने मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या खासगी पीएने लाच घेण्यास सांगितल्याचा आरोप केला आहे. मात्र, या आरोपानंतर आता मंत्री नरहरी झिरवाळ शनिवारी सकाळपासून नॉट रिचेबल असल्याची माहिती आहे. त्यामुळे राजकीय वर्तुळात चांगलीच खळबळ उडाली आहे.



मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी सकाळपासून ते नॉटरिचेबल आहेत. दोन दिवसांपूर्वी मंत्रालयातील त्यांच्या कार्यलयात एसीबीने छापा मारला होता. या छाप्यामध्ये संबंध आढळल्यास राजीनामा देईन असे त्यांनी म्हटलं होतं. मात्र, आता झिरवळांच्या खासगी पीएने पैसे घेण्यास सांगितल्याचे चौकशीत समोर आले आहे. या घटनेनंतर मंत्री झिरवाळ नॉट रिचेबल आहेत. या घटनेनंतर राजकीय वर्तुळात आता विविध चर्चेला उधाण आलं आहे. याबाबत मंत्री झिरवाळ यांच्याकडून किंवा त्यांच्या कार्यालयाकडून कोणतीही अद्याप कोणतीही प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही. यावर आता ते काय प्रतिक्रिया देतात हे बघणं महत्त्वाचं ठरणार आहे.

### वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरण

## सहा जणांवर आरोप निश्चित

**। पुणे । प्रतिनिधी ।**

वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणात बावधन पोलिसांनी पुण्याच्या प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी आलिया बागल यांच्या कोर्टात ११ जणांवर तब्बल १६७० पानांचे आरोपपत्र दाखल केले होते. यात सर्व आरोपींविरुद्ध पोलिसांना सबळ पुरावे मिळाले होते. वैष्णवी हगवणे हिच्या आत्महत्या प्रकरणाने संपूर्ण राज्यात खळबळ उडवून दिली. तिचे सासरे राजेंद्र हगवणे हे राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) पदाधिकारी होते. हे प्रकरण राजकीयदृष्ट्या तापल्यामुळे सर्वांचेच या प्रकरणाकडे लक्ष लागले आहे. या प्रकरणात आता सत्र न्यायालयाने सहा आरोपींविरुद्ध आरोप निश्चित केले आहेत. या आरोपींविरुद्ध आरोप निश्चित केले असून, खटल्याची सुनावणी येत्या २३ फेब्रुवारीपासून सुरू होणार आहे.



राजेंद्र हगवणे, त्यांची पत्नी, दोन मुलं, एक मुलगी आणि इतर सहा जणांचा समावेश होता. आता सत्र न्यायालयाने सहा आरोपींविरुद्ध आरोप निश्चित केले आहेत. वैष्णवीच्या मृत्यूनंतर ५८ दिवसांनी हे आरोपपत्र दाखल झाले होते. त्यामुळे या प्रकरणाकडे पुन्हा एकदा सर्वांचे लक्ष लागले आहे. वैष्णवी हगवणे हिच्या शवविच्छेदन अहवालात तिच्या शरीरावर जखमांच्या खुणा आढळल्याने प्रकरणाला वेगळे वळण मिळाले. सुरुवातीला हा आत्महत्येचा प्रकार असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला होता. आत आरोप झाल्यानंतर ही आत्महत्या की खून याबाबत संशय निर्माण झाला आहे. पोलिसांनी या प्रकरणात वैष्णवीचे पती शशांक हागवणे, सासू लता हागवणे, नणंद करिश्मा हागवणे, सासरे राजेंद्र हागवणे, दीर सुशील हागवणे आणि कुटुंबीय मित्र निलेश चव्हाण यांना अटक केली आहे. मागील वर्षी जुलै महिन्यात पिंपरी-चिंचवड पोलिसांनी सविस्तर •> पान २ वर

### मुंबईमध्ये मेट्रोचा स्लॅब कोसळला

## एकाचा मृत्यू, चौघे जखमी

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुलुंड (पश्चिम) येथील एलबीएस रोडवर मेट्रो लाईन ४ (ग्रीन लाईन) च्या बांधकामादरम्यान उंचावरील काँक्रीट पॅरापेटचा भाग कोसळून खाली जात असलेल्या ऑटो रिक्षावर आदळल्याने भीषण अपघात झाला. दुपारी सुमारे १२.१५ वाजता मुलुंड अग्निशमन केंद्राजवळ, पियर क्रमांक १९६ परिसरात ही घटना घडली. अपघातात एकाचा जागीच मृत्यू झाला, तर तीन ते चार जण गंभीर जखमी झाले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

मृत व्यक्तीची ओळख उत्तर प्रदेशातील जौनपूर जिल्ह्यातील सरपंच रामधनी यादव अशी झाली आहे. ते मुंबईत फिरण्यासाठी आले



होते. मुलुंडमधून कळव्याकडे लग्नसमारंभासाठी रिक्षाने जात असताना हा अपघात घडला.

दरम्यान, एमएमआरडीएने घटनेची दखल घेत तात्काळ मदतकार्य करण्यात आल्याचे सांगितले. अपघाताचे कारण शोधण्यासाठी स्वतंत्र चौकशी सुरू असून, दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असे प्राधिकरणाने स्पष्ट केले.

### सर्वोच्च न्यायालयाचे आदेश धाब्यावर | आणखी २० ई-रिक्षांना परवानगी असतानाही दुर्लक्ष

## हातरिक्षा चालकांचे पुनर्वसन रखडले

**। संतोष पेरणे ।**

**। नेरळ ।**

पर्यावरण संवेदनशील पर्यटनस्थळ म्हणून ओळख असलेल्या माथेरान येथे हातरिक्षा ओढण्याच्या अमानवी प्रथेतून श्रमिकांची मुक्तता करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट आदेश दिले असतानाही सर्व ७४ हातरिक्षा चालकांना पर्यावरणपूरक ई-रिक्षा देण्यास प्रशासनाने नकार दिल्याने संतापाची लाट उसळली आहे. सध्या केवळ २० ई-रिक्षा सुरू असून, उर्वरित चालकांना अजूनही खांद्यावर रिक्षा ओढण्याची वेळ येत आहे.



### घोषणा फक्त कागदावरच

दरम्यान, ई-रिक्षांची संख्या अपुरी असल्याने वाढवून देण्याची मागणी होत असताना, माथेरान सनियंत्रण समितीने आणखी २० ई-रिक्षांना तत्त्वतः परवानगी दिली आहे. त्यापैकी १३ ई-रिक्षा प्रशासन खरेदी करणार असून, सात ई-रिक्षा नगरपरिषदेने उपलब्ध करून द्याव्यात, असे निर्देश देण्यात आले आहेत. मात्र, या ई-रिक्षा प्रत्यक्ष रस्त्यावर कधी येणार, याबाबत कोणतीही स्पष्ट तारीख जाहीर करण्यात आलेली नाही. त्यामुळे ही केवळ कागदी घोषणा असल्याची भावना निर्माण झाली आहे.

ब्रिटिश काळापासून सुरू असलेली हातरिक्षा ओढण्याची प्रथा बंद करून सर्व ९४ चालकांचे ई-रिक्षाद्वारे पुनर्वसन करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले होते. त्यानुसार ६ फेब्रुवारीपर्यंत ७४ हातरिक्षा बंद करून चालकांना पर्यायी रोजगार उपलब्ध करून देण्याचे निर्देश राज्य सरकारला देण्यात आले होते. मात्र, प्रत्यक्षात केवळ २० ई-रिक्षांना परवानगी देण्यात आली. त्यामुळे उर्वरित ७४ चालकांचे पुनर्वसन रखडले असून, न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन होत असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे.

दरम्यान, ई-रिक्षांची संख्या अपुरी असल्याने वाढवून देण्याची मागणी होत असताना, माथेरान सनियंत्रण समितीने आणखी २० ई-रिक्षांना तत्त्वतः परवानगी दिली आहे. त्यापैकी १३ ई-रिक्षा प्रशासन खरेदी करणार असून, सात ई-रिक्षा नगरपरिषदेने उपलब्ध करून द्याव्यात, असे निर्देश देण्यात आले आहेत. मात्र, या ई-रिक्षा प्रत्यक्ष रस्त्यावर कधी येणार, याबाबत कोणतीही स्पष्ट तारीख जाहीर करण्यात आलेली नाही. त्यामुळे ही केवळ कागदी घोषणा असल्याची भावना निर्माण झाली आहे. •> पान २ वर

## स्वराज्य पक्षाच्या कार्यालयाला काळं

**। पुणे । प्रतिनिधी ।**

संभाजीराजे छत्रपती यांच्या स्वराज्य पक्षाच्या कार्यालयाला काळं फासलं असून, यामुळे शहरात मोठी खळबळ उडाली आहे. कार्यकर्त्यांनी पक्ष कार्यालयाच्या दरवाजांवर आणि भितींवर काळ्या रंगाच्या स्प्रेने काळं फासलं आहे. यावेळी कार्यकर्ते हे आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. आपल्या समस्यांबाबत उत्तरे दिली जात नसल्याने कार्यकर्त्यांनी आक्रमक होत निषेध व्यक्त केला आणि कार्यालयाला काळं फासलं. या कार्यकर्त्यांवर कारवाई होण्याची शक्यता आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांचे वंशज असणाऱ्या संभाजीराजे छत्रपती यांनी १२ मे २०२२ रोजी ‘स्वराज्य संघटना’ या सामाजिक संघटनेची स्थापना करण्यात आली आहे.




# लोकसहभागातून घडणार आरोग्यदायी महाराष्ट्र

## माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव योजना राबवणार

## ७० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळविणारे गाव ठरणार ‘आरोग्यसंपन्न’

**| रायगड | प्रतिनिधी |**

राज्यातील ग्रामीण आरोग्य सेवा अधिक सक्षम व स्वयंपूर्ण करण्याच्या उद्देशाने आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या महत्वाकांक्षी ‘माझं गाव, आरोग्य संपन्न गाव’ या अभियानास राज्य सरकारने मंजुरी दिली आहे. लोकसहभागावर आधारित हे राज्यव्यापी आरोग्य अभियान १ एप्रिल २०२६ ते ३१ मार्च २०२७ पर्यंत राबविण्यात येणार आहे.

गाव पातळीवर नागरिकांचे आरोग्यमान उंचावण्यासाठी, प्रतिबंधात्मक व प्रोत्साहनात्मक आरोग्य सेवांना चालना देण्यासाठी, आरोग्यविषयक सामाजिक वर्तणुकीत बदल व आरोग्यदायी जीवनशैली रुजवण्यासाठी हे अभियान प्रभावी ठरणार असून, सार्वजनिक स्वच्छता, पाणीपुरवठा, सामाजिक प्रबोधन यासह ग्रामीण भागातील विविध घटकांच्या समन्वयाने आरोग्यदायी गाव बनवणे हे या अभियानाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

या अभियानांतर्गत उपचारांपेक्षा आजार होऊच नयेत याबाबतच्या उपाययोजनांवर विशेष भर देण्यात येणार आहे. संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजारांचे प्रमाण कमी करणे, माता-बाल आरोग्य सुधारणे, पोषण, स्वच्छता, सुरक्षित पाणी, सांडपाणी व्यवस्थापन आणि मानसिक आरोग्य यांचा समावेश या मोहिमेत करण्यात आला आहे. नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याचा सरकारचा मानस आहे.

### प्रमाणपत्र, रोख रक्कम देऊन होणार गौरव

माझं गाव आरोग्यसंपन्न गाव योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यस्तरीय, विभागस्तरीय, जिल्हा, तालुका व ग्रामपंचायत स्तरावर समित्या स्थापना केल्या जाणार आहेत. आरोग्यमंत्र्यांचे अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय समिती समिती असून, विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, आयुक्त व संचालक या समितीचे सदस्य असतील. राज्यस्तरीय कृती समितीही स्थापन करण्यात येणार असून, सार्वजनिक आरोग्य विभागाचे प्रधान सचिव (अपर मुख्य सचिव) समितीचे अध्यक्ष असतील. आरोग्य विभागाच्या निर्देशानुसार गावांचे मूल्यमापन करण्यात येणार आहे. एकूण गुणांपैकी ७० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या गावांना ‘आरोग्यसंपन्न गाव’ म्हणून घोषित करण्यात येईल. अशा गावांना स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र व रोख पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. अभियानासाठी सुमारे ८०.७५ कोटी रुपये निधी मंजूर करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली.

> “माझं गाव आरोग्यसंपन्न गाव योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आरोग्य विभागाच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत. हे अभियान लोकसहभागातून राबविण्यात येणार आहे. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने या अभियानात सहभाग घेउन आपले गाव व पर्यायाने आपला जिल्हा, राज्य ‘आरोग्यसंपन्न’ बनविण्यासाठी आपला हातभार लावूया.
>
> – नेहा भोसले, मुख्य कार्यकारी अधिकारी, राजिप”

# अपहारप्रकरणी कारवाई करण्यास विलंब

## मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे तक्रार

**| मुरुड | प्रतिनिधी |**

ग्रुप ग्रामपंचायत बोर्ली येथे निधी अपहार व आर्थिक अनियमितता झाल्याच्या आरोपांवर चौकशी होऊनही अद्याप ठोस कारवाई करण्यात आलेली नसल्याची तक्रार प्रतिक प्रमोद कणगी (रा. ताराबंदर, पो. बोर्लीमांडला, ता. मुरुडपद्मदुर्ग, जि. रायगड) यांनी केली आहे. याबाबत त्यांनी जिल्हा परिषद रायगडच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच ग्रामपंचायत विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना ई-मेलद्वारे निवेदन पाठवले आहे.

कणगी यांनी दि. १६ ऑक्टोबर २०२५ रोजी पंचायत समिती मुरुड येथे ग्रुप ग्रामपंचायत बोर्लीविरोधात निधी अपहार व आर्थिक अनियमिततेबाबत सविस्तर तक्रार अर्ज सादर केला होता. त्यानंतर २४ नोव्हेंबर २०२५ रोजी उपमुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद रायगड यांना लेखी पत्र देण्यात आले. पुढे १ डिसेंबर २०२५ रोजी पंचायत समिती मुरुड येथील विस्तार अधिकाऱ्यांना स्मरणपत्रही देण्यात आले.

या तक्रारीच्या अनुषंगाने १ जानेवारी २०२६ रोजी पंचायत समिती मुरुडमार्फत चौकशी अधिकारी राजेश विठ्ठल वाडेकर यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली. पाहणीदरम्यान तक्रारदार स्वतः उपस्थित राहून संबंधित कामांची माहिती व कागदपत्रे सादर केल्याचे सांगितले जाते. तक्रारीनुसार, गणेश आळीतील कोळी जमातीसाठी नरहरी ते नांदगावकर घरापर्यंतचा रस्ता प्रत्यक्षात बांधलेलाच नसताना वित्त आयोगाच्या नोंदींमध्ये इतर ठिकाणचे छायाचित्रे जोडून जिओ-टॅगिंग केल्याचा आरोप आहे. तसेच सुरई अंतर्गत गटार बांधकामाबाबत स्थानिक ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार हे गटार पंधरा ते वीस वर्षांपूर्वीच बांधले गेले असूनही नव्याने काम दाखवून बिल काढण्यात आल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. या दोन्ही प्रकरणांमुळे निधी अपहार व खोटे दस्तऐवज सादर केल्याचा गंभीर संशय निर्माण झाला आहे.

मूळ तक्रार दिल्यानंतर चार महिन्यांहून अधिक कालावधी उलटूनही आणि प्रत्यक्ष चौकशी होऊन एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी लोटूनही दोषींवर कोणतीही प्रशासकीय किंवा फौजदारी कारवाई झालेली नाही, तसेच चौकशी अहवालही जाहीर करण्यात आलेला नसल्याची खंत तक्रारदारांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे प्रकरण जाणीवपूर्वक प्रलंबित ठेवले जात असल्याची शंका उपस्थित केली जात आहे.

सार्वजनिक निधी व जनहिताशी संबंधित या गंभीर प्रकरणात संबंधित सरपंच, ग्रामसेवक व जबाबदार अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई करून अपहाराची रक्कम वसूल करावी, तसेच चौकशी अहवाल जाहीर करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. अन्यथा उच्चस्तरीय प्रशासकीय व कायदेशीर पातळीवर पाठपुरावा करण्याचा इशाराही निवेदनात देण्यात आला आहे. दरम्यान, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले याप्रकरणी काय कारवाई करणार, याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

# कर्जत परिवर्तन आघाडीच्या विजयी उमेदवारांचे कौतुक

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडून शाबासकीची थाप




**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यातील रायगड जिल्हा परिषदेच्या सहा आणि कर्जत पंचायत समितीमधील १२ पैकी १० जागांवर कर्जत परिवर्तन आघाडीने विजय मिळविला आहे. या सर्व विजयी उमेदवारांनी राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची भेट घेतली. सर्व विजयी उमेदवार आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हा अध्यक्ष सुधाकर घारे यांचे सुनेत्रा पवार यांच्याकडून कौतुक करण्यात आले.

जिल्हा परिषद निवडणुकीत कर्जत तालुक्यातून नारायण डामसे-कळंब, वर्षा दोरे- कशेळे, सुवर्णा ठाकरे-माणगाव तर्फे वरेडी, सुनीता मोरे-नेरळ, मारुती घारे-कडाव आणि उषा ठोंबरे - मोठे वेणगाव अशा सर्व सहा जिल्हा परिषद गटामध्ये कर्जत परिवर्तन आघाडीचे उमेदवार विजयी झाले आहेत. तर, तालुका पंचायत समिती मध्ये कविता शिंगवा कळंब, कविता पादीर पाथरज, अक्षय तिटकारे कशेळे, नमिता श्रीखंडे उकरूल, भगवान चंचे नेरळ, महेश खारीक दामत, नितीन धुळे वाकस, सुषमा पवाळी कडाव, चित्रा ठाकरे मोठे वेणगाव आणि नमिता घारे बीड बुद्रुक असे १० सदस्य विजयी झाले. कर्जत परिवर्तन आघाडीचे सर्व विजयी उमेदवार यांनी मुंबई येथील राष्ट्रवादी काँग्रेस भवनमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या गटनेत्या आणि राज्याचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची भेट घेऊन आशीर्वाद घेतले. त्यावेळी जिल्हा परिषदेवर निवडून आलेल्या सर्व सदस्यांच्या नावाने ओळख करून देत त्यांच्यावर अभिनंदनाची थाप प्रदेश अध्यक्ष सुनील तटकरे यांनी लगावली. राज्याच्या उप मुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी सर्व विजयी उमेदवार यांचे कौतुक करीत आशीर्वाद देत रायगड जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी आणि जिल्हा अध्यक्ष सुधाकर घारे यांचे अभिनंदन केले.

# नवनिर्वाचित नगराध्यक्षा, नगरसेवकांचा सत्कार



**● विद्यार्थ्यांचा बक्षीस वितरण सोहळा उत्साहात**
**● उर्दू शाळेकडून कार्यक्रमाचे आयोजन**

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

नजात सोशल अँड एज्युकेशनल ट्रस्ट (उर्दू स्कूल कमिटी) आणि अलीबाग नगर परिषद उर्दू शाळा क्र. ६ यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. साजिद शेख (अध्यक्ष, नजात सोशल अँड एज्युकेशनल ट्रस्ट) यांच्या मार्गदर्शनाखाली नवनिर्वाचित नगराध्यक्षा व नगरसेवकांचा सत्कार तसेच शालेय विद्यार्थ्यांचा बक्षीस वितरण समारंभ दि. १४ फ ब्रुवारी रोजी उत्साहात पार पडला.

कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून नगराध्यक्षा अक्षया नाईक उपस्थित होत्या. अध्यक्षस्थानी कैसर उस्मान दणदणे (अध्यक्ष, कोकण अल्पसंख्याक विचारमंच, रायगड) होते. प्रमुख पाहुण्यांमध्ये उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे, डॉ. साक्षी गौतम पाटील (सभापती, महिला व बालकल्याण विभाग), अनिल चोपडा (सभापती, पाणी पुरवठा विभाग), डॉ. साजिद शेख (अध्यक्ष, नजात सोशल अँड एज्युकेशनल ट्रस्ट), मुख्याधिकारी सागर साळुंखे, नाजीम नालखंडे (समाजसेवक, रायगड जिल्हा), फिरदौस साजिद शेख (सहसचिव, नजात सोशल अँड एज्युकेशनल ट्रस्ट), नसीम बुकबाईंडर, फारूक सय्यद, मुजफ्फर (बाबू) सय्यद, हमीद खान सर आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी नवनिर्वाचित नगरसेवकांचा विशेष सत्कार करण्यात आला. त्यामध्ये शैला भगत, समीर ठाकूर, जमालुद्दीन युसुफ सय्यद, संध्या पालवणकर, सुषमा पाटील, ॲड. ऋषिकेश माळी, ॲड. अश्विनी ठोसर, संदीप पालकर, योजना पाटील, ॲड. अंकित बंगेरा, श्वेता पालकर, ॲड. निवेदिता वाघमारे, सागर भगत व वृशाली भगत यांचा समावेश होता.

समारंभात शाळेतील विविध शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रे व पारितोषिके प्रदान करण्यात आली. कार्यक्रमाचे आयोजन रजमान सय्यद (मा. अध्यक्ष, शाळा व्यवस्थापन समिती माध्यमिक व शिक्षण तज्ज्ञ) व शाहनवाज शेरखान (अध्यक्ष, शाळा व्यवस्थापन समिती माध्यमिक) यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नासिर हकीम (सदस्य, कार्यकारिणी समिती), आरिफ हकीम (अध्यक्ष, शाळा व्यवस्थापन समिती प्राथमिक), सबिहा चिविलकर (मुख्याध्यापिका, अ.न.प. प्राथमिक शाळा) व फरहीन धायरेकर (मुख्याध्यापिका, अ.न.प. माध्यमिक शाळा) यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमादरम्यान मान्यवरांनी शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करत विद्यार्थ्यांनी मेहनत, शिस्त व नैतिक मूल्ये जोपासून यश संपादन करावे तसेच समाजाच्या प्रगतीत सक्रिय योगदान द्यावे, असे आवाहन केले. उर्दू शाळेच्या शैक्षणिक प्रगतीचे सर्वांनी कौतुक केले.

# बोरघाटात बिबट्याचा वावर

**● नागरिकांत भीतीचे वातावरण; वनवीभागाचे सतर्कतेचे आवाहन..**

**| खोपोली | प्रतिनिधी |**

बोरघाटातील सायमाळजवळ बिबट्या वावरत असल्याची माहिती मिळाल्याने या परिसरातील नागरिकांत भीतीचे वातावरण पसरले आहे, तर या घटनेची गंभीर दखल खोपोली वनविभागाने घेऊन सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. खोपोलीतून जाणाऱ्या मुंबई-पुणे जुन्या मार्गावरील बोरघाटामध्ये पुन्हा एकदा टाटा कंपनीजवळ रस्ता ओलांडत असताना बिबट्या कॅमेऱ्यात दिसून आला आहे. हा बिबट्या साधारण एक वर्षाचा असल्याचा अंदाज वनविभागाने वर्तविला आहे.

या घाटमाथ्यावरील जंगलात बिबट्या आणि त्याची पिल्ले मुक्तपणे वावरत असून, काही महिन्यांपूर्वी या घाटात टेम्पोच्या धडकते बिबट्याचा मृत्यू झाल्याची घटना घडली होती. तर, आता त्याच ठिकाणी बिबट्या आढळून आल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. या परिसरात प्रामुख्याने टाटा कॉलनी सायमाळ, दत्तवाडी, दस्तुरी, मंकीहील, गारमाळ वाघरणवाडी या गावांचा समावेश आहे. येथील नागरिकांनी सतर्क राहण्यासाठी ठिकठिकाणी सूचना फलकही वानविभागाच्यावतीने लावण्यात आले असून, नागरिकांनी रात्रीच्या अंधारात फिरू नये, असे आवाहन वनविभागाकडून करण्यात आले आहे.

पान १ वरून

## नार्वेकरांना पळवलं?

समोर आलं आहे. याबाबतचा संपूर्ण घटनाक्रम ‘कृषीवल’ने जाणून घेतला असून, लवकरच ते प्रकरण संपूर्ण रायगडकरांसमोर येणार आहे. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी कुटुंबियांच्या नावाने अलिबाग तालुक्यातील म्हात्रोळी येथे जमिनी खरेदी केल्या आहेत. अजून जमिनी खरेदी करण्यासाठी नार्वेकर म्हात्रोळी येथे गेले होते. त्यावेळी त्यांच्या सहकाऱ्यांनी नार्वेकरांच्या उपस्थितीत शेजारच्या मालकाला न कळविता सत्तेचा वापर करुन आणि नियमांना बगल देत सरकारी मोजणी करण्याचा प्रयत्न केला. यापूर्वी झालेल्या सरकारी मोजणीत शेतकऱ्याची जागा सेजल शहा यांच्या हद्दीत येत नसल्याचे समोर आले होते. मात्र, तरीही सरकारी मोजणीच्या नावाखाली नार्वेकरांनी खासगी मोजणी करणाऱ्यांसह दुसऱ्याच्या जागेत घुसखोरी केल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे.

सत्तेचा प्रभाव वापरून सरकारी यंत्रणा खासगी हितासाठी वाकवली जात असेल, तर तो केवळ एका व्यक्तीचा प्रश्न राहात नाही, तर संपूर्ण व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत करणारा मुद्दा ठरतो. विशेषतः महाराष्ट्र विधानसभा अध्यक्ष यासारख्या लोकशाही संस्थेच्या पदावर असलेल्या व्यक्तींबाबत असे आरोप समोर येणे ही राज्यासाठी चिंतेची बाब मानली जात आहे.

## रस्त्याच्या कामातून धुळीचे साम्राज्य

महिन्यांपासून एमएसआयडीसीकडून सुरू आहे. अनेक ठिकाणी रस्ते खोदून त्यावर सिमेंट खडी व मुरुमाचे थर टाकण्यात आले आहेत. मात्र, या कामादरम्यान उडणाऱ्या धुळीकडे संबंधित प्रशासनाने पूर्णपणे दुर्लक्ष केल्याचे चित्र आहे. या मार्गांवर वाहनांची मोठ्या प्रमाणात ये-जा सुरू असते. दुचाकी, चारचाकी तसेच जड वाहनांची सततची वर्दळ असल्याने खोदकाम केलेल्या आणि मुरुम टाकलेल्या रस्त्यावरून वाहने गेली की प्रचंड धूळ उडते. काही क्षणांसाठी समोरील वाहन दिसेनासे होते. त्यामुळे अपघाताचा धोका वाढला असून, संभाव्य दुर्घटनांना जबाबदार कोण, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

दिवसभर उन्हात तापलेल्या सिमेंट खडीमुळे धुरळा अधिक वाढतो. या मार्गावरून प्रवास करताना अक्षरशः श्वास गुदमरतो. डोळे, नाक, तोंडात धूळ शिरते. दुचाकीस्वारांसाठी प्रवास करणे कठीण झाले आहे. कपड्यांवर धुळीचा थर साचतो. रस्त्याचे खोदकाम करून मुरुम टाकण्यात आला असला तरी त्या कच्च्या रस्त्यावर नियमित पाणी मारले जात नाही. परिणामी, धुळीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. काम सुरू असताना किमान उपाययोजना म्हणून दिवसातून दोन-तीन वेळा पाणी मारणे आवश्यक असताना, प्रत्यक्षात तसे होत नसल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

**सिमेंटच्या धुळीमुळे श्वसनाचे आजार**

रस्त्यावरुन उडणारी धूळ श्वासावाटे शरीरात जाऊन श्वसनसंस्थेत साचते. हे धूलीकण फुफ्फुसात व श्वसननलिकेत जमा होतात. ॲलर्जी असणाऱ्यांना सर्दी, खोकला, कफ, धाप लागणे असे त्रास वाढले आहेत. काहींना घशात दुखणे, डोळ्यांची जळजळ, सतत शिंक येणे, अशी लक्षणे जाणवत आहेत. दीर्घकाळ या धुळीच्या संपर्कात राहिल्यास श्वसनक्षमता कमी होण्याचा धोका तज्ज्ञ व्यक्त करत आहेत.

## सहा जणांवर आरोप निश्चित

आरोपपत्र न्यायालयात दाखल केले होते. या प्रकरणात वैष्णवीचा पती शशांक हगवणे, सासू लता हगवणे, नणंद करिश्मा हगवणे, सासरे राजेंद्र हगवणे, दीर सुशील हगवणे आणि कुटुंबीय मित्र निलेश चव्हाण यांना अटक केली. या सर्वांवर हुंडाबळी, आत्महत्येस प्रवृत्त करणे, छळ व मारहाण, गुन्हेगारी कट रचणे तसेच पुरावे नष्ट करण्याचे गंभीर आरोप ठेवण्यात आले आहेत. आता न्यायालयाने आरोप निश्चित केल्याने या बहुचर्चित प्रकरणाच्या सुनावणीला वेग येणार असून पुढील सुनावणी २३ फेब्रुवारीपासून सुरू होणार आहे.

## आग लागल्याने लोकल उशिरा

नेमणुकीस असलेले होमगार्ड सचिन हिरवे, किशोर वीर, महिला होमगार्ड माधुरी खंडागळे तसेच ट्रॅकमन यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत आग विझवली. या घटनेमुळे दुपारी १.४८ वाजता खोपोलीहून मुंबईकडे जाणारी लोकल सुमारे ३५ मिनिटे उशिराने रवाना झाली. आगीमुळे कोणतीही जीवितहानी किंवा रेल्वे मालमत्तेचे नुकसान झाले नसल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक तानाजी खाडे यांनी दिली.

## हातरिक्षा चालकांचे पुनर्वसन रखडले

महाराष्ट्र शासनाने स्थापन केलेल्या माथेरान सनियंत्रण समितीचे अध्यक्ष के.पी. बक्षी आणि सचिव तथा जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या उपस्थितीत नुकतीच बैठक पार पडली. या बैठकीत प्रशासकीय अधिकारी, काही निमंत्रित पदाधिकारी, पर्यावरण क्षेत्रातील सामाजिक कार्यकर्ते आणि रिक्षा संघटनेचे काही सदस्य उपस्थित होते. मात्र समितीला स्थानिकांच्या रोजगार, पर्यटन व्यवस्थापन किंवा पर्यावरणीय समतोलाबाबत संवेदनशीलता नसल्याची संतप्त प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

माथेरानमध्ये वाढत्या पर्यटनामुळे पर्यावरणपूरक ई-रिक्षांची गरज अधोरेखित होत असताना हातरिक्षा चालकांना अमानवी कष्टाच्या चक्रातून मुक्तता मिळणे अपेक्षित होते. प्रायोगिक तत्वावर ई-रिक्षांचा प्रयोग यशस्वी ठरल्याचा अहवाल आल्यानंतरही पूर्ण अंमलबजावणी होत नसल्याने प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. स्थानिक संघटनांनी न्यायालयाचा अवमान करणाऱ्या समितीची त्वरित हकालपट्टी करावी, अशी मागणी लावून धरली आहे. ई-रिक्षावाढीसंदर्भातील निर्णयात होणारा विलंब आणि पुनर्वसनाचा प्रश्न चिघळण्याची शक्यता व्यक्त होत असून, शासनाने तातडीने ठोस पावले उचलावीत, अशी मागणी जोर धरत आहे.

# नवी मुंबईमध्ये व्यसनी पदार्थाचे प्रमाण चिंताजनक



**| उरण | प्रतिनिधी |**

नवी मुंबईमध्ये वाढत चाललेल्या अमली पदार्थांच्या व्यसनाच्या समस्येबाबत व्यसनमुक्तीच्या क्षेत्रात मार्गदर्शकाचे, गाईडचे काम करणारे दर्शन नाईक यांनी चिंता व्यक्त केली आहे. दिवसेंदिवस विविध व्यसनाचे प्रमाण नवी मुंबई क्षेत्रात वाढत असून हे वाढते प्रमाण चिंताजनक आहे. त्यामुळे अनेकांचे संसार उध्वस्त झाले असून विविध व्यसनामूळे अनेकांना आपले प्राणही गमवावे लागले आहे. व्यसना पासून तरुणांनी नागरिकांनी दूर राहावे यासाठी गेली अनेक वर्षे व्यसनमुक्ती क्षेत्रात कार्यरत असणारे उरण मधील दर्शन नाईक यांनी आजपर्यंत अनेक विविध भागात जाऊन, जनतेला मार्गदर्शन करून समाज प्रबोधन केले आहे. व्यसना पासून तरुणांना दूर ठेवण्यासाठी कठोर परिश्रम घेतले आहेत.पोलिसांच्या सहकार्याने वेगवेगळ्या उपाययोजना राबवून जनजागृती करणार असल्याचे दर्शन नाईक यांनी सांगितले.

याबाबतीत दर्शन नाईक यांनी रामचंद्र मोहिते पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर गवशेते तसेच अँटी नार्कोटिक्स टास्क फोर्सच्या अधिकाऱ्यांची भेट घेऊन व्यसनाच्या बाबतीत असलेल्या विविध समस्या त्यांच्या निदर्शनास आणून दिल्या. यावेळी नवी मुंबईमध्ये वाढत चाललेल्या अमली पदार्थांच्या व्यसनाच्या समस्येबाबत, विशेषतः तरुण वर्ग आणि शाळा-कॉलेज स्तरावर, याबाबत सखोल आणि अर्थपूर्ण चर्चा झाली. व्यसनमुक्ती या विषयावर सामाजिक स्वयंसेवक आणि समुदाय उपक्रमांसोबत एकत्रितपणे काम करण्याची तयारी पोलीस प्रशासन विभागाने दर्शवली आहे, याबद्दल मी त्यांचा आभारी असल्याचे नाईक यांनी म्हटले आहे.

# स्वामींच्या पादुकांचे आगमन

**| उरण | प्रतिनिधी |**

उरण येथील स्वामी समाज मंदिर आनंद नगर, उरण येथे रविवार (दि.१५) रोजी सकाळी ८.३० ते १० वाजेपर्यंत स्वामी समर्थांच्या पादुकांचे आगमन प्राणप्रतिष्ठा सोहळा राज शेखर म्हात्रे यांच्या हस्ते होणार आहे. अशी माहिती स्वामी समाज मंदिर अध्यक्ष शेखर द्वारकानाथ म्हात्रे यांनी दिली. कार्यक्रमात अभिषेक, महाआरती आदी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.तरी, या कार्यक्रमांचा परिसरातील स्वामीभक्तांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# रायगडचा खरा डॉन महेंद्र घरत



## श्रीरंग बर्गे यांचा गौरव

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

रायगड जिल्हा परिषद निवडणुकीत महायुतीच्या जोरदार लाटेतही काँग्रेसने लढविलेल्या तीनपैकी दोन जागा जिंकत आपला झेंडा फडकावला. त्यामुळे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत हेच रायगडचे ‘खरे डॉन’ असल्याचा गौरव श्रीरंग बर्गे यांनी केला. अलिबाग-सोगाव येथे ‘अलिशान कप’ क्रिकेट स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

बर्गे म्हणाले की, महाविकास आघाडीचे नेतृत्व करताना घरत यांनी प्रभावी रणनीती राबवत उरणसह पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणुकांत आघाडीला यश मिळवून दिले. युवकांना संधी देत पुढील राजकीय समीकरणांची भक्कम पायाभरणी केली. यावेळी महेंद्र घरत म्हणाले की, रायगड हा दिवंगत ए.आर. अंतुले आणि मधुकर ठाकूर यांचा वारसा असलेला जिल्हा असून, काँग्रेसची शान राखण्याचा आमचा प्रयत्न आहे. अलिबागमध्ये मधुशेठ ठाकूर यांच्या नावाने मैदान व्हावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. राजाभाऊ ठाकूर यांनी पराभवानंतरही खचणार नसल्याचे सांगत पुढे लढण्याचा निर्धार व्यक्त केला.


## जाहीर नोटीस :-

सर्व लोकांस ह्या जाहीर नोटीसीने कळवण्यांत येते की,

मौजे: नाडसूर, ता.सुधागड, जि.रायगड येथील गट/भुमापन क्र.४९१, ८४, ७४ व ११३ या जमीन मिळकती आमचे अशिल श्री. प्रमोद शांताराम सुळे यांच्या मालकीच्या होत्या त्या त्यांनी व आमचे दुसरे अशिल श्री.श्याम गणपत जाधव यांचे मध्यस्तीने अमीता कौर व अरविंदर सिंग यांस रजि. खरेदीखत दि. दस्त क्र.१९८३, दि. ०३/०७/२०२५ अन्वये विकत दिलेल्या असुन, त्या त्यांचे नांवे झालेल्या आहेत.

परंतू सदरहू जमीन मिळकतींचा ताबा खरेदी घेणार यांना दिलेला नसुन तो आमचेच ताब्यात आहे. सदरहू व्यवहाराबाबत अमीता कौर व अरविंदर सिंग यांनी दिलेले चेक अजुनही वटलेले नाहीत. तसेच त्यांनी कबुल केलेली रोख रक्कम अजुनही दिलेली नाही. तसेच या व्यवहारापोटी श्री. श्याम गणपत जाधव यांना कोणतेही ठरलेले कमिशन अमीता कौर व अरविंदर सिंग यांनी दिलेले नाहीत. त्यामुळे त्यांना ताबा पावती (पझेशन डीड) करून दिलेले नाही.

तसेच सदरहू खरेदीखतानुसार संपुर्ण मोबदला रक्कम आमचे अशिलांस पोहोच झाली नसल्याने, त्यांनी सदरहू करण्यांत आलेले खरेदीखत रद्द करण्याचे कामकाज सुरू केलेले आहे.

तरी मौजे नाडसूर, ता. सुधागड, जि. रायगड येथील गट/भुमापन क्र. ४९१, ८४, ७४ व ११३ या जमीन मिळकतींचे संबंधात अन्य कोणीही कोणत्याही प्रकारचा हस्तांतरणाचा दस्त करू नये, तसा केल्यास तो आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

हे कळावे,

दि. /०२/२०२६

**ॲड. सागर हिराकांत भगत,**
ॲडव्होकेट,
पत्ता : मौजे-उन्हेरे-कुंभारशेत,
पो. पाली, ता. सुधागड, जि. रायगड
मोबा.क्र.८९८३४५६८४७

# मायनी कोयना शाळा तालुक्यात अव्वल

| खरोशी | प्रतिनिधी |

पेण तालुक्यातील जिल्हा परिषद मायनी कोयना प्राथमिक शाळेने मुख्यमंत्री 'माझी शाळा सुंदर शाळा' स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावत तब्बल ३ लाख रुपयांचे पारितोषिक मिळवले आहे. शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात आलेल्या नाविन्यपूर्ण, विद्यार्थी-केंद्रित आणि तंत्रज्ञानाधारित उपक्रमांची दखल घेत हा मान देण्यात आला असून, परिसरात शाळेच्या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.




रा.जि.प.च्या मायनी कोयना शाळेने भौतिक पायाभूत सुविधांच्या बळकटीकरणापासून ते शैक्षणिक गुणवत्तावृद्धीपर्यंत विविध स्तरांवर उल्लेखनीय कामगिरी केली आहे. परसबाग उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणपूरक सवयी रुजविण्यात आल्या आहेत. वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित व्हावा यासाठी विविध प्रयोग, उपक्रम आणि सुसज्ज प्रयोगशाळा उभारण्यात आली आहे. संगणक कक्षाच्या माध्यमातून डिजिटल शिक्षणाला चालना देण्यात आली असून, विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला वाव देण्यासाठी 'बालवैज्ञानिक कक्ष' सुरू करण्यात आला आहे. भविष्यातील शास्त्रज्ञ घडविण्याचा स्पष्ट हेतू या उपक्रमांमागे दिसून येतो. तसेच, विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी गवतापासून तयार केलेली आकर्षक 'वाचन कुटी' उभारण्यात आली आहे.

> मुख्यमंत्री 'माझी शाळा सुंदर शाळा' ही स्पर्धा केवळ सजावट किंवा बाह्यरूपापुरती मर्यादित नसून, शाळेच्या सर्वांगीण गुणवत्तेचा आढावा घेणारी आहे. मायनी कोयना शाळेने शैक्षणिक गुणवत्ता, डिजिटल सक्षमीकरण, पर्यावरणपूरक उपक्रम आणि विद्यार्थीकेंद्रित उपक्रम यांचा उत्कृष्ट संगम साधला आहे. ग्रामीण भागातील शाळाही नियोजनबद्ध काम आणि शिक्षक-पालकांच्या एकजुटीच्या बळावर आदर्श निर्माण करू शकतात, याचे हे उत्तम उदाहरण आहे. इतर शाळांनीही या मॉडेलचा अभ्यास करून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पुढाकार घ्यावा.
> – शर्मिला शेंडे, गटशिक्षणाधिकारी

लहान वयातच स्वयंरोजगाराची जाणीव व्हावी यासाठी शिलाई मशीन प्रशिक्षण उपक्रम राबविण्यात येत आहे. शिक्षणाबरोबरच कौशल्याधारित विकासालाही चालना देण्याचा शाळेचा प्रयत्न आहे. 'डिजिटल शाळा' ही संकल्पना केवळ प्रोजेक्टरपुरती मर्यादित न ठेवता शालेय कामकाजाच्या प्रत्येक घटकात तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यावर शाळेने भर दिला आहे. बोलकी संरक्षक भिंत, अभ्यागतांचे क्यूआर कोडद्वारे स्वागत, बोलकी परसबाग, तसेच 'गुड टच-बॅड टच' यांसारखे जनजागृतीपर उपक्रम क्यूआर कोड तंत्रज्ञानाच्या साहाय्याने सादर करण्यात आले आहेत. विशेष म्हणजे विद्यार्थी स्वतः क्यूआर कोड तयार करतात तसेच गुगल डॉक्युमेंट आणि गुगल फॉर्म तयार करण्याचे कौशल्य आत्मसात केले आहे. डिजिटल साक्षरतेचा हा आदर्श नमुना ठरत आहे.

विद्यार्थ्यांना अवकाशीय ज्ञान प्राप्त व्हावे यासाठी शाळेत आकर्षक सूर्यमाला उभारण्यात आली आहे. डिजिटल शालेय विद्यार्थ्यांसाठी बचत बँक सुरू करून आर्थिक साक्षरतेचाही पाया मजबूत करण्यात आला आहे. दरम्यान, परसबाग स्पर्धेमध्ये शाळेने द्वितीय क्रमांक मिळविला असून, उत्कृष्ट मतदान जनजागृती उपक्रमाबद्दल जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते यापूर्वी शाळेचा सन्मान करण्यात आला आहे.

या स्पर्धेत पेण तालुक्यातील १८ केंद्रांतील २८७ शाळांचे मूल्यांकन गटविकास अधिकारी गजानन लेंडी यांच्या अध्यक्षतेखाली, गटशिक्षणाधिकारी शर्मिला शेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली विस्तार अधिकारी अरुणादेवी मोरे आणि सर्व केंद्रप्रमुखांच्या सहकार्याने करण्यात आले.

# निवडक

## ज्येष्ठ पत्रकार धनंजय गोंधळी कालवश

**चिरनेर** : उरण तालुक्यातील चिरनेर येथील ज्येष्ठ पत्रकार तथा उरण टाइम्सचे संपादक व कवी धनंजय चिंतामण गोंधळी (८५) यांचे शनिवारी (दि.१४) वृद्धपकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर चिरनेर येथील मुक्तीधाम स्मशानभूमीत



विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळींसह ग्रामस्थ व नातेवाईकांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुलं, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे, पंतवंडे असा आप्त परिवार आहे. धनंजय गोंधळी हे कोकण एज्युकेशन सोसायटीच्या सेकंडरी स्कूलचे अनेक वर्ष चेअरमन होते. त्यांना महाराष्ट्र शासनाचा शेतीनिष्ठ पुरस्कार प्राप्त झाला होता. कवितेचे सौंदर्य उलगडणाऱ्या गोंधळी यांनी अस्वादक समीक्षेचा वस्तुपाठ प्रस्थापित केला होता. त्यांनी ग्रामीण पत्रकार म्हणून 'कृषीवल' या वृत्तपत्रामधून आपल्या लेखनाला सुरुवात केली होती. त्यांनी उरण टाइम्स हे साप्ताहिक सुरू केले होते. एकेकाळी त्यांनी चिरनेर परिसरात शेतकरी कामगार पक्षाची मुहूर्तमेढ रोवून, उरण तालुक्यात शेतकरी कामगार पक्षाचा दबदबा निर्माण केला होता. चिरनेर जंगल सत्याग्रहातील हुतात्म्यांची शिल्प चित्रे उभी करण्यात त्यांचे मोलाचे योगदान आहे. शेकापचे ज्येष्ठ नेते स्वर्गीय प्रभाकर पाटील, सुलभा काकू, दत्ता पाटील, दि.बा. पाटील, दत्तूशेठ पाटील, मीनाक्षी पाटील यांच्यासह शेकाप सरचिटणीस जयंत पाटील, विवेक पाटील, बाळाराम पाटील, सुप्रिया पाटील यांच्याशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते.

## अतिक्रमण विभागाची तोडक कारवाई



**पनवेल** : महापौर नितीन पाटील व आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनूसार उपायुक्त नानासाहेब कामठे यांच्या मार्गदर्शनाखाली कामोठ्यातील सेक्टर २१,२२ व खांदा कॉलनी येथील अनधिकृत झोपड्या, तसेच फुटपाथवरील बेकायदेशीर शेड, हातगाड्या, अनधिकृत नर्सरी यांच्यावरती अतिक्रमण विभागाच्यासाह्याने कारवाई केली. याचबरोबर तळोजे फेज २ येथील बेकायदेशीर झोपड्या, फुटपाथवरील बेकायदेशीर चिकन विक्री शेड, फेरीवाले यांच्यावर तोडक कारवाई करण्यात आली. तसेच, रेल्वे स्टेशन परिसरातील रस्त्यावरील अनधिकृत स्टॉल्स, दुकानांवरती अतिक्रमण विभागाच्या साह्याने तोडक कारवाई करण्यात आली. यावेळी सहायक आयुक्त सुबोध ठाणेकर व प्रभारी अधिक्षक रोशन माळी उपस्थित होते.

## पुलावरून पडून तरूणाचा मृत्यू

**पनवेल** : रेल्वे स्टेशन येथील नवीन बुकिंग पुलावरून पडून एका ३५ वर्षीय तरूणा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या घटनेची नोंद पनवेल लोहमार्ग पोलिस ठाण्यात करण्यात आली असून मृताची ओळख पटविण्यासाठी पोलिस मृताच्या नातेवाईकांचा शोध घेत आहेत. हा तरूण पनवेल रेल्व स्थानक नवीन पुलावरून पडल्याने जबर जखमी होऊन बेशुद्ध अवस्थेत पोलिसांना मिळून आला होता. त्यावेळी पनवेल रेल्वे पोलिसांनी त्याला उपचारसाठी उप जिल्हा रुग्णालय पनवेल येथे दाखल केले असता, तेथील डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. हा तरूण अंगाने मध्यम बांधाचा असून उंची ५ फुट ५ इंच इतकी आहे. त्याने अंगात पिवळ्या रंगाचा हाफ बाह्यांचा टी-शर्ट घातले असून त्याच्या आत हिरव्या रंगाची बनियन व नेसणीस निळ्या रंगाची फुल जीन्स पॅन्ट परिधान केली आहे. त्याच्या डाव्या हाताच्या मनगटावर सुधीर व चार स्टारचे ओळख चिन्ह गोंदलेले आहे. या व्यक्तीच्या वारसाचा शोध लागल्यास पनवेल रेल्वे पोलीस उपनिरीक्षक ए.पी. गोपाळे व पोलिस उपनिरीक्षक श्रीकृष्ण वेदपाठक यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पक्षाची बैठक

**पनवेल** : स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पक्षाचे पक्षप्रमुख पँथर नेते मनोज संसारे, पक्षाचे अध्यक्ष सागर संसारे, अनिकेत संसारे, जिल्हाध्यक्ष महेश साळुंखे, जिल्हा कार्याध्यक्ष विजय धोत्रे तसेच जिल्हा संघटक राजेश हाटे यांच्या मार्गदर्शनाखाली बैठकीचे नियोजन करण्यात आले आहे. ही बैठक २० मार्च रोजीच्या चवदार तळे सत्याग्रह या विषयावरती रविवारी (दि.१५) महाड येथील तालुकाध्यक्ष सुजित जाधव यांच्या निवासस्थानी पार पडणार आहे. या बैठकीला माणगाव तालुकाध्यक्ष नितीन हाटे, श्रीवर्धन तालुकाध्यक्ष सुयोग लोखंडे, रोहा व पेण तालुकाध्यक्ष अमित, महाड शहराध्यक्ष सुनील जाधव व महाड महिला आघाडी अध्यक्ष व त्यांचे सर्व कार्यकर्ते प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत.

# सत्यजित बडे यांची प्रशासकीय सेवेत झेप



| रायगड | प्रतिनिधी |

रायगड जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बडे यांनी भारतीय प्रशासकीय सेवेत (आयएएस) झेप घेतली आहे. त्यांची नुकतीच पुणे येथे महाराष्ट्र राज्य दिव्यांग कल्याण आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानिमित्त शुक्रवारी (दि.१३) त्यांचा जिल्हा परिषदेतर्फे सत्कार करण्यात आला. त्याचप्रमाणे त्यांना निरोपही देण्यात आला आहे.

यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, नवनियुक्त अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियदर्शनी मोरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी सामान्य प्रशासन जालिंदर पठारे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी ग्रामपंचायत विभाग विशाल तनपुरे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी राहूल कदम, शिक्षणाधिकारी प्राथमिक ललिता दहितुले, जिल्हा कृषि अधिकारी पवनकुमार नजन यांच्यासह जि.प.चे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी काही अधिकारी व कर्मचाऱ्यांनी बडे यांच्याविषयी आपल्या भावना व्यक्त केल्या.

२००२मध्ये महाराष्ट्र विकास सेवेत प्रवेश केलेल्या सत्यजित बडे यांनी गेली अडीच दशके राज्याच्या ग्रामीण व जिल्हास्तरीय प्रशासनात ठसा उमटवला आहे. गटविकास अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी ते अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अशा प्रत्येक जबाबदारीत त्यांनी कामापेक्षा परिणामांवर भर दिला आहे. २००२ ते २००७ या कालावधीत आंबेगाव आणि सांगली जिल्ह्यातील वाळवा पंचायत समितीमध्ये गटविकास अधिकारी म्हणून त्यांनी विकासकामांना गती दिली. २०१९मध्ये अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर निवड झाल्यानंतर त्यांनी वर्धा जिल्हा परिषदेत महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांनतर ते २०२३ सालापासून रायगड जिल्हा परिषद येथे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत असून ग्रामीण विकासाच्या दृष्टीने त्यांचे काम विशेष लक्षवेधी ठरले आहे. गटविकास अधिकारी असताना विविध शासकीय योजना प्रभावीपणे राबवल्याबद्दल त्यांना अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे.




● येत्या १९ फेब्रुवारी रोजीच्या छत्रपती शिवाजी महारांजांच्या जयंतीनिमित्त पनवेलमध्ये स्वच्छतेचा उपक्रम राबविण्यात आला. येथील अश्वारूढ छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची पाण्याने स्वच्छ धुलाई करून परिसर देखील स्वच्छ करण्यात आला. पनवेल पालिका स्वच्छता व आरोग्य निरीक्षक महेंद्र भोईर यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता दूतांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. (छायाचित्र : राजेश डांगळे)

# गावठी दारु हातभट्टीवर कारवाई

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल शहर पोलिसांनी अवैधरित्या गावठी दारु निर्मितीच्या हातभट्टीवर धडक कारवाई करून १६ बॅरल (अंदाजे ३००० लीटर) गावठी दारु जप्त केली आहे.



पनवेल-कुंडेवहाळ येथील कोरीपासून सुमारे ३ कि.मी.अंतरावर डोंगराच्या टोकावरील जंगल परिसरात अवैधरित्या गावठी दारू निर्मितीची हातभट्टी सुरू असल्याची माहिती पनवेल शहर पोलिसांना प्राप्त झाली होती. या माहितीच्या आधारे तात्काळ वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांनी कारवाई पथक तयार करून त्या ठिकाणी छापा टाकला. या छाप्यामध्ये १६ बॅरल मधील अंदाजे ३००० लिटर गावठी दारू जप्त करण्यात आली असून ती जागीच नष्ट करून दारू निर्मितीसाठी वापरण्यात येणारे साहित्यही हस्तगत करण्यात आले आहे. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

# आंबेवाडी बाजारपेठेत निकृष्ट रस्ता

| कोलाड | प्रतिनिधी |

मुंबई-गोवा महामार्गावरील आंबेवाडी बाजारपेठेतील रस्ता चौपदरीकरणाच्या कामामुळे उंच झाला आहे. त्यामुळे देशमुख चाल, शिवनेरी मंगळ कार्यालय व पोस्ट ऑफिसकडे जाणारा रस्ता पूर्णपणे खाली गेला आहे. संबंधित ठेकेदाराने या मार्गावर पर्यायी रस्ता न करता रस्त्याच्या सुरवातीलाच मोठं मोठी खडी टाकून ठेवली आहे. त्यामुळे या मार्गावरून जाणारे शालेय विद्यार्थी तसेच रहिवासी व ज्येष्ठ नागरिकांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे. तसेच, कोणाचा नाहक बळी गेला तर याला जबाबदार कोण? अशी संतप्त



प्रतिक्रिया प्रवाशी वर्गाकडून व्यक्त केली जात आहे.

मुंबई-गोवा महामार्गावरील चौपदरीकरणाच्या रस्त्याचे काम गेली १७ वर्षांपासून सुरु आहे. या महामार्गावरील आंबेवाडी बाजारपेठेतील उड्डाण पुलाचे काम सुरु असुन ते येत्या पावसाळ्यापूर्वी पूर्ण होईल असे लोकनेत्यांकडून सांगण्यात आले आहे. परंतु; या उड्डाण पुलाचे काम हे पोस्ट ऑफिसपर्यंत असल्यामुळे येथे वाहतुकीचे प्रमाण अधिक वाढणार आहे. त्यामुळे रस्ता ओलांडणाऱ्या नागरिकांच्या जिवाला धोका निर्माण होणार असुन येथे सिग्नल लावणे गरजेचे असल्याचे स्थानिकांमधून बोलले जात आहे.

> मुंबई-गोवा महामार्गांवरील आंबेवाडी बाजारपेठेतील पोस्ट ऑफिस, शिवनेरी मंगल कार्यालय, तसेच देशमुख चाल येथे जाण्यासाठी रस्ता गरजेचे असुन तो त्वरित तयार करून द्यावा, अशी मागणी संबंधित ठेकेदाराकडे करण्यात आली होती. परंतु, ठेकेदाराची मनमानी नुसार या रस्त्याची परिस्थिती जैसे थे आहे. या रस्त्यामुळे कोणाचा नाहक बळी गेला तर याला जबाबदार संबंधित ठेकेदार असेल. – चंद्रकांत लोखंडे, सामाजिक कार्यकर्ते



# कर्जत-शहापूर महामार्गावर खड्ड्यांचा कहर

## कशेळेतील नागरिकांचा उपोषणाचा इशारा

| कर्जत | प्रतिनिधी |

कर्जत-शहापूर महामार्गाचे काँक्रीटीकरणाचे काम मागील ४ वर्षांपासुन सुरु आहे. अनेक ठिकाणी अपुर्ण काम असल्याने रस्त्याची दुरवस्था झाली आहे. याबाबत ग्रामस्थांनी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मुंबई यांच्याकडे तक्रार केली होती. त्यांच्याकडून दोन दिवसांत खड्डे भरून देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र, हे आश्वासन त्यांच्याकडून पाळले गेले नसून ग्रामस्थांनी उपोषणाचा इशारा दिला आहे.

कर्जत-शहापूर महामार्गाची अत्यंत दुरवस्था झाली असून याठिकाणी मोठे खड्डे पडले आहेत. त्यामुळे याठिकाणी रोजच अपघात होत असतात. हा राज्य महामार्ग कडाव कशेळे बाजारपेठेतून जात असून याठिकाणी रस्त्याला खड्डे पडले आहेत. त्यामुळे तेथील व्यापारी तसेच नागरीक धुळीने त्रस्त झाले आहेत. तसेच, कडाव पेज नदीवरील पुल, वंजारवाडी फाटा, नालधे गाव व कळंब पोलीस ठाण्याजवळ प्रचंड मोठे खड्डे पडले आहेत. याबाबत कशेळे ग्रामस्थांनी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मुंबई यांच्याकडे प्रत्यक्ष भेटुन तक्रार केली होती. त्यांच्याकडून दोन दिवसांत खड्डे भरून देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र, हे आश्वासन त्यांनी पाळले नाही. त्यानंतर सामाजिक कार्यकर्ते रमेश हिंदुराव यांनी सोमवारी (दि.९) म.रा.र.वि.महामंडळा कार्यकारी व मुख्य अभियंता यांच्याकडे निवेदन दिले. आठ दिवसांत खड्डे न भरल्यास कशेळे परीसरातील नागरीकांना सोबत घेऊन उपोषणास बसण्याचे पत्र देखील यावेळी देण्यात आले.

# परवानगीशिवाय हेरिटेज वास्तूंची डागडुजी

| माथेरान | प्रतिनिधी |

माथेरान मध्ये असणाऱ्या हेरिटेज वास्तूंच्या डागडुजी किंवा नूतनीकरण करावयाचे असल्यास हेरिटेज कमिटीच्या परवानगी शिवाय कोणतेही काम करता येत नाही. एखाद्या निकृष्ठ रस्त्याचे काम करावयाचे झाल्यास या कामाला हेरिटेज कमिटीची परवानगी लागते, अशी उत्तरे दिली जातात. परंतु, माथेरान नगरपरिषदेच्या हेरिटेज कार्यालयाचे काम विना परवानगी सुरू असल्यामुळे याबाबत शिवराष्ट्र पॅनेलचे गटनेते सीताराम कुंभार यांनी मुख्याधिकारी राहुल इंगळे यांना विचारणा केली. त्यावेळी त्यांनी स्पष्ट उत्तर न दिल्याचा आरोप करत संबंधित अधिकारी वर्गावर कारवाई करावी, अशी सिताराम कुंभार यांनी मागणी करून प्रशासनाच्या अनागोंदी कारभाराबाबत तीव्र संताप व्यक्त केला आहे. तसेच, माथेरान नगरपरिषदेच्या तिजोरीत खळखळाट असताना अशाप्रकारे कामे सुरू केली आहेत.



यावर आळा बसला पाहिजे. जर का या कामाच्या परवानग्या घेतलेल्या असतील तर आम्हाला दाखवून विश्वासात घेऊन कामे सुरू करणे आवश्यक होते. त्यामुळे हा एकप्रकारे हेरिटेज स्कॅम असून यामध्ये भ्रष्टाचार झाल्याचे नाकारता येत नाही, अशी प्रतिक्रीया देखील सिताराम कुंभार यांनी केली आहे.

महाशिवरात्रीनिमित्त मोठी यात्रा | पुरातन मंदिरापैकी एक शिवालय

# चौलचे ग्रामदैवत श्रीरामेश्वर

| रेवदंडा | महेंद्र खैरे |

अलिबाग-रेवदंडा मुख्य रस्तावर नारळ पोफळीच्या गर्द छायेत विसावेलेले चौल हे नयनरम्य गाव असून अलिबाग पासून १८ किमी अंतरावर आहे. इ.स.पूर्व पाचव्या शतकापासून चौलचा एक व्यापारी केंद्र असा उल्लेख आढळतो. चौल हा पूर्वी १५ पाखाड्यांमध्ये विभागलेला होता. या १५ पाखाड्यांपैकी भोरसी पाखाडीत चौलचे ग्रामदैवत श्रीरामेश्वेर मंदिर आहे.

चौलचे श्रीरामेश्वेर मंदिर हे सुमारे चारशे वर्षांपूर्वीचे असावे, असा अंदाज बांधण्यात येतो.



इटायिन प्रवासी डेलाव्हॅली यांनी या मंदिरास इ.स.१६२५ साली भेट देऊन या मंदिराचा उल्लेख 'अतिशय पूजनिय मानलेले देवालय', असा केला आहे. श्री रामेश्वर हे स्वयंभू देवस्थान असल्याने तेथे त्या काळी गावकऱ्यांनी सर्व साधारण घुमट बांधलेली नोंद सापडते. तसेच, आजूबाजूचे मंदिर हे गवताचे, छपराचे शाकारलेले असल्याचे नोंद ग्रुपग्रामपंचायत चौल दत्परी असेंसमेंट ५६७ ने आजमितीस आहे, हे विशेष होय; परंतु, हे मंदिर कोणी व केव्हा बांधले यांचा उल्लेख मिळत नाही. तसेच, मंदिराची अनेकदा दुरुस्ती झाल्याचे देखील आंग्रेकालीन उल्लेख आहेत.

महाशिवरात्रीनिमित्त श्रीरामेश्वर मंदिरात मोठा उत्सव साजरा होतो. यानिमित्त मंदिर परिसरात पाच दिवस यात्रा भरत असून असंख्य भक्त दर्शनासाठी येत असतात.

### त्रिपुरा पौर्णिमेच्या दिवशी दीपोत्सव

मंदिराला लागून सभामंडप असून तो दुमजली आहे. त्यासाठी श्री जोशी व बर्वे कुटुंबीयांनी अर्थ सहाय्य केल्याची नोंद आजही उत्तरेकडील दरवाज्याच्या खांबावर आढळून येते. मंदिर परिसरात मंदिरासमोर नंदी असून त्यावर एक भव्य मोदकाकृती दीपमाळ आहे. समोरील तुलसी वृंदावनाजवळ एक छोटी दीपमाळा आहे. महाशिवरात्रीच्या दिवशी व त्रिपुरा पौर्णिमेचे दिवशी मंदिरात दीपोत्सव साजरा केला जातो. दीपपूजा करण्याचा मान जयंत जोशी यांचा असून ब्रह्मवृंद म्हणून रघुनाथ पाडुरंग पिटकर हे काम पहातात.

### श्रावणात अखंड हरिनाम सप्ताह

मंदिराच्या पाठीमागील बाजूस सरखेल कान्होजी आंग्रे यांची अलिबागमधील समाधीसारखी प्रतिकृती समाधी आहे. समाधीजवळ चबुतरे कृती गोलाकार थडगी आहेत. महाशिवरात्र व त्रिपौर्णिमेची दिवशी रेवदंडामधील मुकादम व खोत कुटुंबीयांना येथे दीप लावण्याचा मान आहे. मंदिराचे आग्नेपय बाजूस बाहेर श्री सटवाई मातेचे स्थान आहे. तर आंग्राय दिशेस श्री विठ्ठल रखुमाई असून, जवळ जय विजय दोन गणपती आहे. मंदिराच्या उत्तनरेस आशापुरी मातेचे मंदिर असून ती पार्वती रूपात आहे. बाजूला नवग्रह आहेत. श्रीरामेश्ववर मंदिरात श्रावण पहिला सोमवार ते दुसरा सोमवार अखंड हरिनाम सप्ताह असतो. सप्ताहाची समाप्ती झाल्यावर श्रीरामेश्वराचा छबिना निघतो, तसेच महाशिवरात्र व त्रिपुरा पौर्णिमेच्या दिवशी रात्री श्रीचा छबिना असतो.

### महाशिवरात्रीला पाच दिवस यात्रा

महाशिवरात्रीला रामेश्वसरला पाच दिवस यात्रा भरत असते. मंदिराला देणग्या देण्याची पूर्वपार पद्धत आढळते. पुर्वाभिमुख असलेल्या रामेश्वर मंदिराचा गाभारा सुमारे ४.४२ बाय ४.४२ मीटर असून मध्यभागी १.५० मीटर लांब रूंद व जमिनीपासून थोडी उंच पितळी पत्र्याचे मढवलेली शाळुंका आहे. तिच्या मध्यभागी नेहमीप्रमाणे उंची लिंग नसून चौकोनी खड्ड्यात स्वयंभू मानलेले शिवस्वरूप आहे. गाभाऱ्यात संगमवरी फरशी आहे. गाभाऱ्याच्य जमिनीपासून सुमारे ७.६२ मीटर उंच असलेल्या शिखराचे व संपूर्ण गाभाऱ्याचे बांधकाम दगडी आहे. गाभाऱ्याची संपूर्ण इमारत स्वतंत्र असून ती बाहेरील उंच शिखर असलेल्या घडीव दगडी मंदिरात सामाविष्ट आहे. गाभाऱ्याच्या इमारती पुढील भाग मोठा असून त्यास सभामंडप म्हणतात. याच मंडपात वरील वर्णन केलेली तीन कुंडे आहेत. सभामंडपात प्रवेश करण्यासाठी दर्शनी भिंतीत मध्यभागी मोठा दरवाजा आहे. घडीव दगडात बांधलेले हे मंदिर हेमाडपंथी पद्धतीसारखे वाटते.

# कडाव बसथांब्यावर अनधिकृत टपरी

## तोडलेले अतिक्रमण पुन्हा उभे ; प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

**कडाव गावातील एसटी महामंडळाच्या शासकीय प्रवाशी बस थांब्याच्या जागेवर पुन्हा एकदा अनधिकृत टपरी उभी करण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. त्यामुळे ग्रामपंचायत व एसटी प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.**

सुमारे दहा ते बारा वर्षांपूर्वी कडावगावातीलएसटीमहामंडळाचा अधिकृत बस थांबा तोडून त्या ठिकाणी अनधिकृत दुकानांचे गाळे उभारण्यात आले होते. परिणामी शालेय विद्यार्थी, महिला, वयोवृद्ध नागरिक तसेच भाविक भक्त यांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत होते. हे अनधिकृत बांधकाम हटवून त्या ठिकाणी पुन्हा शासकीय एसटी बस थांबा उभारण्यात यावा, यासाठी सामाजिक कार्यकर्ते प्रभाकर गंगावणे यांनी सातत्याने शासन दरबारी पाठपुरावा केला. कोरोना महामारीच्या काळात हा पाठपुरावा काही काळ स्थगित झाला होता. मात्र, महामारी संपल्यानंतर त्यांनी पुन्हा या विषयावर पाठपुरावा सुरू केला.


(छायाचित्र: संजय गायकवाड)

त्यांच्या या लढ्याला कर्जत प्रेस असोसिएशन व कर्जत प्रेस क्लब यांची साथ लाभली. तालुक्यातील पत्रकारांनी दि.२४ जुलै, २०२५ रोजी कडाव ग्रामपंचायतीच्या आवारात लाक्षणिक उपोषण करून प्रशासनाचे लक्ष वेधले. त्यानंतर दि. २६ जुलै २०२५ रोजी पोलीस बंदोबस्तात बसथांब्यावरील अनधिकृत बांधकाम हटवण्यात आले. त्यानंतर एसटी महामंडळाने कडाव येथे सुसज्ज प्रवाशी बस थांबा उभारण्यासाठी सुमारे २१ लाख १३ हजार ०७८ रुपये खर्चाचा प्रस्ताव शासनाकडे पाठवला असल्याची माहिती मिळाली आहे.

मात्र, हे बांधकाम हटवून काही महिन्यांतच अनधिकृत बांधकाम करणाऱ्या विनोद काशिनाथ पवाळी यांनी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या आचारसंहितेचा गैरफायदा घेत मध्यरात्रीच्या सुमारास पुन्हा त्याच जागेत टपरी उभी करण्याचा प्रयत्न केला आहे. या प्रकारामुळे ग्रामपंचायत, एसटी महामंडळ तसेच न्यायव्यवस्थेचा अवमान झाल्याची भावना व्यक्त होत आहे. सामाजिक कार्यकर्ते प्रभाकर गंगावणे यांनी संबंधित टपरी तात्काळ हटवून भारतीय न्याय संहितेच्या संबंधित कलमांन्वये कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. दरम्यान, या प्रकरणी कडाव ग्रामपंचायत व एसटी प्रशासन नेमकी काय भूमिका घेते, याकडे गावकऱ्यांचे लक्ष लागले आहे. पुन्हा एकदा अतिक्रमणाच्या प्रकारामुळे गावात संतापाची लाट उसळली असून, प्रशासनाने तातडीने कारवाई न केल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा दिला जात आहे.

## निवडक

### जनार्दन पाटील यांचे मरणोत्तर अवयव दान



**रसायनी :** भोकरपाडा येथील जनार्दन दुंद्या पाटील यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने पाटील कुटुंबावर शोककळा पसरली असून संपूर्ण परिसरातून हळहळ व्यक्त होत आहे. त्यांचे निधन होताच जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्रमहाराजांच्या प्रेरणेने कुटूंबियांनी त्यांचे लक्ष्मी आय बॅंक येथे नेत्रदान केले. त्यांचा दशक्रिया विधी शनिवारी (दि.२१) श्रीक्षेत्र उद्धर रामेश्वर येथे होणार असून उत्तरकार्य रविवारी (दि.२२) भोकरपाडा येथील राहत्या घरी होणार आहेत. यावेळी सकाळी १० वाजता संजय वारस्कर यांचे प्रवचन होणार असल्याचे पाटील कुटुंबीयांकडून सांगण्यात आले आहे.

### अंनिसतर्फे कवी संमेलनाचे आयोजन

**रसायनी :** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती मोहोपाडा-रसायनी शाखेतर्फे मार्चच्या शेवटच्या आठवड्यात कवी संमेलन आयोजित करण्यात आले आहे. खालापूर तालुक्यातील कवींनी कवी संमेलनात सहभागी व्हावे, असे आवाहन महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती मोहोपाडा-रसायनी शाखेतर्फे करण्यात आले आहे. कविता ही स्वरचित असावी. अंधश्रद्धा निर्मूलन आणि सामाजिक आशयाच्या कविता असाव्यात. कविता १२ ते १५ ओळींची असावी. ती कुठेही प्रकाशित झाली नसावी. सर्वोत्कृष्ट तीन कविता महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका या मासिकात प्रसिद्ध करण्यात येतील. सहभागी कवींना प्रमाणपत्र देण्यात येतील. या बाबतीत अंतिम निर्णय परिक्षकांचा असेल. कविता पाठवण्याची अंतिम मुदत दि.२८ फेब्रुवारी आहे. अधिक माहितीसाठी रोहिदास कवळे यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



### बाळसई येथील हृदय तपासणी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**सुकेळी :** रोहा तालुक्यातील नागोठण्यातील जिंदल कंपनीच्या समुहाअंतर्गत असलेल्या बी.सी.जिंदल रुग्णालयाच्या सौजन्याने व बाळसई गावचे अध्यक्ष मधुकर ठमके यांच्या सहकार्याने बुधवारी (दि.११) बाळसई गावामध्ये हृदय तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये एकुण ९५ नागरीकांनी लाभ घेत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या शिबिरामध्ये जिंदल रुग्णालयातील डॉ. मनिष रायकवार यांच्यातर्फे नागरीकांची मोफत तपासणी करण्यात आली. या शिबिरामध्ये नागरीकांची ईसीजी, रक्तदाब तपासणी, रक्तातील साखरेचे प्रमाण तपासून मोफत औषधे देण्यात आली. यावेळी डॉ. मनिष रायकवार, मधुकर ठमके, विठ्ठल म्हसकर, सचिन भोसले, दत्ताराम पाटेकर, प्रदिप ठमके, वसंत भोसले, भिकाजी पवार, हनुमान मुंडे, हरेष ठमके, भालचंद्र जाधव, जिंदल रुग्णालयाचे व्यवस्थापक कमलेश अस्थांना, किरण सुटे, दिनेश ठमके, मोहीनी जांबेकर, अदिती जंगम, शीबा वर्गीस, केतकी पार्टे, मनिष डांगी, रामदुल्हारे, संदिप चाळके, संतोष शिर्के व यशवंत वारगुडे आदी कर्मचारी उपस्थित होते.



### प्रवेशद्वार स्वच्छतेसाठी सरसावले हात

**दिघी :** देशभरात नावारूपाला आलेल्या, दिवेआगर पर्यटन स्थळाला जोडणाऱ्या रस्त्याला कचऱ्यामुळे विद्रुपीकरण आले होते. प्रवेशद्वारातील कचरा समस्येने शहराला बकाल स्वरूप येण्याआधी दिवेआगरमधील गावकऱ्यांचे हात स्वच्छतेसाठी सरसावले आहेत. श्रीवर्धन तालुक्यातील दिवेआगर पर्यटन स्थळाला जोडणारे तीन रस्ते सुस्थितीत असून, प्रत्येक रस्त्याला खाडी, समुद्रकिनारा तसेच डोंगरदऱ्यांनी वेढले आहे. त्यामुळे येथे येणाऱ्या पर्यटकांना एक वेगळच निसर्गरम्य वैशिष्ट्यपूर्ण प्रवास अनुभवता येत आहे. त्यामुळे अशा प्रसिद्ध पर्यटनाला नेहमीच रेलचेल दिसून येते. पर्यटकांचे स्वागत करणारे रस्ते व परिसर स्वच्छ असणे हे वैयक्तिक व सामूहिक दृष्टीने महत्वाचे आहे. समुद्रकिनारा व आसपासचा परिसर स्वच्छ करुन वेळोवेळी प्रत्यक्ष कृतीद्वारे स्वच्छतेचा संदेश दिला आहे. पर्यावरण पुरक भुमिका सदैव घेत असून, त्या नुसार आम्ही हा रस्ता स्वच्छ केला असल्याचं नागरिकांनी यावेळी सांगितले.



### वणव्यांमुळे गुरांच्या चाऱ्याचा प्रश्न ऐरणीवर

**पाताळगंगा :** खालापूर तालुक्यात जिकडे-तिकडे वणवा लागत असल्यामुळे जंगलांसह गुरांच्या चाऱ्याचा प्रश्न ऐरणीवर येत चालला आहे. जंगले ही आपली खरी संपत्ती मानली जाते. या ठिकाणी मोठ्या प्रमाणात वृक्ष असतात. ही झाडे लागवडी पासून मोठी होईपर्यंत खूप कालावधी लोटला जातो. मात्र, वणव्यांच्या प्रकोपाने यावरती विपरीत परिणाम होत असतो. तसेच, येथील मोठ्या वृक्षांवर पक्ष्यांची घरटी असतात. त्यात त्यांची अंडी व पिल्ले देखील असतात. त्याचबरोबर जंगलात औषधी वनस्पती मोठ्या प्रमाणात असतात. मात्र, या वणव्यांमध्ये सुखलेले गवत, औषधी वनस्ती व पक्ष्यांची घरटी होरपळून निघत आहेत. हे वणवे विझविण्याचे कष्ट काही मोजकेच जण घेत असल्याचे पहावयास मिळत आहे. परिणामी वणवा ही आजची डोकेदुखी ठरत आहे. यावरती ठोस पाऊल उचलणे गरजेचे असल्याचे निसर्ग प्रेमींकडून बोलले जात आहे.

## बीएसएनएल ५-जी सुरू करण्याची मागणी

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

राज्य सरकार व केंद्र सरकारने ३५० पेक्षा जास्त ऑनलाईन सेवा सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. परंतु, त्यांचा खेडो-पाडी वापर करण्यासाठी आधुनिक ५जीचे मोबाईल नेटवर्क उपलब्ध करून दिले नाही.

आता रायगड जिल्ह्यातील शासनाच्या मालकीची असलेल्या बीएसएनएलच्या मोबाईल टॉवरवर वोडाफोन आयडिया, एअर टेल व जीयो सारख्या खासगी कंपनीचा एन्टीना बसवून त्यांना मार्केटिंग करण्यासाठी संधी दिल्या आहेत. त्यामुळे बीएसएनएलचे २जी/३जीचे काल बाह्य झालेले नेटवर्क अधून मधून काही ठिकाणी मिळते.

त्यामुळे ते सटेलाईट द्वारे उपलब्ध करून देण्यात यावे आणि शासनाच्या मालकीची असलेली बीएसएनएलचे मोबाईल नेटवर्क सर्व ठिकाणी लवकरात लवकर ५जी चालू करण्यात यावे. केंद्र सरकारने ५जीचे नेटवर्क थेट सर्व ठिकाणच्या मोबाईल धारकांना मिळेल अशी सक्षम व्यवस्था करावी, अशी मागणी माथेरानमधील सामाजिक कार्यकर्ते जनार्दन पारटे यांनी केली आहे.

## मुख्यध्यापकाचा मनमानी कारभार

**रसायनी :** लोधिवली येथील सेंट जोसेफ शाळेत अनेक मराठी शिक्षक आहेत. त्यांची कोणतीही चूक नसताना त्यांना येथील मुख्यध्यापकांनी निलंबित करीत असल्याचे पत्र दिले. त्यामुळे मराठी शिक्षकांच्यात एकच खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे या पत्रावर शिक्का असून सही नाही, अशाच प्रकारचे पत्र जिल्हा शिक्षण अधिकारी व तालुका शिक्षण अधिकारी यांना दिल्याचे समजले आहे. याबाबत स्थानिक पत्रकार अर्जुन कदम यांनी जिल्हा शिक्षण अधिकारी यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी हे खरे असल्याचे सांगितले.

## शिवजयंतीनिमित्त महारक्तदान शिबीर

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगावातील शिवजयंती उत्सव व रक्तदान शिबीर सेवाभावी संस्थेच्यावतीने के.ई.एम. रुग्णालय परळ-मुंबई यांच्या सौजन्याने व विशेष सहकार्याने शिवजयंती निमित्त शुक्रवारी (दि.१३) महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. हे शिबीर माणगावातील सिद्धीनगर येथील सरलादेवी मंगल कार्यालय सभागृहात पार पडले. या महारक्तदान शिबिरात १७७ रक्तबॅगा संकलित करण्यात आल्या. या उपक्रमाला माणगावकरांचा उत्स्फुर्त प्रतिसाद लाभला. विशेष करून विद्यार्थिनी व महिला यांनीही या उपक्रमात सहभाग घेऊन उत्स्फूर्तपणे रक्तदान केले. संस्थेच्या या सेवाभावी उपक्रमाचे उपस्थित मान्यवरांनी भरभरून कौतुक केले.



या रक्तदान शिबिराचे उद्घाटन संस्थेचे उपाध्यक्ष तथा विवा कॉलेजचे प्राचार्य विवेक ढेपे व संस्थेच्या सल्लागार विवा कॉलेजच्या चेअरमन विनया ढेपे यांच्याहस्ते करण्यात आले. या कार्यक्रमास उपस्थित सर्व मान्यवरांचे व रक्तदात्यांचे तसेच देणगीदार, हितचिंतक यांचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सलीम शेख, रक्तदान शिबीर समिती अध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार प्रभाकर मसुरे व सर्व सहकारी पदाधिकारी व सभासद यांनी स्वागत करून सर्वांचे विशेष आभार व्यक्त केले. या सेवाभावी उपक्रमास सामाजिक कार्यकर्ते संजय साबळे, पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे, केईएम रुग्णालयाचे समाज विकास अधिकारी डॉ. प्रकाश सावंत, माजी नगराध्यक्ष आनंद यादव, उपनगराध्यक्षा रिया उभारे आदींसह अनेक मान्यवरांनी भेट देऊन संस्थेला भरभरून शुभेच्छा देत कौतुक केले.



● पनवेलमध्ये शनिवारी (दि.१४) वेलेनटाईन डे निमित्त प्रेमाचा अनोखा आविष्कार पाहायला मिळाला. प्रेम फक्त प्रियकर-प्रेयसीपुरते मर्यादित नसून कुटुंब, आई-वडील आणि आपल्या आराध्य दैवतांप्रतीही असते, याची जाणीव तरुणाईने करून दिली आहे. पनवेल येथील अश्वारूढ शिवरायांच्या पुतळ्यास कॉलेजमधील तरुणींनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. छत्रपतींच्या चरणी नतमस्तक होत आशीर्वाद घेत प्रेमाचा दिवस साजरा करण्यात आला. (छायाचित्र: राजेश डांगळे)

## महाशिवरात्रीचा कार्यक्रम

**माणगाव :** माणगावकरांचे श्रद्धास्थान असलेल्या संगमेश्वर मंदिरात सालाबादप्रमाणे यावर्षीही महाशिवरात्रीनिमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. आज दि.१५ फेब्रुवारी रोजी पहाटे ४ ते ६ वाजता अभिषेक, त्यानंतर सकाळी ७ वाजल्यापासून संपूर्ण दिवसभर दर्शनासाठी मंदिर खुले राहणार असून सायंकाळी साडेसात वाजता महाआरती घेण्यात येणार आहे. काळ आणि गोदनदीच्या संगमावरील श्री संगमेश्वर देवस्थानच्या मंदिराच्या जिर्णोद्धारामुळे व मूर्त्यांच्या प्राणप्रतिष्ठापनेमुळे माणगाव गावाला धार्मिकदृष्ट्या महत्व प्राप्त होत आहे.



## ज.ने. पोर्ट विद्यालयाचा स्नेहसंमेलन सोहळा

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण-शेवा येथील आर. के.एफ.ज.ने. पोर्ट विद्यालयाचा बक्षीस वितरण व स्नेहसंमेलन सोहळा मोठ्या थाटात संपन्न झाला. या शानदार सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून जेएनपीएचे विश्वस्त दिनेश पाटील, रविंद्र पाटील व पंचायत समिती उरणच्या गटशिक्षणाधिकारी निर्मला घरत उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या सुरूवातीला शाळेच्या वर्षभरातील सहशालेय उपक्रम, विशेष स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांना मिळालेली बक्षिसे आणि शाळेच्या अष्टपैलू कामगिरीच्या कार्य अहवालाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांना बक्षिसे प्रदान करण्यात आली.

मान्यवरांनी आपल्या भाषणातून विद्यार्थी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी आणि पालकांचे विशेष अभिनंदन करुन कौतुक केले. आम्ही भविष्यात शाळेच्या आणि कर्मचारी यांच्या पाठिशी खंबीरपणे उभे राहून शाळेला गतवैभव प्राप्त करून देऊ, असे प्रेरणादायी मार्गदर्शन केले. यावेळी शाळेच्या पालक शिक्षक संघाचे उपाध्यक्ष अविनाश म्हात्रे, केवल गावंड, माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक गिरीश पाटील, भुषण जाधव, अंकुश जोगळे, मुख्याध्यापिका वैशाली बोरचटे, आर.के.एफ. संस्थेचे पदाधिकारी सना खान, प्रितेश पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शाळेच्या तिन्ही विभागाचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, आर. के.एफ. व्यवस्थापन पदाधिकारी, शालेय सफाई महिला कर्मचारी आणि जे. एन. पी. ए. मेंटेनन्स सर्व विभागातील कर्मचारी यांनी विशेष मेहनत घेतली. सर्व वर्ग शिक्षक, स्पेशल शिक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी सदर केलेले सर्वच सांस्कृतिक कार्यक्रम एकापेक्षा एक असे दर्जेदारपणे सादर झाले.

## वाढत्या उष्णतेमुळे बागायतदार चिंतेत

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

श्रीवर्धन तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून हवामानात अचानक बदल झाल्यामुळे बागायतदार चिंतेत सापडले आहेत. थंडी पूर्णपणे कमी झाली असून दिवसा उन्हाचा कडाका वाढू लागला आहे. वाढत्या उष्णतेमुळे आंबा बागांमध्ये मोहर करपण्यास सुरुवात झाली आहे.

डिसेंबर महिन्यात योग्य प्रमाणात थंडी पडल्याने आंबा झाडांना चांगला मोहर आला होता. त्यामुळे



बागायतदारांना समाधानकारक उत्पादनाची अपेक्षा होती. मात्र, जानेवारी अखेरपासून हवामानातील बदलामुळे परागीकरणावर परिणाम झाला असून त्यातच काही भागात पुनर्मोहर दिसून आला आहे. याआधी आलेली फळधारणा देखील कमी झाली आहे. सध्या अचानक वाढलेल्या तापमानामुळे झाडांवरील शिल्लक मोहर काळवंडत असून लहान फळे पिवळी पडून गळत आहेत. त्यामुळे उत्पादन घटण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तसेच, थ्रीप्स व तुडतुडा यांसारख्या किडींचा प्रादुर्भाव वाढल्याने शेतकऱ्यांना महागड्या औषध फवारण्या कराव्या लागत आहेत. मात्र, त्यावर पूर्ण नियंत्रण मिळत नसल्याचे बागायतदार सांगत आहेत.

तालुक्यात आंबा पिकाचे उत्पादनक्षम क्षेत्रफळ १,९१० हेक्टर इतके आहे. त्यामध्ये ९० टक्के हापूस तर त्या खालोखाल पायरी व केसर आंब्याची लागवड बागायतदारांनी केली आहे. डोंगरउताराच्या तसेच वरकस जमीन आंबा पिकासाठी योग्य आहेत. पोषक हवामान व झाडांची निगा यावर मोहोर अवलंबून असतो.

महाराष्ट्र स्टील कंपनीचा नवा आदर्श

अठरा शाळांचा कायापालट

## ग्रामीण भागातील शिक्षणाला पोस्कोची साथ

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

केवळ औद्योगिक प्रगती म्हणजे विकास नव्हे, तर समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत शिक्षणाची ज्योत पोहोचवणे हीच खरी प्रगती. हा विचार प्रत्यक्षात उतरवत पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनीने माणगांव तालुक्यात सामाजिक बांधीलकीचा नवा आदर्श घालून दिला आहे. कंपनीच्या उपक्रमांतर्गत माणगाव तालुक्यातील जिल्हा परिषद उतेखोल आदिवासीवाडी आणि चव्हाणवाडी या शाळा मिळून १६ जिल्हा परिषद शाळांचे नूतनीकरण, २ शाळांचे संपूर्ण बांधकाम आणि




सुविधांचे उन्नतीकरण यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आले आहे. त्यामुळे दुर्गम भागातील अनेक ग्रामीण विद्यार्थ्यांना आता सुरक्षित, स्वच्छ आणि प्रेरणादायी वातावरणात शिक्षण घेता येणार आहे.

या प्रकल्पांतर्गत नूतनीकरण करण्यात आलेल्या दोन शाळांचा लोकार्पण सोहळा गुरुवारी (दि. १२) पार पडला. यावेळी पोस्को महाराष्ट्र स्टीलचे संचालक वॉन क्यू हान यांनी उपस्थितांशी संवाद साधला. आपल्या भाषणात त्यांनी शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, शिक्षण हीच उज्ज्वल भविष्याची खरी गुरुकिल्ली आहे. मुलांसाठी एक सुरक्षित आणि उत्तम शैक्षणिक वातावरण निर्माण करताना आम्हाला अभिमान वाटत आहे. हा प्रकल्प केवळ आमचा नसून ग्रामस्थ, शाळा प्रशासन आणि आमच्या टीमच्या एकत्रित परिश्रमाचे फळ आहे. पोस्को महाराष्ट्र स्टील केवळ शिक्षणापुरते मर्यादित न राहता, माणगांव तालुक्यातील गावांच्या सर्वांगीण विकासासाठी तत्पर असल्याचेही हान यांनी स्पष्ट केले.

या उपक्रमांतर्गत शाळांमध्ये केवळ डागडुजी न करता विद्यार्थ्यांच्या मूलभूत गरजांवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. मुला-मुलींसाठी स्वच्छतागृहांची दुरुस्ती, शाळेच्या आवारात सुरक्षिततेसाठी मजबूत गेट्स आणि खिडक्यांना ग्रील्स बसवण्यात आले आहेत. संपूर्ण शाळेची रंगरंगोटी करून शैक्षणिक वातावरण प्रसन्न करण्यात आले आहे. या सोहळ्याला वरिष्ठ अधिकारी राजू गडुते आणि सी.एस. आर. टीम, तसेच शिक्षक, ग्रामस्थ, पालक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१५ फेब्रुवारी

१) पुष्पलता रमेशचंद्र चोपडा
अलिबाग, १५-२-१९५२

# झाडांवर खिळे ठोकून सुचना फलक

## • ठेकेदाराच्या बेजबाबदारपणावर नागरिकांमध्ये संतापाची लाट

| नवी मुंबई | प्रतिनिधी |

नवी मुंबई महानगरपालिका शहर सुशोभीकरण आणि दर्जेदार नागरी सुविधा देण्याचा दावा करणाऱ्या कामांमध्ये प्रत्यक्षात किती हलगर्जीपणा चालतो, याचे धक्कादायक उदाहरण जुईनगर सेक्टर २५ परिसरात समोर आले आहे. जुईनगर रेल्वे फाटक ते राजीव गांधी ब्रिज दरम्यान सुरू असलेल्या रस्त्याच्या डांबरीकरणाच्या कामात संबंधित ठेकेदाराने अक्षरशः पर्यावरण आणि नियमांना तिलांजली दिल्याचे दिसून येत आहे.

या कामाचा ठेका 'ए आय सी मुंबई' या कंपनीला देण्यात आला आहे. मात्र कामाच्या ठिकाणी सुरक्षेची आणि शिस्तीची कोणतीही काळजी न घेता "Work in Progress' चे फलक थेट रस्त्यालगतच्या झाडांवर खिळे ठोकून लावण्यात आले आहेत.




नागरी कामांसाठी वापरले जाणारे तात्पुरते स्टँड किंवा बॅरिकेड्स वापरण्याऐवजी झाडांना खिळे ठोकणे हे केवळ निष्काळजीपणा नव्हे, तर पर्यावरणाविरोधातील उघड बेदरकार वृत्ती असल्याची भावना स्थानिक नागरिक व्यक्त करत आहेत. पर्यावरण तज्ज्ञांच्या मते, झाडांमध्ये खिळे ठोकल्याने त्यांच्या खोडांना जखमा होतात, बुरशी व किडींचा प्रादुर्भाव वाढतो आणि झाडे हळूहळू सुकण्याचा धोका निर्माण होतो. शहरात आधीच हरित पट्टा कमी होत असताना महानगरपालिकेच्या देखरेखीखालीच अशा प्रकारे झाडांची हानी होणे अत्यंत चिंताजनक आहे.

### दंडात्मक कारवाईची मागणी

महानगरपालिकेने तात्काळ या प्रकाराची चौकशी करून जबाबदार ठेकेदारावर आणि कामांवर देखरेख करणाऱ्या अभियंत्यांवर दंडात्मक कारवाई करावी, तसेच पुढील कामांमध्ये अशा घटना पुन्हा होऊ नयेत यासाठी कडक मार्गदर्शक सूचना जारी कराव्यात, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून जोर धरत आहे.नागरी विकासाच्या नावाखाली झाडांची हानी आणि निष्काळजीपणे कामे सुरू राहिली, तर 'स्मार्ट सिटी'चा दावा केवळ कागदावरच राहील, अशी तीव्र प्रतिक्रिया असणाऱ्या आशयाचे पत्र मनसेचे जुई नगर येथील आरोग्य सेवक अजय मोरे यांनी मनपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांना तक्रार स्वरूपात दिले आहे.

# शितळादेवी मंदिराच्या वर्धापन दिनाचे आयोजन

| रेवदंडा | प्रतिनिधी |



ग्रामदैवत मानल्या जाणाऱ्या शितळादेवीच्या वर्धापन दिनानिमित्त फाल्गुन शुद्ध दुर्गाष्टमी, मंगळवार (दि.२४) फेब्रुवारी रोजी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या दिवशी मोठ्या संख्येने भाविकांनी उपस्थित राहून दर्शन व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. वर्धापन दिनानिमित्त पहाटे सकाळी ५.३० वाजता देवीचा स्नानविधी होणार असून पारंपरिक विधी-विधानांनुसार पूजाअर्चा केली जाणार आहे. गावातील ग्रामस्थ तसेच बाहेरगावाहून येणारे भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित राहतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. मंदिर परिसरात स्वच्छता, सुव्यवस्था व भाविकांच्या सोयीसाठी विशेष नियोजन करण्यात आले आहे. हा वर्धापन दिन सोहळा श्री शितळादेवी जिर्णोद्धार मंडळ व ग्रामस्थ मंडळ, चौल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला आहे. परंपरा, श्रद्धा आणि भक्तिभावाचा संगम असलेला हा सोहळा दरवर्षी मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. महापर्वणीच्या या पावन दिवशी सर्व भाविकांनी देवीचे दर्शन घेऊन महाप्रसादाचा लाभ घ्यावा, अशी विनंती आयोजकांनी केली आहे.


## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क-** ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)

- मुख्य संपादक, कृषीवल


## बीएसएनएलची सेवा सुरु करण्याची मागणी

**कर्जत :** राज्य सरकार व केंद्र सरकारने ३५० पेक्षा जास्त ऑनलाईन सेवा सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. परंतु त्यांचा खेडो-पाडी वापर करण्यासाठी आधुनिक ५ जी चे मोबाईल नेटवर्क उपलब्ध करून दिले नाही. ते सटेलाईट द्वारे उपलब्ध करून देण्यात यावे आणि शासनाच्या मालकीची असलेली बीएसएनएलचे नेटवर्क सर्व ठिकाणी लवकरात लवकर चालू करण्यात यावे. अशी मागणी माथेरानमधील सामाजिक कार्यकर्ते आणि जनार्दन शंकर पारटे यांनी केली आहे.

# रावे येथे विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ



| पेण | प्रतिनिधी |

सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या सार्वजनिक विद्यामंदीर रावे येथे १० वी च्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ अर्थातच आशीर्वाद प्रदान सोहळयाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून पेण एज्युकेशन सोसायटीची अध्यक्ष ॲड. मंगेश नेने व संतोष पाटील उपस्थित होते. त्याचप्रमाणे ग्राम प्रसारक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष बी.आर. पाटील, अरुण पाटील, एस. आर. शेंडगे आदी उपस्थित होते. यावेळी प्रथम पाहुण्यांचे विद्यार्थ्यांनी स्वागत गीत गाऊन यथोचित स्वागत केले. त्यानंतर विद्येची देवता माता सरस्वतीचे पुजन केले त्याचप्रमाणे दिपप्रज्वलन केले. यावेळी १० वीच्या विद्यार्थ्यांना एम. टी. पाटील, पाटील, मुख्याध्यापक शेंडगे यांनी मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे संतोष पाटील यांनी भुमिती या विषयाचे मार्गदर्शन केले. तर मुख्य अतिथी ॲड. मंगेश नेने यांनी भविष्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांनी कशी तयारी करायची याविषयी मार्गदर्शन केले. सेवा निवृत्त पोलीस अधिकारी बी.आर. पाटील यांनी जिवनामध्ये शिस्त किती महत्वाची आहे याविषयावर मार्गदर्शन केले. त्यानंतर आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## दुरटोलीत मंदिराचा जीर्णोद्धार

| सुतारवाडी | प्रतिनिधी |

रोहा तालुक्यातील अनेक मंदिरांपैकी दुरटोली तालुका रोहा येथील स्वयंभू शंकर मंदिर हे मंदिर अगदी निसर्गाच्या कुशीत वसले असून अनेक पिढ्यांना साक्ष देणारे हजारो भाविकांचे श्रद्धास्थान आहे. या मंदिरात दशक्रोशीतील भाविक नित्यनेमाने दर्शनासाठी येत असतात. श्रावण महिन्यात येथील मंदिरात भाविकांची गर्दी असते. सुमारे शंभर वर्षांपूर्वी निसर्गाच्या सानिध्यात शिव शंकराचे मंदिर येथील पंचक्रोशी भक्तांच्या संकल्पनेतून आणि खा. सुनील तटकरे यांचे वडील दत्ताजीराव तटकरे यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली बांधण्यात आले होते. या मंदिरामध्ये पूर्वी पुरातन विविध देव देवतांच्या दगडी मूर्ती होत्या. मात्र या मंदिराचे काही महिन्यापूर्वी जीर्णोद्धार झाले आहे.

## भुवनेश्वर मंदिरात विविध कार्यक्रमांचे आयोजन

| सोगाव | प्रतिनिधी |

भुवनेश्वर मंदिर ट्रस्ट, १८ गाव समिती, चिंचवली-नारंगीतर्फे रविवारी (दि.१५) फेब्रुवारीस श्रीक्षेत्र भुवनेश्वर मंदिरात सालाबादप्रमाणे यंदाही महाशिवरात्र उत्सव साजरा होत आहे. यानिमित्ताने ट्रस्टतर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन केल्याची माहिती ट्रस्टचे अध्यक्ष दीपक पाटील यांनी दिली. याप्रसंगी इयत्ता दहावी व बारावी परिक्षेत प्रथम व द्वितीय क्रमांकाने उतीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात येणार आहे, तसेच १८ गावांच्या हद्दीत नागरिकांना २४ तास तत्पर वैद्यकीय सेवा देणारे वैद्यकीय अधिकारी त्याचबरोबर महिला वैद्यकीय अधिकारी, कला व क्रीडा क्षेत्रात विशेष प्राविण्य मिळविलेल्याचा गुणगौरव होणार आहे. याशिवाय संगीत भजनांचे कार्यक्रम व सौरऊर्जा जनित्र उपकरणाचे लोकार्पण मंगल ठाकूर यांच्या हस्ते होणार आहे.

दरम्यान, सकाळी साडेसहा ते नऊ या काळात वाघ्रणचे विठ्ठल प्रासादिक भजन मंडळ, तसेच माणकुले येथील श्रीदत्तकृपा प्रासादिक महिला भजन मंडळातर्फे भजने सादर होणार आहेत. सकाळी साडेनऊ वाजता सौरऊर्जा जनित्र लोकार्पण सोहळा पार पडणार आहे. सकाळी साडेदहा ते दुपारी साडेबारा या दरम्यान गुणगौरव सोहळा होणार आहे. दुपारी पावणेएक ते सायंकाळी चार या दरम्यान जय भवानी मंडळ, रामपाडा-वैजाली-हाशिवरे यांचे सुमधुर भजन व बालकलाकर यांचे किलबील गुंजन होणार आहे.

## मुलांचा जीव मुठीत घेऊन प्रवास

| रसायनी | प्रतिनिधी |

दांड-रसायनी या मार्गावर भटवाडी रिस रस्त्यालगत प्राथमिक तसेच माध्यमिक शाळा, आरोग्य केंद्र बॅका, रस्त्याच्या दोन्ही बाजूला दुकाने असून शाळेत जाताना शाळकरी मुले पायी चालत जाणे पसंद करीत असतात. मागील काही महिन्यापूर्वी या रस्त्यावर अपघाताचे प्रमाण वाढत असल्यामुळे पालकांच्या मनात आपल्या पाल्यांविषयी भीती निर्माण होत असून, मुलगा शाळेत पोहचेपर्यंत ते घरी येईपर्यंत पालक भीतीच्या छायेखाली असल्याचे मत पालक वर्ग करीत आहे. या मार्गावरून पाताळगंगा औद्योगिक क्षेत्राकडे जाणाऱ्या वाहनांची रहदारी सुरु असतात. यावेळी दांडमार्गे रिस मोहोपाडा दिशेने येणारी वाहने सुसाट चालवली जात असल्याने अपघातांना आमंत्रण मिळत आहे.

# साप्ताहिक राशिभविष्य १६ ते २२ फेब्रुवारी २०२६

ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग
मोबा.९४०४७९१७९८

### प्रयत्नशील राहणे आवश्यक

**मेष :** राशीधारकांना या सप्ताहात आपण आपल्या भविष्याचा विचार करण्यापेक्षा वर्तमानकाळातील गोष्टींसाठी त्याचा योग्य विचार करून वागणे अधिक ठीक राहील. नोकरदारांना दिलासा मिळेल, मात्र सरकारी नियम व कायदा यांचे कटाक्षाने पालन करा. सर्व बाबतीत प्रयत्नशील राहणे मात्र आवश्यक आहे. ज्या गोष्टी आपण बदलू शकत नाही, त्या स्वीकारण्याचे धोरण स्वीकारल्यास हितकारक ठरू शकेल. आपल्या बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवणे आवश्यक ठरेल. त्यामुळे इतरांशी नाराजी आपण टाळू शकाल. प्रकृतीबाबत अधिक दक्ष राहा, आपण आपल्या कार्यातील कामे कशी पार पाडता येतील याबाबत अधिक लक्ष द्याल व ती पार पाडण्याचा प्रयत्न कराल. वेळोवेळी ज्येष्ठांशी अथवा जाणकारांशी चर्चा करून प्रश्न सोडविता येतील. कामाचा उत्साह वाढीला लागेल. आप्तेष्टांच्या संपर्कात राहाल. आपण आपल्या रागावर योग्य नियंत्रण ठेवा. **महिलांना:** कोणाशीही नाराजी पत्करू नका. प्रकृतीस्वास्थ्य जपा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. घरगुती वातावरण चांगले ठेवण्याचा प्रय़त्न करा. कलाक्षेत्राला एखादे बक्षीस आपल्याला मिळेल. **शुभदिनांक:** १७,१८

### विरोधकांवर अंकुश ठेवा

**वृषभ :** राशीसाठी या सप्ताहातील ग्रहमान आपणास मिळणारा फुरसतीचा वेळ आपण निःस्वार्थी कामासाठी दिल्यास आपणास कृतकृत्य झाल्याचे समाधान मिळू शकेल. एखाद्या महत्त्वाच्या व्यक्तीची भेट होण्याची शक्यता आहे. आपण इतरांना ऊर्जा देण्याचा प्रयत्न करा. आर्थिक बाजू ठीक राहील. बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल. प्रकृती जपा. कोणताही निर्णय घेताना अतिशय विचारपूर्वक घ्या. नोकरदारांना चांगला दिलासा मिळेल. कलाक्षेत्राला उत्तम प्रोत्साहन मिळेल. महिलांच्या अंगभूत कलागुणांना चांगले प्रोत्साहन मिळेल. आर्थिक गुंतवणूक करण्याआधी तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेणे हितकारक ठरेल. ओळखीचा लाभ घेता येईल. बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवावा. आपल्यावरील जबाबदाऱ्या पूर्ण करण्याचा प्रयत्न केल्यास मोठा लाभ होईल. विरोधकांबाबत चिंता करू नका, त्यांच्यावर अंकुश ठेवता येईल. नोकरदारांनी वरिष्ठांशी मिळतेजुळते घेण्याचे धोरण स्वीकारणे हितकारक ठरेल. **महिलांना:** माणूस पारखण्याचे सूत्र पाळल्यास पश्चात्ताप करण्याची वेळ येणार नाही. व्यवसायातील मतभेद टाळण्याचा प्रयत्नकरा. बौद्धिकक्षेत्राला वाव मिळेल. **शुभदिनांक:** १९,२०.

### संघर्षाचे प्रसंग टाळा

**मिथुन :** राशीसाठी या सप्ताहात आपण आपल्या प्रकृतीबाबत अधिक काळजी घेणे आवश्यक आहे. विशेषतः नियमित आहार, व्यायाम, योगाचा अवलंब करा. संघर्षाचे प्रसंग कटाक्षाने टाळा. मेहनतीला पर्याय नाही. नको त्या प्रलोभनात अडकू नका. वैवाहिक जोडीदाराची साथ मिळू शकेल. कुटुंबासाठी व मुलांसाठी अधिक वेळ देऊन त्यांची काळजी घ्यावी. आपल्या प्रकृतीकडे दुर्लक्ष करू नका. नियमित व्यायाम, खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. विशेषतः उष्णतेच्या विकारापासून सावध राहा. आपली मानसिकता बिघडणार नाही याची दक्षता घ्या. घरगुती वादविवादाचे प्रसंग कटाक्षाने टाळा. सर्वांशी जुळवून घ्या. आर्थिक बाजू लक्षात घेऊन हिशोबी राहण्याचा प्रयत्न करा. जागेसंबंधी वादाचे प्रसंग उद्भवणार नाहीत याची दक्षता घ्या. आदरयुक्त वागणे कायम ठेवल्यास त्याचा उयोग होईल. नव्या ओळखींचा लाभ घेता येईल. नोकरदारांना मोठा दिलासा मिळेल. **महिलांना:** प्रकृतीबाबत, विशेषतः उष्णतेच्या विकारांबाबत सावध राहा. आरोग्याचा त्रास होऊ शकतो. वेळेवर जेवण घ्या, नातलगांनकडून चांगली बातमी मिळेल. **शुभदिनांक:** १६,२१

### भावनांना आवर घाला

**कर्क :-** या सप्ताहात कर्कराशीधारकास आपण मुलांशी सामजंस्याने वागणे हितकारक ठरू शकेल. चिकाटीने आपण आपले काम पूर्ण करू शकाल. नोकरदारांनी वरिष्ठांशी मित्रत्व राखावे. नको त्या प्रलोभनात अडकू नका. कौटुंबिक वातावरण बिघडणार नाही याची खबरदारी घ्या. मुलांनी अभ्यासाकडे अधिक लक्ष द्यावे. वादाचे प्रसंग कटाक्षाने टाळावेत. आपल्या कामाबाबत अथवा महत्त्वाच्या गोष्टींची गुप्तता पाळल्यास हा आठवडा चांगला जाईल. मालमत्तेसंबंधी वादाचे प्रसंग उद्भवण्याची शक्यता आहे, तेव्हा ते सामंजस्याने सोडवा. आप्तेष्टांशी चांगले संबंध राहतील. आपण जोडीदाराच्या दैनंदिन समस्या सोडविण्याचा प्रयत्न करा. इतरांना मदत करण्यात पुढाकार घ्या. घरून काम करताना जागरूक राहा. साथीदाराशी प्रेमसंबंधांने वागणे हितकारक राहील. त्यांच्या मनाचा विचार करून वागा. **महिलांना :** बेजबाबदारपणे कोणतेही कृत्य करू नका, धोका आहे. इतरांमधील दोष काढण्याचे कटाक्षाने टाळावे. आपल्या भावनांना आवर घालून जबाबदारपणे वागण्याचा प्रयत्न करावा. आपल्या बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवल्यास आपल्याबद्दल गैरसमज होण्याचे प्रसंग टाळू शकाल. **शुभदिनांक:** १७,२०

### व्यवहारात गुप्तता आवश्यक

**सिंह :** राशीसाठी या सप्ताहात ग्रहमान आपण थोरामोठ्यांच्या विचारांचे स्मरण करा. खर्चाचे प्रमाण वाढणार असल्याने प्रथमपासून अनावश्यक खर्च टाळावा. साहसीवृत्ती कटाक्षाने टाळा. नोकरादारांना दिलासा मिळेल. बौद्धिकक्षेत्राला वाव मिळेल. आपली बलस्थाने कोणती याचा मागोवा घ्या, म्हणजे त्यांचा भावी काळासाठी उपयोग करता येईल. या आठवड्यात आपली आर्थिक बाजू सावरता येईल. काही जुनी वसूली होण्याची शक्यता. नोकरदारांना मोठा दिलासा मिळेल. कामकाजात घरुनच व्यस्त राहाल. आपल्या हट्टी स्वभावाला मुरड घालण्याचा प्रयत्न करा. आर्थिक गुंतवणूक करताना तज्ञांचा सल्ला घेणे हितकारक ठरेल. कलागुणांना चांगले प्रोत्साहन मिळेल. अनाठायी खर्च करण्याचे टाळावे. कठीण परिस्थितीत हुशारीने, चतुराईने पुष्कळ गोष्टी साध्य करता येतील. आपल्या नावाचा विचार मान सन्मानसाठी होणार आहे. **महिलांना:** प्रकृतीच्याबाबत चालढकलपणा करू नका. अनावश्यक खर्च टाळावा. आर्थिक बाबतीत तज्ज्ञांच्या सल्ल्यानेच व्यवहार करावेत. जेणेकरून ज्याचा योग्य परतावा आपणास मिळू शकेल. नाही. **शुभदिनांक:** १९,२२

### बोलण्यावर नियंत्रण ठेवा

**कन्या :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता या सप्ताहात आपण आपल्या प्रकृतीबाबत अधिक जागृत राहावे. विशेषतः कफ, उष्णतेचे विकार, खाण्यापिण्याचा हलगर्जी पणा करू नका जे जमते तेच करा. वाद-विवाद कटाक्षाने टाळा. बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवा. दररोजचा व्यायाम व योगाचा अवलंब करा निराशेचे सावट दूर करून आपल्या ध्येयासाठी प्रयत्न करा. तडजोडीचे धोरण स्वीकारणे हितकारक ठरेल. आवश्यक कामाचा पाठपुरावा करणे महत्त्वाचे ठरू शकते. प्रयत्नाने बऱ्याच गोष्टी साध्य करू शकाल. प्रकृतीच्या बाबत अधिक जागरूक राहा. खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. उष्णतेच्या विकारांपासून सावध राहा. कामाचा व्याप वाढणार आहे. मन स्थिर ठेवन्याचा प्रयत्न करा.आपल्या कामाकडे जास्त लक्ष दिल्यास तुमच्या मनाप्रमाणे गोष्टी घडण्याची शक्यता आहे. विद्यार्थीवर्गाने आभ्यासा बाबत दुर्लक्ष करू नको. **महिलांना:** महिलांना घरबसल्या हा काळ उत्तम असून त्यांच्या कलागुणांना वाव मिळेल. घरून काम करतानाही वरिष्ठांशी मिळतेजुळते धोरण स्वीकारा. आपल्या कामाचे बक्षीस बढतीच्या रूपात आपल्याला मिळणार आहे, कलेत मन रामवाल. **शुभदिनांक:** १७,२१

### कायद्याचे पालन करा

**तुळ :** राशीसाठी या सप्ताहात इतरांपेक्षा स्वतःकडे अधिक लक्ष द्या. आपल्या मनाला जे पटेल ते योग्य समजून वागणे योग्य ठरेल. आपल्या योजना स्वतःपुरत्या ठेवा. त्याची वाच्यता करू नका. आपले उद्दिष्ट पुढे ठेवून ते गाठण्याचा प्रयत्न करा. एक उद्दिष्ट ठेवून ते साधण्यासाठी प्रयत्नशील राहा. महिलांना त्यांच्या आवडीप्रमाणे कामे करता येतील. प्रकृतीची पथ्ये पाळा. रागावर नियंत्रण ठेवा. मुलांच्या विकासाकडे लक्ष द्या. मित्रमंडळींच्या संपर्कात राहा. पहिले तीन दिवस प्रथम सत्रात प्रकृतीबाबत जागरूक राहावे. दंतविकार, उष्णतेचे विकार याकडे लक्ष द्या. बोलण्यावर नियंत्रण ठेवा. इतरांची मने दुखावणार नाही, याची काळजी घ्या आपल्या कर्तृत्वाला वाव मिळेल. मोठ्या व्यक्तींचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून ध्येय गाठण्याचा प्रयत्न करा. विरोधकांना न दुखवता आपले कार्य साध्य करा. कायद्याचे पालन करा. नियम व कायदे यांचे पालन करा खर्चाचे प्रमाण वाढणार आहे. **महिलांना:** अनावश्यक खर्च टाळा. घरगुती वातावरण चांगले ठेवता येईल. आपल्या विकासाची एखादी योजना आखणे आवश्यक आहे. धार्मिक कार्यात अधिक रस घ्याल. **शुभदिनांक:** १६,१८

### प्रवासात सावधानता बाळगा

**वृश्चिक :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण आपल्या दैनंदिन जीवनात अनावश्यक खर्च करण्याचे टाळल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करता येणे शक्य आहे. आर्थिक बाजू ठीक राहील. बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल. नोकरदारांना बराचसा दिलासा मिळेल. आपण आपल्या चातुर्याचा उपयोग केल्यास उत्तम. व्यापार-उद्योगाला चांगला प्रतिसाद मिळेल व प्रगती करता येईल. गुरूकृपेचा लाभ घेता येईल व हाती घेतलेल्या कामात परिश्रमाने यश संपादन करता येईल. प्रकृतीची पथ्ये पाळा. मौल्यवान वस्तू सांभाळा. प्रवासात सावधानता बाळगा. वैवाहिक जोडीदाराची साथ मिळेल. या सप्ताहात शांतता व संयम बाळगणे आवश्यक. आपल्या कार्यकौशल्याचा कस लागेल. विरोधकांवर कडक नजर ठेवा. त्यांना संधी देऊ नका. आपल्या रागावर योग्य नियंत्रण ठेवा. कुणालाही नाराज करू नका. **महिलांना :** आपल्या कलाक्षेत्राला चांगला प्रतिसाद मिळेल व सामाजिक क्षेत्रात आपली वाहवा मिळवाल. आपल्या बोलण्यावर मात्र योग्य नियंत्रण ठेवा, त्यामुळे गैरसमज वाढणार नाही. शेतीविषयक व स्थावरजंगमबाबतची कामे मार्गी लागतील. **शुभदिनांक :** १७,१९

### प्रलोभनात अडकू नका

**धनु :** राशीसाठी या आठवड्याचे ग्रहमान पाहता आपण आपल्या हुशारीने व कौशल्याने आपले अस्तित्व टिकवण्याचा प्रयत्न कराल व त्यात यशस्वी व्हाल. नोकरदारांना मोठा दिलासा मिळेल. बौद्धिक क्षेत्राला चांगला वाव मिळेल. गुरूकृपेचा लाभ घेता येईल. काहींना विवाहाचे योगही संभवतात. नको त्या प्रलोभनात मात्र अडकू नका. सरकारी नियमांचे कटाक्षाने पालन करा. येणाऱ्या प्रसंगांना धैर्याने सामोरे जा. प्रकृतीस्वास्थ्याबाबत अधिक दक्ष राहा. खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. जोडीदाराची उत्तम साथ मिळेल. आपण कोणालाही नको ती आश्वासने देण्याचे टाळल्यास हा सप्ताह सर्व दृष्टीने चांगला जाऊ शकेल. नोकरदारांना मोठा दिलासा मिळेल व वरिष्ठांची चांगले संबंध ठेवता येतील. शेतीविषयक कामांना गती मिळेल. राजकीय क्षेत्रात आपले नाव होण्याची शक्यता राहील, मात्र आपल्या भावी योजनांबद्दल गुप्तता पाळणे हितकारक राहील. आर्थिक व्यवहारात सावधानता बाळगा. विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतल्यास यशाची अपेक्षा ठेवू शकाल. **महिलांना:** कलाक्षेत्राला प्रोत्साहन मिळेल, एखादी नवी ऑफर मिळेल कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. घरात धुसपूस होईल. **शुभदिनांक :** १८,२०

### वरिष्ठांशी जुळवून घ्या

**मकर :** मकरराशीसाठी या सप्ताहातील ग्रहमान पाहता या आठवड्याचे ग्रहमान पाहता आपण आपली कर्तव्ये काय आहेत याचा विचार करून त्यांना प्राधान्य देण्याचा प्रयत्न केल्यास हा आठवडा सर्व दृष्टीने चांगला जाईल. नोकरदारांनी वरिष्ठांशी मिळते-जुळते घेण्याचे धोरण स्वीकारावे. वादाचे प्रसंग कटाक्षाने टाळावे. सरकारी नियम व कायदा यांचे कटाक्षाने पालन करा. या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण आपल्या स्वकर्तृत्वावर विश्वास ठेवून कोणतेही काम केल्यास बऱ्याच प्रमाणात यशस्वी होऊ शकाल. कलाक्षेत्रातील व्यक्तींना प्रोत्साहन मिळेल. सामाजिक क्षेत्रात वाहवा मिळवू शकाल. कोर्ट व शेतीविषयक कामांना चालना मिळेल. नोकरदारांना दिलासा मिळेल. कौटुंबिक वातावरण चांगले राहील. शुभकार्याचे संकेत मिळतील. सरकारी नियम कटाक्षाने पाळा. आपण कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य दिल्यास आपणास चांगले समाधान मिळू शकेल. नोकरदारांनी वरिष्ठांशी जुळवून घेण्याचे धोरण स्वीकारावे. **महिलांना:** नको त्या अपेक्षा ठेऊ नका आपले काम भले आपण भले हे धोरण ठेवा, घरगुती वादाचे प्रसंग कटाक्षाने टाळा. सामंजस्याने परिस्थिती हाताळा. आर्थिक बाजू ठीक राहील. **शुभदिनांक:** १९,२१

### थोरामोठ्यांच्या संपर्कात राहाल

**कुंभ :** राशी एकूण ग्रहमान पाहता आपल्या पुष्कळशा समस्या या सप्ताहात सुटण्याची शक्यता आहे, मात्र त्या दृष्टीने आपण प्रयत्नशील राहिले पाहिजे. कामात अधिक लक्ष द्या. सरकारी नियमांचे पालन करा. बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल. आर्थिक बाजू ठीक राहील. प्रकृतीबाबत अधिक दक्ष राहा, विशेषतः छाती, पोट, डोळे यांच्या विकारांपासून सावध राहा. थोरामोठ्यांच्या गाठीभेटीचे अथवा संपर्काचे योग संभवतात. विरोधकांची धास्ती बाळगू नका. आपल्या प्रयत्नांना चांगला प्रतिसाद मिळेल. आपणास ग्रहांची अनुकूलता लाभणार असल्याने आपल्या कर्तृत्वाला चांगला वाव मिळेल. वरिष्ठांची मर्जी संपादन करता येईल. काही नव्या जबाबदाऱ्या पडण्याची शक्यता आहे. कलाक्षेत्राला चांगले प्रोत्साहन मिळेल. संगणक व तांत्रिक क्षेत्रातील व्यक्तींना चांगला काळ राहील. निकाल आपल्या बाजूने लागेल. **महिलांना:** आर्थिक व्यवहारात सावधानता बाळगा. थोरामोठ्यांच्या संपर्कात राहाल. आर्थिक बाजू ठीक राहील. सरकारी नियमांचे पालन करा. प्रकृतीस्वास्थ्य जपा उद्योग-व्यवसायात प्रगती कराल. मुलांकडे अधिक लक्ष द्या. **शुभदिनांक:** २०,२१

### कामाचे कौतुक होईल

**मीन :** या सप्ताहात मीनराशीसाठी ग्रहमान पाहता विशेषतः नोकरदारांना मोठा दिलासा मिळू शकेल. आपला ताण उतरणार आहे, आपल्या कामाचे कौतुक केले जाईल, पण अहंकारापासून दूर राहणेच योग्य ठरेल. आपली मते दुसऱ्यांवर लादू नका. आर्थिक बाजू चांगली ठेवता येईल, खिशात पैसा खेळेल, पण पर्यायाने खर्चाचे प्रमाणही वाढण्याची शक्यता आहे. स्वतःमधील ऊर्जा पाहा व त्याप्रमाणे काम करणे ठीक राहील. कौटुंबिक वातावरण वादासारख्या प्रसंगांनी बिघडणार नाहीत याची दक्षता घ्या. प्रकृतीची पथ्ये पाळा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. मित्रांची पारख करून त्यांची मैत्री ठेवा. आपण आपल्या कार्यक्षेत्रातील कामासंबंधी प्रयत्नशील राहिल्यास आपल्या ध्येयाजवळ जाऊ शकाल. व्यावसायिक क्षेत्रात मात्र तज्ञांच्या सल्ल्याशिवाय आर्थिक व्यवहार करू नये. हाती घेतलेल्या कार्यात यशाची अपेक्षा ठेवू शकता. कलाक्षेत्राला चांगले प्रोत्साहन मिळेल. **महिलांना:** विशेषतः महिलावर्गाला त्यांच्या अंगभूत कलागुणांना उत्तम संधी मिळेल. प्रवास योग संभवतात. प्रकृतीबाबत जागरूक राहा, योगाचा अवलंब करा. **शुभदिनांक:** १८,२२

# घारापुरी बेटावर घुमणार भोलेनाथाचा सूर

। उरण । प्रतिनिधी ।

देशात विविध बारा ज्योर्तिलिंगे प्रसिध्द आहेत. घारापुरी बेटावरही पुरातनकालीन चैतन्यमय आणि सजीव भासणारी बारा शिवलिंग अस्तित्वात आहेत. महाशिवरात्री निमित्ताने बेटावरील या शिवलिंगाच्या दर्शनासाठी दरवर्षी मोठ्या संख्येने देशी-विदेशी पर्यटक आणि शिवभक्त येतात. त्यामुळे घारापुरी बेटावरील महाशिवरात्रीला जागतिक महाशिवरात्री म्हणूनही ओळखली जाते.

पुरातन काळातील असलेली प्रचंड आकाराची उर्वरित सात शिवलिंग विविध ठिकाणी केलेल्या उत्खननात आढळुन आलेली आहेत. शेतबंदर गावातच दोन शिवलिंग आहेत. गावाच्या दक्षिणेकडे असलेल्या विहिरीच्या बाजुला शिंवलिंग आहे. वड-पिंपळाच्या वृक्षाखाली असलेल्या शिवलिंगावर शिवभक्त ग्रामस्थांनी छोटेखानी मंदिरही उभारले आहे. शेतबंदर गावातच उत्खननात आढळलेल्या प्रचंड आकारातील शिवलिंगाची गावकऱ्यानी प्राणप्रतिष्ठा केली आहे. शिंवलिंगाला अनुरुप असे मंदिरही ग्रामस्थांनी उभारले आहे. राजबंदर गावातही उत्खनात सापडलेल्या प्रचंड आकाराच्या तीन्ही शिवलिंगाची स्थापना मंदिरे बांधुन करण्यात आली आहेत. त्यापैकी एक धरणाच्या वरच्या बाजुला डोंगरात, दुसरे राजबंदर गावातच तर तिसरे गावाबाहेरील विहिरीच्या बाजुला शिवलिंगे आहेत. राजबंदर आणि मोराबंदर दरम्यानच्या रस्त्यावर मोठ्या आकाराचे पुरातन शिवलिंग आहे. ३ फुट उंच आणि अडीच फुट रुंदीच्या या पुरातन शिवलिंगावर छोटेसे मंदिरही बांधण्यात आले आहे. मोराबंदर गावातही भव्य आकाराचे शिवलिंग सापडले होते.

ग्रामस्थांनी सुंदर मंदिर बांधुन शिवलिंगाची प्राणप्रतिष्ठाही केली आहे. राजबंदर जेट्टी शेजारीही सोमेश्वर शिवलिंगाची स्थापना करुन समुद्र किनाऱ्यावर सुंदर मंदिरही उभारले आहे. अशीही पुरातन काळातील प्रचंड आकाराची ऐत्याहासिक, सजीव भासणारी बारा शिवलिंगे आहेत.



**घारापुरी बेटावर महाशिवरात्री निमित्ताने हजारो शिवभक्त येतात. यामध्ये देशी विदेशी पर्यटक आणि शिवभक्तांचाही मोठ्या प्रमाणात समावेश असतो. शिवदर्शनासाठी येणाऱ्या विदेशी पर्यटकांमुळे बेटावरील महाशिवरात्रीला जागतिक महाशिवरात्र म्हणुनही ओळखळी जाते. बेटावर जाण्या-येण्यासाठी गेटवे ऑफ इंडिया, जेएनपीए, उरण-मोरा, न्हावा बंदरातून होड्या, लॉचेस, मचव्यांची सोय असते. एकेरी ६५ रुपये तिकीटात बंदर विभागाने ही सोय केली आहे.**

# श्री सोमेश्वर मंदिराचा जीर्णोद्धार

। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

म्हसळा तालुक्यातील आगरवाडा येथे खररसई-आगरवाडा ग्रामस्थ मंडळाच्या संयुक्त विद्यमाने श्री सोमेश्वर मंदिराचा जीर्णोद्धार व प्राणप्रतिष्ठापना सोहळा भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. कणेरी सिद्धगिरी मठ कोल्हापूर येथील श्री चिदानंदजी स्वामी महाराज यांच्या हस्ते व वेदमंत्रांच्या गजरात सर्व धार्मिक विधी शुक्रवारी (दि.१३) रोजी पार पडला. यानिमित्त पहाटेपासून मंदिर परिसरात भक्तांची मोठी गर्दी उसळली होती. याप्रसंगी मंदिर परिसर फुलांची आकर्षक सजावट, भगवे ध्वज आणि पारंपरिक रांगोळ्यांनी सजविण्यात आला होता. महिला मंडळ व युवक मंडळाच्या कार्यकर्त्यांनी नियोजनबद्ध व्यवस्था करून कार्यक्रम यशस्वी केला. दरम्यान, रविवार (दि.१५) फेब्रुवारी रोजी उद्‌घाटन सोहळा आयोजित करण्यात आला असून या सोहळ्याचे उद्‌घाटन खा. सुनील तटकरे यांच्या हस्ते होणार आहे. तसेच महाशिवरात्री उत्सवानिमित्त रुद्राभिषेक, भजन, कीर्तन, महाआरती आदी धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. ग्रामस्थ मंडळातर्फे सर्व भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. श्री सोमेश्वर मंदिराचा जीर्णोद्धार परिसराच्या धार्मिक व सांस्कृतिक जीवनात नवा अध्याय ठरणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली आहे.



# डॉ. राजेंद्र धात्रक यांचे निधन

**नागोठण :** रोहा तालुका मेडिकल असोसिएशनचे कार्यतत्पर माजी अध्यक्ष आणि रोहा पंचायत समितीचे माजी सदस्य असलेले नागोठणे गावचे डॉ. राजेंद्र धात्रक (वय ५८) यांचे शनिवारी (दि.१४) रोजी निधन झाले. यांच्या निधनाचे वृत्त समजताच नागोठणे व पाली हळहळ व्यक्त करण्यात आली. यांच्या निधनामुळे नागोठणे व पाली ग्रामस्थांचे आरोग्य रक्षक हरविल्याची भावना सर्वत्र व्यक्त करण्यात येत आहे. डॉ. धात्रक यांच्या पश्चात आई, पत्नी रिचा धात्रक, मुलगी डॉ. स्वप्नाली हळंबे, मुलगा डॉ. सनी धात्रक, जावई डॉ. मेघराज होळंबे, नातू, सून डॉ. स्नेहा धात्रक, बंधू डॉ. मिलिंद धात्रक, मनोज धात्रक, बहीण असा मोठा परिवार आहे.





# शिवस्वरूपच्या प्रामाणिकपणाचे कौतुक

। उरण । प्रतिनिधी ।

नवी मुंबईमधील नेरुळच्या मिनाताई ठाकरे हॉस्पिटलमध्ये उलवे येथील बयवबाई अरुण ठाकुर बामणडोंगरी यांची दिड तोळ्याची सोन्याची चैन हरवली होती. तेथेच दवाखान्यात आलेल्या शिवस्वरूप कराड रा. जुईनगर (वय वर्षे१०) या शाळकरी मुलाला सापडली. शिवस्वरूपच्या आईवडिलांनी ती चैन लगेचच नेरुळ पोलीस स्टेशनमध्ये जमा केली होती. नेरुळ पोलिसांच्या सहकार्याने बयवबाई ठाकुर यांना त्यांची चैन परत केल्यामुळे शिवस्वरूपचा नेरुळ पोलीस स्टेशन येथे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजय कांबळे आणि बयवबाई ठाकुर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. मूर्ती लहान किर्ती महान या उक्तीला शोभेल असे शिवस्वरूपचे कार्य असून शिवस्वरूपच्या प्रामाणिकपणाचे व त्याच्या आई वडिलांनी दिलेल्या चांगल्या संस्कारा बद्दल आई वडिलांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे-तिवरे, ता.कर्जत, जि.रायगड येथे असलेली खालील परिशिष्ठामध्ये वर्णनालेली जमिन मिळकत आमचे अशिल यांनी या जमिन मिळकतीचे विद्यमान मालक १.गुलाब नारायण देवघरे, २.रवींद्र मारूती देवघरे मु.तिवरे, ता.कर्जत, जि.रायगड यांचेकडून कायम खरेदी करायचे ठरवले आहे.

**शेतजमिनीचे वर्णन**
**मौजे-तिवरे, ता.कर्जत जि.रायगड येथील जमिन मिळकत**

| गाव | सर्व्हे नंबर | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| तिवरे | ६२/३ | ०.४९.५० | ९.८० |

सदरहु जमिन मिळकत ही त्या मिळकतीचे विद्यमान मालक यांच्या मालकीची व कब्जा वहिवाटीची आहे असे ते सांगतात आणि तसे जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावरून सुद्धा ते दिसून येत आहे. सदर जमिन मिळकत त्यांच्याकडून आमचे अशिलांनी सर्व हक्कासह कायमस्वरूपी खरेदीखतद्वारे विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी, सदर जमिन मिळकतीत कुणाचा गहाण, दान, साठेकरार, बक्षीस, फरोक्तखत, लीज, हक्क बोजा वगैरे किंवा कुणालाही कुठल्याही प्रकारची हरकत असल्यास तशी लेखी हरकत, पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७(सात) दिवसांचे आत खालील पत्त्यावर पोहोचवावी. वरील मुदतीत कुणाची कुठल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरहू जमिन मिळकत निर्वेध असल्याचे समजून सदर जमिनीच्या विक्रीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर कोणतीही हरकत ऐकली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

हरकत खालील पत्त्यावर नोंदवावी
**ॲड.संदिप मारूती घरत**
ऑफिस-श्री.साई सावली, सो.लि.दुसरा मजला,
ब्लॉक नं.१०, कर्जत दिवाणी कोर्टासमोर,
ता.कर्जत, जि.रायगड, पिन-४१०२०१
मो.९२२०६५३३०२/८४४६७२४९८८

कर्जत
दि.१४/०२/२०२६

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे-तिवरे, ता.कर्जत, जि.रायगड येथे असलेली खालील परिशिष्ठामध्ये वर्णनालेली जमिन मिळकत आमचे अशिल यांनी या जमिन मिळकतीचे विद्यमान मालक सौ.सुप्रिया विलास थोरवे, मु.पोसरी, ता.कर्जत, जि.रायगड यांचेकडून कायम खरेदी करायचे ठरवले आहे.

**शेतजमिनीचे वर्णन**
**मौजे-तिवरे, ता.कर्जत जि.रायगड येथील जमिन मिळकत**

| गाव | सर्व्हे नंबर | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| तिवरे | ५७/१/अ | ०.०८.१० | १.५५ |

सदरहु जमिन मिळकत ही त्या मिळकतीचे विद्यमान मालक यांच्या मालकीची व कब्जा वहिवाटीची आहे असे ते सांगतात आणि तसे जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावरून सुद्धा ते दिसून येत आहे. सदर जमिन मिळकत त्यांच्याकडून आमचे अशिलांनी सर्व हक्कासह कायमस्वरूपी खरेदीखतद्वारे विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी, सदर जमिन मिळकतीत कुणाचा गहाण, दान, साठेकरार, बक्षीस, फरोक्तखत, लीज, हक्क बोजा वगैरे किंवा कुणालाही कुठल्याही प्रकारची हरकत असल्यास तशी लेखी हरकत, पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७(सात) दिवसांचे आत खालील पत्त्यावर पोहोचवावी. वरील मुदतीत कुणाची कुठल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरहू जमिन मिळकत निर्वेध असल्याचे समजून सदर जमिनीच्या विक्रीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर कोणतीही हरकत ऐकली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

हरकत खालील पत्त्यावर नोंदवावी
**ॲड.संदिप मारूती घरत**
ऑफिस-श्री.साई सावली, सो.लि.दुसरा मजला,
ब्लॉक नं.१०, कर्जत दिवाणी कोर्टासमोर,
ता.कर्जत, जि.रायगड, पिन-४१०२०१
मो.९२२०६५३३०२/८४४६७२४९८८

कर्जत
दि.१४/०२/२०२६

## मुरुड जंजिरा नगरपरिषद, जि.रायगड

**निविदा सूचना**

मुरुड जंजिरा नगरपरिषद हद्दीत घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत कचरा डेपोच्या ठिकाणी साठलेल्या जुन्या कचऱ्यावर स्वतःचे मशिनरी व साहित्याचे साहाय्याने बायोमायनिंग प्रक्रिया करणे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकिय रक्कम | बयाणा रक्कम | निविदा फि |
|---|---|---|---|---|
| १ | मुरुड जंजिरा नगरपरिषद हद्दीत घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत कचरा डेपोच्या ठिकाणी साठलेल्या जुन्या कचऱ्यावर स्वतःचे मशिनरी व साहित्याचे साहाय्याने बायोमायनिंग प्रक्रिया करणे. | २,७५,०००/- | २७००/- | ५००/- |

१. कोरी निविदा पत्रके दिनांक १४/०२/२०२६ रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत सकाळी ११.०० वा. उपलब्ध होतील.
२. सदर कामाची इसारा रक्कम रोख स्वरुपात दिनांक. ०४/०३/२०२६ पर्यंत सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत नगरपरिषद कार्यालयात स्विकारण्यांत येईल.
३. सदर कामांच्या निविदा दिनांक. ०४/०३/२०२६ रोजी पर्यंत सायं. ५.०० वाजेपर्यंत नगरपरिषद कार्यालयात स्विकारण्यांत यतील.
४. प्राप्त निविदा दिनांक ०५/०३/२०२६ रोजी सायं.५.३० वाजता किंवा प्रशासकीय सोईनुसार उपडण्यांत यतील.
५. कोणतीही निविदा अगर सर्वच निविदांबाबत कोणतेही कारण न देता नाकारणेचा अधिकार नगरपरिषदन राखून ठेवलला आहे.

म्यू.जा.क्र.१०२५/आरोग्य/२०२५-२६
मुरुड जंजिरा नगरपरिषद कार्यालय
मुरुड जंजिरा, जि. रायगड
दिनांक :-१३/०२/२०२६

सही/-
**(सचिन बच्छाव)**
**मुख्याधिकारी**
**मुरुड जंजिरा नगरपरिषद**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनांची मिळकती त्यांचे मालक १) नईम सिराज पालटे, २) फहीम सिराज पालटे यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन:-**
**मौजे - ममदापूर, ता. कर्जत, जि. रायगड येथील बिनशेती जमीन मिळकत**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र चौरस मिटर | आकार रु-पै |
|---|---|---|---|
| १६८ | ४५ | ५१८.४० | ५१-८४ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमांचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

मोबाईल:-
०९३२६२३६९२३
०९६८९६९९५९५

**ॲड. प्रवीण शांताराम खड़े**
पत्ता:- २, ''लक्ष्मी सदन'', जुने एस. टी. स्टॅण्ड,
मु.पो. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे चौल, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या जमिन मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | एकूण क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| चौल ता.अलिबाग | २०३० | जिरायत ०-८१-९०<br>बागायत १-२८-७०<br>पो.ख. ०-१०-९०<br>एकुण २-२१-५० | १००.६३ |

वर वर्णन केलेल्या जमीन मिळकती पैकी विद्यान मालक यांचे नावे असलेले ०-१५-१० हे.आर. क्षेत्र सदर नोटीसीचा विषय आहे.

सदर नोटीसीचा विषय असलेली मिळकत हि विद्यमान मालक श्री. महेंद्र तुकाराम डिके यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, त्या विकण्याचा त्यांस पुर्ण कायदेशिर हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतींवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहार हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसाचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांच्या आहेत व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वांस कळावे

ठिकाण - अलिबाग
दिनांक - १४/०२/२०२६
मोवा. नं. ९९२२७०७०१२

**ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
लक्ष्मी नारायण, १ ला मजला,
शॉप नं. ७ व ८, ब्राम्हण आळी,
राम मंदिर समोर, ता.अलिबाग,
जि. रायगड ४०२२०१

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे-पोसरी, ता.कर्जत, जि.रायगड येथे असलेली खालील परिशिष्ठामध्ये वर्णनालेली जमिन मिळकत आमचे अशिल यांनी या जमिन मिळकतीचे विद्यमान मालक श्री.विलास वासुदेव थोरवे, मु.पोसरी ता.कर्जत, जि.रायगड यांचेकडून कायम खरेदी करायचे ठरवले आहे.

**शेतजमिनीचे वर्णन**
**मौजे-पोसरी, ता.कर्जत जि.रायगड येथील जमिन मिळकत**

| गाव | सर्व्हे नंबर | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| पोसरी | ३/१७ | ०.११.४० | १.६० |
| पोसरी | ७/९ | ०.०५.८० | ०.४० |

सदरहु जमिन मिळकत ही त्या मिळकतीचे विद्यमान मालक यांच्या मालकीची व कब्जा वहिवाटीची आहे असे ते सांगतात आणि तसे जमिनींच्या ७/१२ उताऱ्यावरून सुद्धा ते दिसून येत आहे. सदर जमिन मिळकत त्यांच्याकडून आमचे अशिलांनी सर्व हक्कासह कायमस्वरूपी खरेदीखतद्वारे विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी, सदर जमिन मिळकतीत कुणाचा गहाण, दान, साठेकरार, बक्षीस, फरोक्तखत, लीज, हक्क बोजा वगैरे किंवा कुणालाही कुठल्याही प्रकारची हरकत असल्यास तशी लेखी हरकत, पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७(सात) दिवसांचे आत खालील पत्त्यावर पोहोचवावी. वरील मुदतीत कुणाची कुठल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरहू जमिन मिळकत निर्वेध असल्याचे समजून सदर जमिनीच्या विक्रीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर कोणतीही हरकत ऐकली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

हरकत खालील पत्त्यावर नोंदवावी
**ॲड.संदिप मारूती घरत**
ऑफिस-श्री.साई सावली, सो.लि.दुसरा मजला,
ब्लॉक नं.१०, कर्जत दिवाणी कोर्टासमोर,
ता.कर्जत, जि.रायगड, पिन-४१०२०१
मो.९२२०६५३३०२/८४४६७२४९८८

कर्जत
दि.१४/०२/२०२६

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुद केलेली जमीन खालील जमीन मालक यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णन केलेली जमीन मिळकत आमचे खरेदीदारांनी विकत घेण्याचे ठरविले असुन त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:-

**मौजे पाली ता.सुधागड, जि.रायगड. येथील जमीन गावठाणातील मिळकत.**

**मिळकतीचे वर्णन :-**

| जमिन मालकाची नांव | सि.स.नं. | क्षेत्र चौ.मी. | सत्ता प्रकार |
|---|---|---|---|
| १.श्री.रफीक अहमद महामुद परबलकर<br>२.श्री.बशीर अहमद महामुद परबलक | ६३५ | २७८७.०० पैकी १६८७.०० | अ |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही वहिवाट ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण बोझा, भाडेपट्टा, जप्ती, लिज, लीएन जाणे येणेचे मार्ग अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. त्याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन त्यासंबधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाही व असल्यास त्यानी ते जाणीवपुर्वक सोडुन दिले आहेत, असे गृहीत धरून आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करून आमचे खरेदी घेणार खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत बंधनकारक राहणार नाही. हे कळावे.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.

दिनांक :- १५/०२/२०२६

खरेदीदारांचे लेखक,
**राठोड एण्ड एसोसिएट्स**
श्री.सरदारमल जोरावरमल राठोड स्टॅम्प व्हेंडर,
श्री. राजेश एस. राठोड
२८६अ राठोड सदन,ऑफिस नं.७ पाली,
ता. सुधागड, जि. रायगड.
मो.९४२११६८७६३/९२७०३६७२९०

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेंत येते की, खाली वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे मालक सौ.मोनिका समीर साळोखे, व श्री.समीर यशवंत साळोखे, दोघेही रा. डिकसळ, ता. कर्जत, जि.रायगड यांचेकडून आमचे अशिलाने कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खाली लिहीले प्रमाणे,

**मौजे दहिगांव, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत.**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.-आर | आकार रू.=पैसे |
|---|---|---|---|
| ५७ | ४ | ०-४०.०० | ०=४० |

तदंगभूत सर्व हक्क हितसंबंध यासुद्धा.

तरी वरील मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा, कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध, ताबा-कबजा, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी-हक्क, मृत्यूपत्रांकीत दान, गहाण, बक्षीस, साठेकरार, करार मदार, फरोक्त, लिएन वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत सकृतदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत खालील सही करणार यांजकडे कळविणेस विनंती आहे. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील, मागाहून येणाऱ्या तक्रारी/हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, कळावे.

तारीख:- १५-०२-२०२६.

**श्री. विवेक अशोक धनवी,**
बी.कॉम.,एलएल.बी., ॲडव्होकेट,
ऑफीस गाळा नं.७ सुमनराज को-ऑप.
हौऊ.सोसायटी, पाटीलआळी, दहिवली,
ता.कर्जत, जि.रायगड,
मोबाईल नंबर - ९०११७३६००२.

## जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे पवेळे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेल्या जमिन मिळकतीपैकी ०-५४-९० (हे.आर) शेतजमिन मिळकत सौ.राजकौर विष्णु बच्चाजीराव शिंदे उर्फ राजकौर सतेंद्रपाल सिंग, राहणार मुंबई यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदर शेतजमिन मिळकतीपैकी ०-३९-८० (हे.आर.) शेतजमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझे अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाचा करार सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान स्वाक्षरित झाला आहे. सदरीला जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्या बाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील सौ. राजकोर विष्णु बच्चाजीराव शिंदे उर्फ राजकौर सतेंद्रपाल सिंग यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, त्यांचे मालकी हक्क निर्वेध असले बाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी, हे सर्वांस कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आ.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| पवेळे, ता.अलिबाग. | ५१/४ | ०-८३-८०<br>**०-०१-३० (पो.ख.)**<br>०-८५-१० एकुण | ०७-१० |

सदरील शेतजमिन मिळकतीपैकी ०-५४-९० (हे. आ.) शेतजमिन मिळकत सौ. राजकौर विष्णु बच्चाजीराव शिंदे उर्फ राजकौर सतेंद्रपाल सिंग यांच्या मालकीची असुन सदर शेतजमिन मिळकतीपैकी ०-३९-८० (हे.आ.) शेतजमिन मिळकत

अलिबाग,
दिनांक १५/०२/२०२६.

सही/
**(ॲड. संजय म. भगत)**
हिराबाग सोसायटी,
अे विंग, टिळक रोड,
अलिबाग-रायगड.
खरेदीदारांचे वकील

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यांस येते की मौजे खारचिर्बी, ता.पेण, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत माझे अशिल श्री. चंद्रकांत नागु म्हात्रे व सौ. लता चंद्रकांत म्हात्रे दोघेही रा. गडब, ता. पेण, जि.रायगड यांनी त्याचे नमुद विद्यमान मालक शितल निलेश पाटील यांच्याकडून रजिस्टर खरेदी खतान्वये विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याचे वर्णन खालील प्रमाणे

| गाव | सर्व्हे नं./ गट न. / हि.नं. | क्षेत्र हे.आर | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| खारचिर्बी | ११४ | २.६३.१०<br>पो.ख.०.०८.८०<br>एकुण क्षेत्र २.७१.९० | ३६.९९ |

वरील संपुर्ण क्षेत्रापैकी शितल निलेश पाटील यांच्या हिश्याचे क्षेत्र ०.८०.०० हे.आर.आकार ११.२५ रू.पै. या क्षेत्रापैकी श्री.चंद्रकांत नागु म्हात्रे ०.२०.०० हे.आर. इतक क्षेत्र व सौ. लता चंद्रकांत म्हात्रे ०.२०.०० हे.आर इतके क्षेत्र हे आमचे अशिल हे नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी करीत आहेत.

तरी वर नमुद मिळकतीवर व मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लिज, चार्ज, ताबा, वहिवाट, साठेकरार, फरोक्त, इजमेंट बोजा अथवा कोणत्याही स्वरूपाचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ (सात) दिवसाचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत द्यावी वरिल मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडुन दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहित आहेत असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीमध्ये खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहुन मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

टिपः सदर नोटीस ही खरेदीखत लिहून घेणार यांच्या सांगण्यावरून देण्यात येत आहे.

ठिकाण: पेण
दि. १५/०२/२०२६

सही/-
**ॲड हेमा ज.पाटील (घोडिंदे)**
पेण पोलीस स्टेशन जवळ तहसिल ऑफिस
आवारात, कोटआळी पेण मो. नं.९८२२०३०३८९

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- बोअरवेल, विहीरीसाठी इलेक्ट्रॉनिक मशीनद्वारे अचूक भूजल संशोधन म्हात्रे - ९२२६७६६१२९/९७६५४६५६६६
- शुभमूर्हूत विवाह मंडळ अलिबाग शाखेत सर्वजातीय प्रथमद्वितीय वधूवरांची नावनोंदणीसाठी ९२२६७६६१२९/९७६५४६५६६६
- नागाव मधील हॉटेल मध्ये काम करण्यासाठी स्टाफ ची आवश्यकता आहे. रेस्टॉरंट मॅनेजर,रिसेप्शनिस्ट,कॉन्टिनेंटल,मेन्टेनन्स,वेटर, हाऊसकिपींग, रिसॉर्ट मॅनेजर (क्वालिटी कंट्रोल) १ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअॅप वर मेसेज करावा. मोबाईल – ७५५९१८४६१२
- नामांकित FM.GG कंपनीसाठी PSR आणि सेल्समन पाहिजे, आकर्षक पगार+ इंसेटीव्ह संपर्क :९८८१४१८४४८/०२१४१२२३०६

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५




## राशीभविष्य

- **मेष** : नोकरी-व्यवसायात अडचणी येतील. ऐकीव माहितीवर विश्वास ठेवू नका. प्रवास लाभदायक ठरेल.
- **वृषभ** : आत्मविश्वास वाढवणाऱ्या घटना घडतील. आर्थिक प्राप्तीत वाढ होईल. प्रयत्नात सातत्य राखावं.
- **मिथुन** : ठरलेल्या मार्गाने वाटचाल करा. अनपेक्षित खर्चाचं प्रमाण वाढेल. वाद-विवाद टाळायला हवा.
- **कर्क** : जबाबदाऱ्यांमध्ये वाढ होईल. प्रलोभनांपूसन दूर रहायला हवं. कामात मन एकाग्र करायला हवं.
- **सिंह** : कार्यक्षेत्रात ठरलेलं उद्दीष्ट पूर्ण करू शकाल. आर्थिक व्यवहारात काळजी घ्या. विचारानं रहावं.
- **कन्या** : महत्त्वाचे निर्णय विचारानं घ्यावेत. स्थावर बाबतीत समाधान लाभेल. स्थावर प्रश्न मार्गी लागतील.
- **तूळ** : सहकाऱ्याच्या सूचना लक्षात घ्या. आर्थिक व्यवहारात हानी संभवते. प्रवासाचे बेत लांबणीवर टाका.
- **वृश्चिक** : अतिआत्मविश्वास बाळगू नका. इतरांशी सामंजस्य लाभदायक ठरेल. महत्त्वाच्या भेटी होतील.
- **धनु** : नोकरीत कामाचा ताण राहील. ठरलेल्या भेटी लांबणीवर पडतील. वैद्यकीय कारणांसाठी खर्च होईल.
- **मकर** : बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवावं. दूरच्या प्रवासाचे बेत ठरतील. अचानक धनलाभाचे योग आहेत.
- **कुंभ** : ठरल्यानुसार महत्त्वाची कामं पार पडतील. नव्या ओळखींचा लाभ घ्यावा. समाधानी रहाल.
- **मीन** : नोकरीत बदली-बढतीच्या प्रयत्नांना चालना मिळेल. कौटुंबिक सौख्य लाभेल. चिंता नसावी.

## दिनविशेष
### १५ फेब्रुवारी

१८६९ : प्रसिद्ध उर्दू कवी आणि शायर मिर्झा गालिब यांचं निधन.
१९९५ : ब्रेल लिपीतील पहिलं वृत्तपत्र 'केसरी' या संस्थेने प्रकाशित झालं.
२०१३ : लढवय्या कामगार नेता, कट्टर शिवसैनिक, माजी विधानसभा अध्यक्ष दत्ताजी नलावडे यांचं निधन.
२०१४ : दिल्लीत राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली.
२०१८ : नीरव मोदी याच्या १७ मालमत्तांवर ईडीचे छापे. नीरव मोदी फरार. ईडीकडून त्याची ५१०० कोटींची संपत्ती जप्त.

## आरोग्यमंत्र
### जिभेची स्वच्छता गरजेची

गेल्या काही वर्षांत शारीरिक, मानसिक आणि भावनिक आरोग्यावर अधिक लक्ष केंद्रित करूनही लोक मौखिक आरोग्याची काळजी घेण्यास अनेकदा चुकताना दिसतात. दररोज दात घासणे म्हणजे तुम्ही तोंडाची नीट काळजी घेताय असे नाही. दातांसह आपल्याला जीभ आणि हिरड्यांचीही नीट काळजी घेणे आवश्यक आहे. आजवर अनेक आयुर्वेदिक तज्ज्ञांनी सकाळी चांदीच्या किंवा तांब्याच्या यू-आकाराच्या स्क्रॅपरने जीभ स्वच्छ करण्याचे फायदे सांगितले आहेत. तुम्ही दिवसभर जे काही खाता त्याचा पहिला थर जिभेवरच जमा होत असतो. आपण रोज सकाळी आणि रात्री झोपण्यापूर्वी हा थर स्वच्छ केला नाही तर काही कालावधीनंतर तोंडाचे आरोग्य बिघडू लागते. हे टाळण्यासाठीच जीभ खरवडून स्वच्छ करणे महत्त्वाचे आहे. जीभ खरवडणे ही तोंडाच्या तसेच शारीरिक आणि मानसिक आरोग्य राखण्यासाठी एक आवश्यक प्रक्रिया आहे. जीभेवरील साचलेला आणि अनेक विकारांचे कारण ठरणारा लेप काढल्यास तुम्हाला त्वरित एक फ्रेशनेस अनुभवता येऊ शकतो. शरीराच्या वेगवेगळ्या भागांशी जिभेच्या विविध भागांचा संबंध असतो. जिभेवर फायदेशीर आणि हानिकारक अशा दोन्ही प्रकारचे जीवाणू असतात. बॅक्टेरिया आणि अन्नाचे कण जिभेच्या पृष्ठभागावरच जमा होतात. हे कण वेळेत स्वच्छ केले नाहीत तर ते आवरणाने झाकले जातात आणि त्यामुळेच तोंडाला सतत दुर्गंधी येते. म्हणूनच केवळ दातच नव्हे तर जीभ आणि हिरड्याही स्वच्छ करायला हव्या.



## सफर देशांची
### असा आहे ब्रुनेई

'ब्रुनेई' हा दक्षिण-पूर्व आशियातला देश आहे. 'ब्रुनेई'च्या उत्तरेला दक्षिण चीनी समुद्र आणि उत्तरपूर्वेला 'फिलिपिन्स' आहे. 'बंदर सेरी बेगावान' ही या देशाची राजधानी. तिथला सुलतान हा ब्रुनेईचा प्रमुख. या देशात खनिज तेलाचे खूप साठे आहेत. त्यावर मालकी असल्याने या सुलतानाची गणना जगातल्या सर्वात श्रीमंत लोकांमध्ये होते. इस्लाम हा इथला प्रमुख धर्म असला तरी बौद्ध धर्माचे अनुयायीही इथे आहेत. 'मलाय' ही या देशाची प्रमुख भाषा असून इंग्रजीला दुसऱ्या भाषेचा दर्जा देण्यात आला आहे. चीनी भाषा बोलणारे बरेच लोक इथे आहेत.

१०० वर्षांपेक्षा जास्त काळ इथे ब्रिटिशांचं राज्य होतं. एक जानेवारी १९८४ रोजी त्यांना स्वातंत्र्य मिळालं. त्यानंतर या देशावर तिथल्या सुलतानाची सत्ता आहे. 'ब्रुनेयन डॉलर' हे इथलं चलन. नैसर्गिक वायू आणि लाकूडही इथे मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे. भात, भाज्या, फळं इथे पिकवली जातात. कुक्कुटपालनाचा व्यवसाय मोठ्या प्रमाणावर केला जातो. विविध प्रकारची उपकरणं, वाहतुकीसाठी लागणाऱ्या वस्तू, रसायनं, अन्नपदार्थ यांची आयात केली जाते.

## ब्युटी टॉक
### काळ्याभोर केसांसाठी...

केसांचं सौंदर्य वाढवण्यासाठी आपण बरंच काही करतो. महागडे शँपू, कंडिशनर्ससह विविध प्रकारची उत्पादनं वापरली जातात. अनेकींना केस गळणं आणि पांढरे होण्यासारख्या समस्या भेडसावतात. केस पांढरे होऊ लागले की विविध प्रकारचे डाय, हेअर कलर्स ट्राय केले जातात. हेअर डायमधल्या घातक केमिकल्समुळे केसांचं बरंच नुकसान होतं. गळण्याचं प्रमाण वाढतं. अशा वेळी केसांचा काळेपणा टिकवण्यासोबतच ते चमकदार आणि मऊ व्हावे यासाठी काही घरगुती उपाय करता येतील.

* बटाट्याच्या सालींमध्ये केसांचा काळेपणा टिकवून ठेवण्याची क्षमता असते. त्यामुळे पुढच्या वेळी ही सालं कचऱ्यात टाकू नका. बटाट्यातल्या स्टार्चमुळे केसांचा नैसर्गिक रंग टिकून राहतो. बटाट्याच्या सालीच्या हेअर मास्कमध्ये अ, ब आणि क जीवनसत्त्व असतं. या मुळे केसांचा तेलकटपणा दूर होतो. तसंच कोंडा कमी होतो. बटाट्यातल्या लोह, झिंक, पोटॅशियम आणि कॅल्शियममुळे केस गळणं थांबतं.

(क्रमश:)

## पंचांग

**रविवार, १५ फेब्रुवारी २०२६**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
माघ कृ. १३, **(महाशिवरात्री)**
चंद्रराशी : मकर,
नक्षत्र : उत्तराषाढा, योग : व्यतिपात,
सूर्योदय ७.०९, सूर्यास्त ६.३७

## फॉरवर्डस

**कभी बाज़ार से डरते थें ख़ाली ज़ेब क़ी वज़ह सें...**

**आज़ बेपरवाह हैं क्योकीं ख़्वाईशें हीं कम हों ग़यी...!**

## फॅशन पॅशन

* लेअरिंगसाठीही पोलो शर्ट बेस्ट आहे. या शर्टवर गडद रंगाची डेनिम आणि कार्डिगॅन घाला. ब्राऊन बेल्ट, कॅज्युअल वॉच आणि लोफर्स घालून हा लूक सजवा.

* गडद डेनिमवर पोलो शर्ट घालून त्यावर हेरिंगबोन जॅकेट घाला. ब्राऊन बेल्ट, कॅज्युअल वॉच आणि बूटसह हा लूक खुलवा.

## भटकंती
### अविस्मरणीय जंगल सफारी

दोस्तांनो, तुमच्यापैकी अनेकांना जंगल सफारीची आवड असेल. जंगलात फिरण्यासाठी हा सिझन उत्तम ठरतो. आपल्याकडे जंगल सफारीसाठी काही उत्तम ठिकाणं आहेत. त्यात मध्य प्रदेशमधल्या पेंच राष्ट्रीय अभयारण्याचा समावेश होतो. या राज्यातल्या सिवनी आणि छिंदवाडा या दोन जिल्ह्यांच्या मध्यभागी पेंच हे अभयारण्य वसलं आहे. छिंदवाडापासून ७५ किलोमीटर अंतरावर असणाऱ्या पेंचमध्ये वाघ पहायला मिळतात. वाघांसह विविध प्रजातींचे प्राणी बघण्यासाठी पेंचला भेट द्यायला हवी. या परिसरात वाहणाऱ्या पेंच नदीवरून अभयारण्याला पेंच हे नाव देण्यात आलं. अत्यंत सुंदर दऱ्या आणि पर्वतरांगांमध्ये वसलेल्या या अभयारण्यात फिरण्याचा मनमुराद आनंद तुम्ही लुटू शकता. मुख्यत्वे पेंच अभयारण्यात दुर्मीळ प्रजातींचे प्राणी आणि पक्षी पहायला मिळतील. हे अभयारण्य ७५७ चौरस किलोमीटर परिसरात पसरलं आहे. इथे वाघांसह शिकारी कुत्रे, बिबटे, हरणं, विविध प्रजातींची माकडं, कोल्हे, चितळ, नीलगाय, तरस असे प्राणी मुक्तपणे विहार करताना पहायला मिळतात. यासोबतच २१० प्रजातींचे पक्षी इथली खासियत आहेत. अनेक स्थलांतरित पक्षीही इथं येतात. जानेवारीनंतर इथली थंडीही कमी होते. त्यामुळे फेब्रुवारी ते एप्रिलपर्यंत सफारीसाठी पेंचमधलं वातावरण चांगलं असतं.



## खेचाखेची
### कोमट मुलं

हॉटेलमध्ये मुला मुलीचा सवांद सुरू असतो.

**मुलगा:** तू खूप 'हॉट' आहेस!
**मुलगी:** तू पण खूप 'कूल' आहेस!
.
.
.
त्यांच्या गप्पा ऐकणारी व्यक्ती म्हणते, एक काम करा. तुम्ही लग्न करा, म्हणजे तुमची मुलं कोमट होतील!

## वेगळं काही

कुडकुडणाऱ्या थंडीत कॅनडातल्या यूकॉन प्रांतात दर वर्षी 'हेअर फ्रिजिंग' स्पर्धेचं आयोजन केलं जातं. या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या स्पर्धकांना गरम पाण्याच्या झऱ्यात बुडी मारून लगेच बाहेर यावं लागतं. या काळात इथे उणे २० अंश सेल्सियस तापमान असतं. यामुळे केसांवरचं पाणी लगेच गोठतं आणि अनोखी हेअरस्टाईल तयार होते. याचा फोटो काढावा लागतो. सर्वोत्तम हेअरस्टाईल असलेल्या स्पर्धकाला बक्षिस दिलं जातं. विजेत्याला ७५० डॉलर्स मिळतात. २०११ पासून या स्पर्धेला सुरूवात झाली. 'ताखिनी' नावाच्या गरम पाण्याच्या झऱ्यात पर्यटकांना बुडी मारावी लागते. जानेवारी ते मार्च दरम्यान ही स्पर्धा आयोजित केली जाते.

## सौंदर्यसाधना
### निवड योग्य टोनरची

आजकाल बाजारात विविध कंपन्यांचे क्लिंजर्स, टोनर्स आणि मॉईश्चरायजर्स मिळतात. नैसर्गिक उत्पादनांचा वापर करणाऱ्या महिला गुलाबपाण्याने टोनिंग करतात. मात्र त्वचेचा पोत लक्षात घेऊन टोनरची निवड करायला हवी. हा टोनर घरच्या घरी तयार करता येईल. कोणत्या प्रकारच्या त्वचेला कोणता टोनर हवा याबाबतचं मार्गदर्शन...

* सर्वसामान्य त्वचेसाठी ॲपल सिडर व्हिनेगार आणि ग्रीन टी युक्त टोनर वापरा. ॲपल सिडर व्हिनेगारमध्ये अँटी फंगल घटक असतात. यामुळे चेहऱ्यावरच्या मुरुमांची समस्या कमी होते. त्वचेच्या पीएच बॅलन्सचं संतुलन राखण्याचं काम हे व्हिनेगार करतं. त्यामुळे मृत त्वचाही निघून जाते.



* त्वचा संवेदनशील असल्यास गुलाबपाणी आणि कोरफडीचा गर यांच्या मिश्रणाने तयार झालेला टोनर वापरता येईल. यामुळे त्वचेचा लालसरपणा कमी होतो. चेहऱ्यावर सूज असेल तर हे टोनर वापरावं. अँटी एजिंग म्हणूनही याचा वापर करता येईल. कपभर गुलाबपाण्यात तेवढाच कोरफड गर घालून हा टोनर तयार करता येईल.

* तेलकट त्वचा असणाऱ्यांनी तेलाचं प्रमाण कमी करणाऱ्या टोनरचा वापर करायला हवा. कोरफड, विच हेजल आणि गुलाबपाण्याचा वापर करून टोनर तयार केल्यास त्वचेचा तेलकटपणा दूर होऊन मुरुमांची समस्या कमी होईल.

## सुडोकू ६५

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | | ३ | | | १ | ७ | | |
| २ | | | | ७ | | | | ८ |
| ८ | | | | ३ | | | २ | १ |
| | ८ | | ३ | | | १ | | २ |
| ७ | | १ | २ | | ५ | ४ | | ६ |
| ३ | | ४ | | | ७ | | ९ | |
| १ | ६ | | | ९ | | | | ३ |
| ४ | | | | ५ | | | | ७ |
| | | ८ | ४ | | | २ | | ९ |

**टीप -**

* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्र ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.


* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.

* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ६४ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | १ | ५ | २ | ३ | ९ | ७ | ८ | ४ |
| ४ | ९ | ३ | ५ | ८ | ७ | ६ | २ | १ |
| २ | ८ | ७ | ६ | १ | ४ | ३ | ५ | ९ |
| ९ | ७ | १ | ३ | ६ | २ | ८ | ४ | ५ |
| ५ | ६ | ४ | ७ | ९ | ८ | २ | १ | ३ |
| ८ | ३ | २ | ४ | ५ | १ | ९ | ६ | ७ |
| १ | २ | ६ | ९ | ७ | ५ | ४ | ३ | ८ |
| ७ | ४ | ८ | १ | २ | ३ | ५ | ९ | ६ |
| ३ | ५ | ९ | ८ | ४ | ६ | १ | ७ | २ |

## शब्दकोडे क्रमांक ६५



**आडवे शब्द :-**
१) विरोध
५) मुंगुस
७) बातमीदार
१०) टवाळक्या करणारा
१२) घाई, त्वरा
१४) मध्यस्थ
१६) चौक
१७) तोंडाळ, स्पष्टवक्ता
१८) चिखल
१९) चौक
२०) पूर्वज
२२) धोकादायक (हिं.)
२४) छोटी घागर
२६) जेमतेम
२९) नेता, चित्रपटाचा हिरो
३०) दुष्ट
३१) बारा वर्षांचा काळ
३३) अर्धी ओंजळ
३४) अंग मोडून येणे, तापाची जाणीव
३६) उथळ आकार
३८) बोलाविणे, प्रारंभ
४०) धनुष्याच्या ताणलेल्या दोरीचा आवाज
४१) पोळ्या भाजण्याचे पात्र
४२) शक्ती, बळ
४४) मालकीण, यजमानाची पत्नी
४५) विद्धवंस, नष्ट
४६) दक्षतेचा इशारा
४९) कुल, वंश
५१) धनी
५३) धनी
५४) संन्यासाचे निवासस्थान
५५) नियमित यात्रा करणारा
५८) दुर्दशा
५९) समोरासमोरची चकमक
६१) कौशल्य
६२) वृद्धत्व
६३) मीठ
६४) मोठी चूल
६५) चेहेऱ्यावरील तेज.

**उभे शब्द:-**
२)तिरस्कार, वीट
३) लबाडी, कारस्थान
४) गोंधळ, थट्टा, भांडण
५) असह्य वेदना
६) वल्लरी
७) वाडी छोटी वस्ती
८) आरडाओरड, गोंधळ
९) कणीदार पीठ
११) दागिन्यातील झीज, तोटा
१३) चकचक, उत्कंठतेने मार्गप्रतीक्षा
१५)दहावी तिथी
१६) प्रजाजन
२०) शिवधनुष्य
२१) अंकुर
२३) प्रजा, कुळे, कुळांवरील सरकारी कर
२४) बडबड, त्रास
२५) थंड, गार
२७) साधा, प्रामाणिक, शांत
२८) भेग, चीर
३०) वाळा
३२) वेतन घेणारा
३४) सोने
३५) उत्सवाचे दिवस
३६) पळून जाणे
३७) जिनसांची यादी
३८) कुंभाराची भट्टी
३९) निराश
४१) गवताची झोपडी
४३) येऊन पोहोचलेले, ज्ञात
४५)धातूचे चलन
४७)निरर्थक बडबड
४ ८ )
जाळणारे,जळजळीत
५०) रात्रभर
५१) एक पालेभाजी, मडके
५२) पती
५३) वाढलेला व्याप
५४) मज्ञाव, बंदी
५६) एक खोडायचे साधन
५७) पद्धत
५८) बोकड
६०) चामखीळ
६१) मुलांच्या भाषेत अबोला, दोस्ती तुटणे.

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर



# स्वर्णिम भारत निर्माण करते, 'शिवरात्री'

बी.के. भारतीदीदी

भारत तसेच पूर्ण विश्वात साजरे होणारे उत्सव, प्राचीन काळात घडलेल्या ईश्वरीय व दैवी महान घटनांचे प्रतिक आहे. सर्व सणांचे स्वत:चे असे विशेष महत्त्व आहे, पण काही असे महान उत्सव असतात ज्यांच्या पाठीमागे सृष्टी तसेच मानवी जीवनाला नवीन स्वर्णिमा संधी देण्यविषयी अध्यात्मिक रहस्य दडलेले आहे. या उत्सवांमध्ये शिवरात्री हा उत्सव सर्वश्रेष्ठ उत्सव आहे. हा उत्सव आत्मा व परमात्मा यांच्या मिलनाचा सुखद संयोग आहे. अज्ञान अंधाराकडून ज्ञानरुपी प्रकाशाकडे परिवर्तन होऊन एक नवीन स्वर्णिम सृष्टीची सुरुवात करणारा आहे. सर्व धर्माच्या मनुष्य आत्म्यांचे पिता परमपिता शिव परमात्मा यांची महिमा अपरंपार आहे. पण मनुष्य सृष्टीत त्यांच्या नावासोबत 'रात्र' शब्द जोडलेला आहे. कारण मनुष्य आत्म्यांना अज्ञानतेच्या रात्रीतून ज्ञानरुपी प्रकाश देण्याचे महान दिव्य कर्तव्य त्यांनी केले. म्हणूनच त्यांना पाप कटेश्वर, मुक्तेश्वर अशा नावाने ओळखतात. तसेही ही काही रोज येण-ारी बारा तासांची रात्र नाही तर पूर्ण सृष्टी चक्रामध्ये द्वापार व कलियुगातील अज्ञानरुपी रात्र आहे. रोज येणाऱ्या रात्रीमध्ये मनुष्याच्या तन व मनाला शांती मिळते. भौतिक शरीरा-ला आराम मिळतो व थकावट दूर होते. परंतु मनुष्याच्या मन आणि विचारांमध्ये आलेली अज्ञानता रुपी रात्र मानवाला अशांत व दु:खी करते. या अज्ञानतेच्या रात्रीतून परमपिता परमात्मा शिव येऊन ज्ञानरुपी प्रकाशाकडे घेऊन जातात. ज्याच्याने दु:ख अशांती दूर होऊन मनुष्य आत्मा सुख-शांतीचा छान अनुभव करु शकते.

देवांचाही देव महादेव असणाऱ्या परमपिता परमात्मा शिव यांची महिमा काशी पासून काबापर्यंत विभिन्न रुपात गायली जाते. शिवलिंगाच्या स्वरुपात परमात्म्याची प्रतिमा सर्व विश्वात पूजली जाते. अनेक धर्म व पंथांमध्येही निराकार परमात्मा शिव यांना मान्यता आहे. अज्ञान अंधकाराने मनुष्याला परमात्म्याच्या वास्तविक स्वरुपापासून खूप दूर नेले आहे. आणि म्हणूनच तर मुक्तीदाता शिवाला अज्ञान अंधाररुपी रात्रीच यावे लागते.

या अज्ञानतेच्या रात्रीत मनुष्य नातेसंबंध व अलौकितेला अगदी विसरुन जातो. मानवी मूल्यांना तिलांजली देतो. सर्व जगात श्रेष्ठ समजल्या जाणाऱ्या मनुष्य रुपात मानव नाही तर दानवाचे रुप धारण केलेले आहे. अज्ञानतेच्या रात्रीमुळे सर्व मनुष्य मात्र आसुरी स्वभाव व आसुरी संस्कारवाले बनले आहेत. मग सर्व जगात अत्याचार, पापाचार, भ्रष्टाचार, हिंसा वाढत जाते. दैवी गुणांच्या जागी आसुरी विकार जसे काम, क्रोध, लोभ, मोह, अहंकार यांच्या वशीभूत होऊन भौतिक सत्तेच्या जोरावर जगात अशांती पसरवणे हेच आपले कर्तव्य समजत आहे. ही घोर अज्ञानरुपी रात्र नाही तर मग काय आहे? ही अशी वेळ आहे जेव्हा मनुष्यांची श्रद्धा व विश्वास असलेल्या मंदिर, मस्जिद, चर्च अशा धार्मिक स्थानांनाही भ्रष्ट केले जाते. या सर्व वाईट घटना अतिमध्ये जात आहेत अर्थात सृष्टी परिवर्तनाच्या संकेत देत आहेत. समय अनुसार या सृष्टीचे परिवर्तन ईश्वरीय संविधानाचा अटळ सत्य नियम आहे. चार युगे पूर्ण करुन सृष्टी चक्राचा हा अंतिम काळ चालू आहे. या घोर अज्ञानतेच्या रात्रीसमयी कलियुगाचा अंत आणि सतयुगचा आरंभ यांच्या मधल्या काळात, जिथे दोन्ही युगांचा संगम होतो त्या संगम काळात सृष्टीचा जगतनियंता,सर्व आत्म्यांचा पिता विश्व कल्याणकारी परमपिता परमात्मा शिव अवतरण होते. नंदी बैल अर्थात मनुष्यरुपी साधारण वृद्ध शरीराचा आधार घेऊन सर्व विश्वाचे परिवर्तन करण्याचे महान कार्य करतात. अज्ञानतेच्या रात्रीला समाप्त करुन अध्यात्मिक ज्ञान आणि अध्यात्मिक शक्तीद्वारे स्वर्णिम दुनियेच्या स्थापनेचे महान कार्य करतात. याचीच आठवण म्हणून शिवरात्री साजरी करतात.



फाल्गुन महिन्याच्या शेवटी येण-ारी शिवरात्री नवी सकाळ घेऊन येते. या उत्सवाच्या समयाचे विश्लेषण केले तर भारतीय महिन्याच्या अनुसार हा वर्षाचा शेवटचा महिना असतो. त्यानंतर प्रकृती देखील सुंदर बनते. ज्याला वसंत ऋतु म्हण-तात. हा ऋतु सर्व ऋतुंमध्ये सुंदर व सुखदायी ऋतु असतो. झाडे-झुडपे आपली जुनी पाने गाळून नवीन पानांना धारण करतात.

पृथ्वी सुद्धा आपल्या उदरातून सुगंधित फुलांना जन्म देऊन चहुकडे खुशाली व सद्भावनेचा संदेश देते. भगवान शिव जेव्हा अज्ञानतेच्या रात्री अर्थात कलियुगाला बदलून सतयुगाची स्थापना करतात. याचेच प्रतिक म्हणून शिवरात्री साजरी करतात. आणि सतयुगाची महिमा त्याचे प्रतिक आहे वसंत ऋतु.

परमात्म्याचे स्वरुप व त्यांच्या प्रतिमा : प्रसिद्ध धर्मग्रंथ, मंदिरे, शिवालयामध्ये शिवलिंगाच्या प्रतिमेचेही बहुतेक जास्त वर्णन आढळते. शिवलिंगाची प्रतिमा बहुतांशी काळ्या रंगाची असते. शिवाचा अर्थ आहे कल्याणकारी आणि लिंग याचा अर्थ आहे प्रतिक किंवा चिन्ह. यावरुन असे लक्षात येते की, कल्याणकारी परमात्मा शिव अज्ञानतेच्या रात्री अवतरित होऊन सर्व मनुष्य आत्म्यांचे कल्याण करतात. शिवलिंगावर नेहमी तीन रेषा व लाल बिंदू असतो. अर्थात परमात्म्याचे तीन कर्तव्य स्थापना, विनाश व पालना, आणि लाल बिंदू म्हणजे परमात्म्याचे दिव्य रुप ज्योर्तिबिंदू आहे. परमपिता परमात्मा शिव यांची महिमा आदी काळापासून आजपर्यंत सर्वाधिक मान्य व पूजनीय आहेत.

स्वर्णिम भारताच्या स्थापनेचा काळ :- प्रत्येकाला हे समजून घेतले पाहिजे की हा समय परिवर्तनाचा आहे. कलियुगी जुन्या सृष्टीचा अंत व स्वर्णिमा दुनियेच्या आगमनाचा शुभ संकेत आहे. अत्याचार समाप्त होऊन सदाचाराच्या स्थापनेची सुरुवात आहे. हे सर्वांना माहित आहे की जेव्हा कोणत्याही गोष्टीची अती होते तेव्हा त्याचा अंत निश्चित असतो. हा ईश्वरीय नियम आहे. आज समाजाची आणि सर्व विश्वाची स्थिती देखील असेच संकेत देत आहे. या जगातून मानवता समाप्त झाली आहे. आण्विक अस्त्र शस्त्रांच्या ढिगाऱ्यावर जणू पृथ्वी झोपली आहे व अंतिम श्वास घेत आहे. प्रकृतीची पाच तत्वेही दु:खदायी बनली आहेत. ज्याचा परिणाम म्हणून ग्लोबल वार्मिंग, पूर, दुष्काळ हे सर्व महापरिवर्तनाचे स्पष्ट संकेत आहेत.

या परिवर्तनाच्या अंतसमयी स्वयं परमपिता परमात्मा शिव या सृष्टीवर अवतरीत होऊन प्रजापिता ब्रह्मा तनाचा आधार घेऊन नवीन दुनियेच्या पुनर्निर्माणाचे कार्य करीत आहेत. संपूर्ण भारतात साजऱ्या होणाऱ्या महाशिवरात्रीच्या या महान सणावर गुप्त रुपात महान परिवर्तनाचे कार्य करत आहेत. परमपिता परमात्मा शिवाला ओळखून शिवरात्रीच्या दिवशी आपणही आपल्या अवगुणांना आणि मनोविकारांना स्वाहा करुन दैवी गुणधारी बनून नवीन स्वर्णिम दुनियेच्या स्थापनेच्या महान कार्यात सहयोगी बनू या. हाच परमपिता परमात्मा शिवाचा सर्व आत्म्यांच्या प्रती शिवरात्रीचा शुभ आणि दिव्य संदेश आहे. परमात्मा शिव यांना सृष्टीवर अवतरीत होऊन आता ९० वर्षे होत आहेत. **

---

# खुर्चीचा माज आणि कर्माचा हिशेब

**पद आणि सत्तेच्या अहंकारात माणूसकी विसरणाऱ्यांना कर्माचा हिशेब कसा द्यावा लागतो, याचे भेदक दर्शन लेखातून घडते. सत्ता येते आणि जाते, पण नीती जपणाऱ्यांचीच पुण्याई सोबत उरते, हा मोलाचा संदेश देणारे हे वास्तववादी चिंतन.**

धनंजय शेटये

काही माणसं पद मिळालं की स्वत:ला विधात्याचे अवतार समजू लागतात. पण वास्तव हे असतं की, ही माणसं कर्तृत्वाने नव्हे, तर नशिबाच्या एखाद्या 'घसरगुंडीने' त्या खुर्चीपर्यंत पोहोचलेली असतात. गुणवत्तेचा गंध नसताना जेव्हा हाती सत्ता येते, तेव्हा त्यांच्या डोक्यात अहंकाराची अशी काही हवा भरते की, समोरची कष्टाळू आणि प्रामाणिक माणसं त्यांना पायाखालच्या मुंग्यांसारखी वाटू लागतात.

स्वार्थाची 'खाजगी फौज' निर्माण करण्यासाठी आपल्या मर्जीतील माणसे भरणा करायची आणि इथेच नैतिकतेचा बळी ठरतो.

ज्याप्रमाणे मांजराने डोळे मिटून दूध प्यावं आणि जगाला काहीच दिसत नाही असं समजावं, तशीच अवस्था या लोकांची असते. आपल्या पदाचा गैरवापर करून ही मंडळी संस्थेत नियम आणि नीती धाब्यावर बसवतात. आपल्या नातलगांची, लाळघोट्यांची आणि चापलूसांची एक 'खाजगी फौज' उभी करतात. या सैन्यात गुणवत्तेला स्थान नसतं, स्थान असतं ते फक्त 'जी हुजुरी' करण्याला. कष्टाचं श्रेय स्वत:च्या नावावर खपवायचं आणि श्रमाचा डोंगर इतरांच्या अंगावर ढकलायचा, हाच यांचा एककलमी कार्यक्रम!

मुखवट्यामागचा भेदरलेला चेहरा उघडा पडला की आपली कर्म आठवू लागतात.

अशा लोकांची वृत्ती दुहेरी असते. वरच्या बॉससमोर ही माणसं लाचारीचं प्रदर्शन करतात, त्यांच्या पायात घोटाळतात आणि खोट्या हास्याचे मुखवटे चढवतात. पण स्वत:च्या हाताखालील लोकांशी वागताना मात्र त्यांचा तोरा एखाद्या क्रूर हुकूमशहासारखा असतो. खरं तर, हा रुबाब नसून त्यांच्या मनातील असुरक्षितता आणि न्यूनगंडाचा तो परिपाक असतो. आपण पोकळ आहोत हे कोणाला कळू नये, म्हणूनच ही माणसं इतरांना दाबून स्वत:ला उंच दाखवण्याचा केविलवाणा प्रयत्न करत असतात.

"खुर्चीची उंची कधीच माणसाची उंची ठरवत नाही; कारण पद हे तात्पुरतं असतं, पण तुमचं कर्म हे कायमचं असतं."

प्रत्येकाला कर्माचा अटळ 'हिशेब' आणि विधात्याचा न्याय मिळतोच.

अन्यायाच्या पायावर उभा राहिलेला इमला दिसायला कितीही भव्य असला, तरी तो आतून पोखरलेला असतो. आज तुम्ही सत्तेच्या गुर्मीत गरिबांना, प्रामाणिक सहकाऱ्यांना छळत असाल, त्यांचा मानसिक छळ करून आनंद मानत असाल, तर एक गोष्ट लक्षात ठेवा विधात्याच्या दरबारात 'तारीख' नसते, तिथे थेट 'निकाल' लागतो.

जेव्हा कर्माचा हिशेब चुकता करण्याची वेळ येते, तेव्हा बँक बॅलन्स, वशिला किंवा पद काहीच कामाला येत नाही. विधाता अशा पापी प्रवृत्तींना अशा काही शारीरिक आणि मानसिक व्याधींनी जखडतो की, लाखो रुपये खर्च करूनही व्याधींचं निदान होत नाही. शरीराची लाहीलाही होते, पण शांती मिळत नाही. कारण ज्यांच्या तळतळाटावर तुम्ही सुखाचा महाल बांधला होता, त्या सर्वसामान्यांचा आक्रोश तुम्हाला व्याधींच्या रूपात सडेतोड उत्तर देत असतो.

शेवटी नाव कोणाचे उरते?

इतिहास कधीच 'पदाधिकाऱ्यांची' नावे लक्षात ठेवत नाही, इतिहास लक्षात ठेवतो तो 'माणुसकी' जपणाऱ्यांना. खरी ताकद खुर्चीत नसते, तर तुमच्या चारित्र्यात आणि प्रामाणिकपणात असते. अन्याय करणाऱ्यांचा आवाज आज मोठा असेलही, पण न्यायाने जगणाऱ्यांची उभी राहण्याची ताकद ही काळाच्या ओघात हिमालयासारखीअढळ ठरते.

सावधान! पद आज आहे, उद्या जाईल... पण कर्माची शिक्षा याच जन्मात, याच देही सोसावी लागेल. त्यामुळे सत्तेचा माज करण्यापेक्षा माणुसकीची कास धरा, कारण शेवटच्या प्रवासात खुर्ची सोबत येत नसते, फक्त तुमची 'पुण्याई' सोबत येते. **



---

# प्रोस्टेट वाढ व आधुनिक उपचार



डॉ. दशरथ घुगे

कन्सल्टंट युरोसर्जन

डॉ. घुगे युरोकेअर सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल, अलिबाग

**प्रोस्टेट वाढ : वयाबरोबर येणारी पण उपचारयोग्य समस्या**

**प्रश्न १: प्रोस्टेट वाढ म्हणजे काय?**

**उत्तर :** प्रोस्टेट वाढ ही एक सौम्य (कॅन्सर नसलेली) अवस्था आहे, ज्याला वैद्यकीय भाषेत म्हणतात. या अवस्थेत प्रोस्टेट ग्रंथीचा आकार वाढतो व त्यामुळे लघवी करण्यास अडथळा निर्माण होतो.

**प्रश्न २ : प्रोस्टेट वाढ कोणत्या वयात होते?**

**उत्तर :** ही समस्या सहसा ५० वर्षांनंतरच्या पुरुषांमध्ये आढळते. वय वाढत जाईल तशी प्रोस्टेट वाढ होण्याची शक्यता अधिक असते.

**प्रश्न ३ : प्रोस्टेट वाढीची सामान्य लक्षणे कोणती?**

**उत्तर :** प्रोस्टेट वाढीची लक्षणे पुढीलप्रमाणे असू शकतात:

* रात्री वारंवार लघवी होणे, * लघवीचा जोर कमी होणे, * लघवी सुरू होण्यास अडचण, * लघवी पूर्ण न झाल्यासारखी भावना, * अचानक लघवीची तीव्र इच्छा

ही लक्षणे दुर्लक्ष केल्यास संसर्ग किंवा लघवी अडण्यासारख्या गुंतागुंती होऊ शकतात.

**प्रश्न ४ : प्रोस्टेट वाढ म्हणजे कॅन्सर आहे का?**

**उत्तर :** नाही. प्रोस्टेट वाढ ही कॅन्सर नसते. मात्र, दोन्ही आजारांची लक्षणे काही प्रमाणात सारखी असू शकतात, त्यामुळे योग्य तपासणी महत्त्वाची आहे.

**प्रश्न ५ : डॉक्टरांकडे कधी जावे?**

**उत्तर :** खालील परिस्थितीत युरोलॉजिस्टचा सल्ला घ्यावा:

* रात्रीची लघवी वाढणे, * लघवीचा प्रवाह खूप कमी होणे, * वारंवार लघवीचा संसर्ग होणे, * अचानक लघवी पूर्णपणे अडणे

वेळीच उपचार केल्यास मोठ्या शस्त्रक्रियेची गरज टाळता येते.

**प्रश्न ६ : प्रोस्टेट वाढीचे निदान कसे केले जाते?**

**उत्तर :** निदानासाठी पुढील तपासण्या केल्या जाऊ शकतात:

* वैद्यकीय तपासणी, * सोनोग्राफी, * लघवी व रक्त तपासणी, * तपासणी (गरज असल्यास) * युरोफ्लोमेट्री

**प्रश्न ७ : प्रोस्टेट वाढीचे उपचार कोणते?**

**उत्तर :** उपचार आजाराच्या तीव्रतेवर अवलंबून असतात.

* सुरुवातीच्या टप्प्यात औषधोपचार, * लेझरद्वारे प्रोस्टेट शस्त्रक्रिया, * दुर्बिणीद्वारे (एंडोस्कोपिक) शस्त्रक्रिया

आजकालचे उपचार सुरक्षित व प्रभावी आहेत.

**प्रश्न ८ : लेझर प्रोस्टेट उपचारांचे फायदे काय?**

**उत्तर :** आधुनिक लेझर उपचारांमुळे :

* रक्तस्राव कमी होतो, * वेदना कमी होतात, * लवकर बरे वाटते, * हॉस्पिटलमध्ये कमी दिवस राहावे लागतात. * दैनंदिन जीवनात लवकर परतता येते.

**प्रश्न ९: प्रोस्टेट वाढ टाळता येते का?**

**उत्तर :** प्रोस्टेट वाढ पूर्णपणे टाळता येत नसली तरी, वेळीच तपासणी, निरोगी जीवनशैली व नियमित वैद्यकीय सल्ला यामुळे लक्षणे नियंत्रणात ठेवता येतात.

**प्रश्न १० : जनतेसाठी काय संदेश आहे?**

**उत्तर :** प्रोस्टेट वाढ ही सामान्य व उपचारयोग्य समस्या आहे. लाज किंवा भीती न बाळगता वेळीच डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. लवकर उपचार केल्यास जीवनमान नक्कीच सुधारते. **

---

# विद्यार्थ्यांसाठी यशस्वी भव मंत्र

सुनील गवळी

परमेश्वर इतका सुंदर आहे की ज्यानं जन्मत:च आपल्यामध्ये कौशल्य भरभरून दिलेली आहेत.

माणूस जन्माला येतो तेव्हा तो रिकामा नसतो; तो शक्यतांनी भरलेला असतो. प्रत्येक व्यक्तीच्या आत काही ना काही सुप्त गुण, नैसर्गिक क्षमता आणि वेगळेपण दडलेले असते. परमेश्वराने कोणालाही अपूर्ण घडवलेले नाही. फक्त प्रत्येकाला वेगवेगळ्या प्रकारची देणगी दिलेली आहे. कुणाकडे बोलण्याची कला आहे, कुणाकडे निरीक्षणशक्ती, कुणाकडे कल्पकता, तर कुणाकडे चिकाटी.

तुम्ही भाषण करू शकता, ज्या पद्धतीने सायकल सहजतेने चालवू शकता तसे पोहणे शिकू शकता.

ही सगळी कौशल्ये जन्मत: आपल्यात नसतात, पण ती शिकण्याची क्षमता मात्र जन्मत: आपल्यात असते. लहान मूल सायकल शिकताना किती वेळा पडते; पण ते कधीही म्हणत नाही की "माझ्यात हे कौशल्य नाही." ते प्रयत्न करते, चुकते, शिकते आणि शेवटी यशस्वी होते. हाच नियम आयुष्यातील प्रत्येक कौशल्याला लागू होतो.

अभ्यासाची देखील एक कौशल्य असते; ते देखील आत्मसात करून तुम्ही परीक्षेत टॉपर होऊ शकतात.

अभ्यास म्हणजे फक्त पुस्तके वाचणे नव्हे, तर लक्ष केंद्रित करणे, वेळेचे नियोजन करणे, समजून घेणे, आठवण ठेवणे आणि आत्मविश्वासाने उत्तर लिहिणेही सगळी कौशल्ये आहेत. टॉपर विद्यार्थी इतरांपेक्षा जास्त हुशार असतात असे नाही; त्यांनी अभ्यासाचे कौशल्य विकसित केलेले असते.

मात्र या कौशल्यांकडे, आपल्यात दडलेल्या सुप्त गुणांकडे आपण बघत नाही आणि हीच मोठी चूक होत असते.

अनेक विद्यार्थी स्वत:ला कमी लेखतात. "मला गणित येत नाही", "माझी स्मरणशक्ती कमजोर आहे", "मी हुशार नाही" असे ठराविक लेबल स्वत:लाच लावतात. हीच सर्वांत मोठी चूक आहे. आपण स्वत:वर विश्वास ठेवत नाही, तेव्हा आपले सुप्त गुण सुप्तच राहतात.

भगवद्गीतेत सांगितले आहे "उद्धरेदात्मनाऽत्मानं" म्हणजे माणसाने स्वत:च स्वत:ला उंचावले पाहिजे. दुसरे कोणी येऊन आपल्यातील क्षमता जागी करणार नाही; ती आपल्यालाच ओळखावी लागते.

तुम्हाला जर जी जी कौशल्य आत्मसात करावयाचे असते, त्यासाठी आवश्यक आहे भावनिक बुद्धिमत्ता.

आजच्या यशस्वी जीवनात केवळ बुद्ध्यांक पुरेसा नाही; भावनिक बुद्धिमत्ता अत्यंत महत्त्वाची आहे. परीक्षा, स्पर्धा, अपयश, दबाव, भीती, अपेक्षा या सगळ्यांशी सामना करण्यासाठी भावना समजून घेण्याची क्षमता आवश्यक असते.

भावनिक असणे म्हणजे कमजोर असणे नव्हे, तर स्वत:च्या भावना ओळखणे, स्वीकारणे आणि योग्य प्रकारे हाताळणे होय. अपयश आल्यानंतर खचून न जाता पुन्हा उभे राहणे, रागावर नियंत्रण ठेवणे, भीतीला सामोरे जाणे हे सगळे भावनिक बुद्धिमत्तेचे भाग आहेत.

तुमच्यात भावनिक बुद्धिमत्तेचा विकास झाला पाहिजे आणि ते एक कौशल्य आहे की जे आपण घडवू शकतो.

जसे गणिताचा सराव करता येतो, तसेच भावनांचाही सराव करता येतो. ध्यान, आत्मपरीक्षण, सकारात्मक विचार, स्वत:शी संवाद या माध्यमांतून भावनिक बुद्धिमत्ता विकसित करता येते. हे जन्मजात नसते; ते घडवता येते.

स्वामी विवेकानंद म्हणतात, ही शक्ती फक्त शरीराची किंवा बुद्धीची नसून मनाचीही असते. भावनिकदृष्ट्या मजबूत विद्यार्थीच खरे यश मिळवतात.

आणि हीच भावना आपल्याला आयुष्यात टॉपर बनवू शकते.

टॉपर म्हणजे फक्त जास्त गुण मिळवणारा नव्हे, तर जो स्वत:वर विश्वास ठेवतो, अपयशातून शिकतो, सातत्य ठेवतो आणि स्वत:च्या क्षमतेवर श्रद्धा ठेवतो तोच खरा टॉपर असतो परीक्षेतच नाही, तर आयुष्यातही.

शेवटी, विद्यार्थ्यांनो, परमेश्वराने तुम्हाला जे दिले आहे ते ओळखा. तुमच्यातील सुप्त गुणांवर विश्वास ठेवा. कौशल्ये शिकता येतात, भावना घडवता येतात आणि यश मिळवता येते. स्वत:ला कमी लेखु नका कारण तुमच्यात टॉपर होण्याची क्षमता आधीपासूनच आहे.

**(लेखक गटशिक्षणाधिकारी, तथा विद्यार्थी, शिक्षक, पालक समुपदेशक आहेत.)**



**

## शेकापक्षाचे एक संस्थापक, सत्यशोधक चळवळीचे नेते,
# मजुरकर्ते रामचंद्र नारायण लाड

**महान समाज सुधारक महात्मा जोतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज यांच्याकडून प्रेरणा घेवून बहुजन समाजात अनेक बुध्दीमान तरूण कार्यकर्ते निर्माण झाले. त्यात सत्यशोधक चळवळीतील नेते शेकापक्षाचे एक संस्थापक 'मजुरकर्ते रामचंद्र नारायण लाड यांचे नाव आग्रक्रमाने घ्यावे लागेल. सामाजिक आणि सांस्कृतिक स्थित्यंतराच्या त्या काळात सत्य आणि वादळी विचार मांडणारे रामचंद्र नारायण लाड यांनी पत्रकारितेबरोबरच 'मजुर साप्ताहिकाचे संपादक व सत्यशोधक चळवळीतील एक राजकीय नेता' म्हणून बहुजनसमाजाचे प्रबोधन करण्याचे केलेले कार्य फार मोठे आहे.**

सुधाकर लाड

पेशव्यांच्या जन्माबाबतच्या सत्य इतिहासावर आधारीत मराठ्यांचे दासीपुत्र अर्थात पायपोस किंमतीचे पेश-वे या रामचंद्र नारायण लाड यांनी लिहिलेल्या पुस्तकात वादळी विधाने करून रामचंद्र लाड यांनी त्यावेळी महाराष्ट्रात खळबळ उडवून दिली होती.

इ.स. १९२० च्या काळात सामाजिक आणि राजकीय क्षितीजावर टिळक, आगरकर, गोखले हे ब्राह्मण नेतेच दिसत होते पण त्यांच्या आधीपासून बहुजन समाजात ब्राह्मणेतरांमध्ये महात्मा जोतिबा फुले यांनी बहुजन समाजात जागृती व प्रबोधन करण्यासाठी लेखणी हातात घेतली होती. 'दिनबंधु' नांवाचे वृत्तपत्र त्यांनी सुरू केले. सत्यशोधक समाजाची स्थापना करून त्यांनी बहुजन समाजाला एक हक्काचे व्यासपीठ निर्माण करून दिले. त्यामुळे महाराष्ट्रात सत्यशोधक समाजाचे कार्य वाढले.

राजर्षी शाहू महाराजांच्या मृत्युनंतर १९२२ पासून महाराष्ट्रातील बहुजन समाजाने ब्राह्मणी वर्चस्वाला आणि बाह्मण नेत्यांना झुगारून द्यायला खऱ्या अर्थाने सुरूवात केली असं म्हटलं तर चुक होणार नाही. हिंदू धर्मातील अठरा पगड जातीतील लोकांवर सर्वार्थाने अन्याय होत होता, अशा परिस्थितीत महात्मा जोतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज यांच्याकडून प्रेरणा घेवून बहुजन समाजातील लोक सत्यशोधक चळवळीच्या माध्यमातून आपल्या हक्कांसाठी एकत्र येवू लागले, भांडू लागले, संघर्ष करू लागले.

टिळकांच्या पुढाकाराने पुण्यात सुरू झालेल्या गणपती उत्सवाच्या वेळी मेळे होत. या मेळ्यात बहुजन समाजातील समाज सुधारकांवर चिखलफेक करणारी कवने गायली जात. त्याला उत्तर देण्यासाठी बहुजन समाज सुधारकांनीही राजर्षी शाहू महाराजांच्या स्मृतिप्रित्यर्थ पुण्यात मेळे भरवायला सुरूवात केली. या मेळ्यात टिळक व ब्राह्मणी समाजावर राग व्यक्त करणारी कवने गायली जात.

याच काळात माधवराव बागल यांच्या 'हंटर', 'विजयी मराठा', 'जागृती', 'जनता' इत्यादी बहुजन समाजाच्या मालकीच्या वृत्तपत्रातून ब्राह्मण समाजाबद्दल चीड व्यक्त होत होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर 'मूकनायक' वृत्तपत्रातून ब्राह्मणांनी दलित समाजावर केलेल्या अन्यायावर लेखणीतून फटकारे मारीत होते. प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे ब्राह्मणांनी कायस्थ प्रभू समाजावर केलेल्या अन्यायाविरोधात, ब्राह्मणी भिक्षुकशाही विरोधात प्रबोधनमधून लेखणीचे घणाघाती हल्ले करीत होते. बहुजन समाजाच्या या वृत्तपत्रांनी व नेत्यांनी दैनिक केसरी व केसरीचे संपादक टिळकांना टिकेचे लक्ष केले होते. त्यावेळी पुणे नगरपालिकेत महात्मा जोतिबा फुले यांचा पुतळा बसविण्यात यावा असा ठराव मांडण्यात आला. या ठरावाला टिळकांच्या अनुयायांनी विरोध केला, त्यामुळे तर टिळकांविषयी सत्यशोधक चळवळीतील लोकांचा राग आणखी उफाळून आला. सत्यशोधक चळवळीतील नेते रामचंद्र नारायण लाड यांच्या 'मजुर या साप्ताहिकात' ओळखा कोण हा नकटा या शिर्षकाखाली टिळकांच्या चरित्रावर व कर्तृत्वावर विषाक्त लिखाण पदांतून करण्यांत आले. टिळकांचा मुलगा श्रीधरपंत याच्यावरही या पदांतून टिका करण्यात आली हे हमी झाले म्हणून की काय याच दरम्यान सत्यशोधक चळवळीतील एक फर्डे वक्ते, लेखक व नेते दिनकरराव जवळकर यांनी देशाचे दुश्मन ही पुस्तिका लिहिली ही पुस्तिका शेकापक्षाचे एक संस्थापक केशवराव जेधे यांनी प्रकाशित केली तर या पुस्तिकेचे मुद्रण शेकापक्षाचे दुसरे एक संस्थापक रामचंद्र नारायण लाड यांनी केले.




देशाचे दुश्मन या पुस्तिकेतील पदे खूप लोकप्रिय झाली. या पद्य संग्रहातील पदांमुळे टिळकांची बदनामी होतेय असा आक्षेप घेवून श्रीधरपंत टिळक यांनी या पुस्तिकेचे लेखक दिनकरराव जवळकर व मुद्रक रामचंद्र नारायण लाड यांच्यावर पुण्यातील शहर न्यायालयात अब्रुनुकसानीचा खटला भरला. दिनकरराव जवळकरांनी 'देशाचे दुश्मन' या पुस्तिकेची मला हस्तलिखीत प्रत दिली. माझा मुद्रकांचा व्यवसाय असल्याने ती मी छापली. असा युक्तीवाद रामचंद्र नारायण लाड यांनी न्यायालयात केला. तर देश-ाचे दुश्यन ही पुस्तिका ब्राह्मण समाजाची नालस्ती करण्यासाठी मी प्रसिद्ध केली नसून टिळकांचे खरे चरित्र लोकांसमोर यावे या हेतूने मी प्रकाशित केली. या पुस्तिकेतील पदे पुणे नगरपालिकेसंबंधी आहेत असा युक्तीवाद दिनकरराव जवळकरांनी केला. त्यावेळी नुकतेच बॅरिस्टर होवून आलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी रामचंद्र लाड यांच्या घरी जावुन या बहुचर्चित खटल्याचे काम करण्याची तयारी दर्शविली. आपण बॅरिस्टर आहात, आपली फी मी देवू शकणार नाही असे रामचंद्र लाड, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना म्हणाले त्यावर मी या कामाची फक्त एक रूपया फी घेईन. या खटल्याच्या निमित्ताने बॅरिस्टर म्हणून मी मिळवलेल्या ज्ञानाचाही मला कस लावता येईल असे डॉ. बाबासाहेब म्हणाल्यावर या खटल्याचे काम करण्यासाठी रामचंद्र लाड यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वकीलपत्रावर सही केली. पुढे इंग्रज न्यायाधिश फ्लेमिंग साहेबांनी टिळकांवर 'देशाचे दुश्मन' या पद्य संग्रहात गलिच्छ स्वरूपाची व बदनामीकारक टिका असल्याचे या खटल्याच्या दिलेल्या निर्णयात नमूद करून दिनकरराव जवळकर व रामचंद्र लाड यांना प्रत्येकी पाचशे रूपये दंड व दंड न भरल्यास पाच महिने साधी कैद अशी शिक्षा सुनावली. याच खटल्याच्या वेळी विष्णूशास्त्री चिपळूणकर यांची 'देशाचे दुश्मन' या पुस्तिकेमुळे बदनामी होतेय असा आक्षेप घेवून विष्णूशास्त्रीचे पुतणे कृष्णराव चिपळूणकर यांनीही दिनकरराव जवळकर व या पुस्तिकेला प्रस्तावना लिहिणारे केशव गणेश बागडे यांच्यावर पुण्याच्या न्यायालयात अब्रुनुकसानीचा खटला दाखल केला. या खटल्यात दिनकरराव जवळकरांना व केशव बागडे यांना शंभर रूपये दंड व हा दंड न भरल्यास दोन महिने साधी कैद अशी शिक्षा न्यायाधिश फ्लेमिंग यांनी सुनावली होती. 'देशाचे दुश्मन' या पद्य पुस्तिकेवरील बहुचर्चित खटल्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चालविले होते. कृष्णराव चिपळूणकर हे विष्णूशास्त्रीचे जवळचे नातेवाईक नाहीत हे न्यायाधीशांना पटवून देत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वकील म्हणून आपली प्रतिभा या खटल्याच्या कामकाजात दाखवून दिली व बहुजन समाजातील लेखकांवर, ३२ वर्षांच्या श्रीधरपंत टिळकांनी आत्महत्या करण्यापूर्वी तीन पत्रे पाठविली होती. त्यातील एक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना दुसरे पुण्याच्या जिल्हाधिकाऱ्यांना आणि तिसरे वृत्तपत्राच्या संपादकांना पाठविले होते हे पत्र ३ जून १९२८ रोजी शिवराय प्रकाशनाने प्रसिद्ध केलेले आहे. या खटल्यातील प्रतिवादी केशवराव जेधे, दिनकरराव जवळकर, रामचंद्र लाड इत्यादी सत्यशोधक चळवळीतील नेत्यांनीच पुढे ३ ऑगस्ट, १९४७ रोजी आळंदी येथे शेतकरी कामगार पक्षाची स्थापना केली. **

# प्रवासातून समृद्धी

मुक्तांगण
प्रा. शाम जोगळेकर
मो. ९२७३३४३१७७



माझे सर्व शिक्षण रत्नागिरीला झाले. त्यानंतर नोकरी निमित्ताने अलिबाग गाठले आणि नंतर तेथेच स्थायिक झालो. निवृत्तीनंतरही रत्नागिरीची ओढ कमी झाली नाही. तेथील नातेवाईक, स्नेहीजन यांना भेटावेसे वाटते. मात्र आता तेथे वर्षातून एकदाच जाणे शक्य होते. डिसेंबर,२०२५मध्ये आम्ही दोघे रत्नागिरी गेलो होतो. तेथे मोठ्या बहिणीची आणि अन्य नातेवाईकांची भेट झाली, खुशाली समजली. विविध स्नेही, कॉलेजमधील मित्रमैत्रिणी भेटले. अन्य काही मान्यवर नव्याने परिचित झाले.



वयाची साठी ओलांडल्यानंतर रत्नागिरीच्या अमृता ट्रॅव्हल्समधून आम्ही दोघांनी, चार वर्षांत एकूण पाच सहली केल्या. अमृता आणि अजित करंदीकर यांचे सहलनियोजन उत्तम असल्याने आणि सोबत बहुसंख्य रत्नागिरीकर असल्याने दुधात साखर! सहल काळात काहींच्या दीर्घ काळानंतर पुनर्भेटी झाल्या, तर काहींचा नव्याने परिचय सहल काळात झाला, नवनवीन ठिकाणांना भेटी देताना, गप्पागोष्टी, हास्यविनोद होत होते. फावल्या वेळात वाचनही. अमृता ट्रॅव्हल्सचा रौप्यमहोत्सवी कार्यक्रम रत्नागिरीला, १४ डिसेंबर रोजी साजरा करण्यासाठी, करंदीकर कुटूंबियांनी सहल सहभागींचा जंगी मेळावा घेतला होता. त्या कार्यक्रमासाठी आम्ही दोघे आवर्जून उपस्थित होतो. अमृता ट्रॅव्हल्सच्या पंचवीस वर्षांच्या वाटचालीचे दृकश्राव्य माध्यमाद्वारे दर्शन झाले. त्यावेळी काहींनी आपले अनुभव मांडले. मलाही माझे अनुभव, सातशे सहलप्रेमींसमोर मांडण्याची संधी मिळाली. सहल संपल्यावरही, काही सहल सहभागींशी विविध माध्यमांद्वारे संवाद होत राहिला. तो घडणे, सहलीतून प्राप्त विविध अनुभव लिखित स्वरूपात मांडणे, हे महत्त्वाचे असल्याचे सांगितले. दीर्घ काळानंतर काही सहल सहभागी भेटल्याने आनंद वाटला, तर काही इहलोक सोडून गेल्याचे दुःखही!

दुसऱ्या दिवशी आम्ही दोघे डॉ.अलिमिया परकार यांना भेटण्यासाठी, त्यांच्या घरी गेलो होतो. ''वाटचाल सहा दशकांची'' या त्यांच्या पुस्तकामुळे त्यांची ओळख झाली आणि नंतर मैत्रीही! पुस्तक परीक्षण लिहिण्यासाठी, त्यांनी अन्य काही पुस्तके मला दिली होती. माझे कॉलेजमधील चार वर्षांचे, ज्येष्ठ वर्गमित्र वसंत करंबेळकर यांच्या घरी गेल्यावर गप्पागोष्टी सुरू असताना, त्यांच्या मोठ्या बहिणीची नात, भक्ती कुलकर्णी गोव्याहून, तिच्या काकांसह तेथे आल्याने, तिची विशेष ओळख, आनंद देऊन गेली. भक्ती ही सुप्रसिद्ध बुद्धिबळपटू असून, वयाच्या अडीच वर्षांपासून बुद्धिबळ खेळू लागली. वयाच्या सहाव्या वर्षी तिने राज्य पातळीवर यश मिळविले. २०१२ मध्ये ती ग्रँडमास्टर झाली, तर २०१९ मध्ये तिला इंटरनॅशनल मास्टर आणि अन्य पुरस्कारानंतर, तिला, भारत सरकारचा, खेळातील, सर्वात प्रतिष्ठित, अर्जुन पुरस्कार, २०२२मध्ये प्राप्त झाला. अर्जुन पुरस्कार प्राप्त, एखाद्या खेळाडूला प्रत्यक्ष भेटण्याची संधी मला प्रथमच मिळाली. तिच्या विविध मुलाखतींतून, उच्चविद्याविभूषित असलेल्या, भक्तीचे, संपन्न व्यक्तिमत्त्व उलगडते. घरातील ज्येष्ठांचे आशीर्वाद आणि गुरुंचे सतत मार्गदर्शन मिळत असल्याचे ती नम्रपणे सांगते. त्यानंतर दिगंबर घैसास, अनिल नारकर यांचीही भेट घेतली. गोगटे कॉलेजमधून पहिली पदवी घेतली, त्याला आता ५५ वर्षे होऊन गेली. त्यावेळी माझे बहुतेक मित्र नोकरी करणारे होते. माझ्यापेक्षा, काही वगळता, बहुतेक सर्व वयाने मोठे होते. आता ते सर्व माझ्याप्रमाणेच ज्येष्ठ नागरिक असल्यामुळे, आवडणाऱ्या मित्रांची वाट पाहत असतात.

रत्नागिरी दौऱ्यात, पत्रकार, लेखक आणि बहुउद्योगी राजेंद्रप्रसाद मसुरकर भेटले. त्यांच्याशी विविध विषयांवर गप्पा झाल्या. यावेळी प्रथमच, साप्ताहिक कोकण मीडियाचे संपादक आणि प्रकाशक, प्रमोद कोनकर यांची भेट झाली. त्यांच्या बरोबर त्यांचे मित्र तुषार आग्रे आणि अमित अस्नीकर, या गुणी, उद्योगी तरुणांची भेट झाली. तुषार हे नारळ उत्पादनांशी निगडित, विविध व्यवसाय आणि सल्ला देण्याचे कार्य करतात. तर अमित लघुउद्योग आणि विशेषत: स्त्रियांमधील रोजगार वाढविण्यासाठी प्रयत्नशील आहेत. मारुती मंदिरजवळच्या हॉटेल वायंगणकरचे मालक विनोद यांची भेट घेतली. कारण ते आपला व्यवसाय सांभाळून, अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य करतात. माझ्या मोठ्या बहिणीच्या वर्गातील आणि पूर्वपरिचित सुभाष थरवळ, भेटायला आल्याने, आम्हा सर्वांना, त्यांच्या खूप वर्षांनी झालेल्या भेटीमुळे आनंद झाला.

अलीकडे पर्यटन व्यवसाय, देशविदेशांत विस्तारला आहे. सध्या धार्मिक पर्यटनाला विशेष प्रोत्साहन दिले जात आहे.त्यामुळे विविध व्यवसायांत, रोजगार संधी निर्माण झाल्या आहेत. मात्र वाहतुकीतील विविध समस्याही वाढत आहेत. नादुरुस्त रस्त्यांच्या समस्या, सार्वजनिक वाहतुकीतील अपुरेपणा आणि अन्य समस्यांमुळे अपघात वाढत आहेत. त्यामधील मृत्यूप्रमाण वाढले आहे. पर्यटनासाठी भरपूर खर्च करणाऱ्या पर्यटकांनी आपल्यामुळे इतरांना त्रास होणार नाही, याचीही काळजी घेण्याची गरज आहे. अन्यथा वाढते पर्यटन स्थानिकांना त्रास देणारे ठरेल आणि समाजाला प्रदूषणकारीही! प्रवासातून मिळणारे विविध अनुभव माणसाला संपन्न करतात. आपले जीवन हा एक दीर्घ प्रवासच आहे. आनंदी, संपन्न जीवन लाभल्यास हा प्रवासही यशस्वी झाला असे म्हणता येईल. तुमचा जीवन प्रवास सुखाचा व्हावा, यासाठी हार्दिक सदिच्छा! **

# महत्त्वाकांक्षी कॉरिडॉरसाठी हवा भक्कम अर्थपुरवठा

**केंद्रीय अर्थसंकल्पात वार्षिक पायाभूत सुविधांवरचा खर्च ११ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त असून २०३० पर्यंत राष्ट्रीय पायाभूत सुविधांसाठी १४३ लाख कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. त्यातून केली गेलेली सात 'हाय-स्पीड कॉरिडॉर' तसेच मालवाहतूक कॉरिडॉरची घोषणा भारताला वेगवान रेल्वेच्या जागतिक नकाशावर नेण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. नेमका काय आहे हा प्रकल्प?**

प्रा. सुखदेव बखळे



पर्यावरणीयदृष्ट्या शाश्वत प्रवासी प्रणालींना प्रोत्साहन देण्यासाठी सात 'हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉर' विकसित करण्याची घोषणा केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी अर्थसंकल्पात केली. त्यात मुंबई-पुणे, पुणे- हैदराबाद, हैदराबाद-बंगळुरू, हैदराबाद- चेन्नई, चेन्नई-बंगळुरू, दिल्ली-वाराणसी आणि वाराणसी-सिलीगुडी या मार्गांचा समावेश आहे. याशिवाय तीन नवीन समर्पित मालवाहतूक कॉरिडॉर जाहीर करण्यात आले आहेत. त्यांचे व्यवहार्यता अहवाल रेल्वेकडून तपासून पाहिले जात आहेत. त्यात फक्त एका समर्पित मालवाहतूक कॉरिडॉरचा उल्लेख करण्यात आला. दुसरीकडे, सात नवीन 'हाय-स्पीड कॉरिडॉर'ची घोषणा काहीशी आश्चर्यकारक होती. कारण ते खूप महागडे आहेत. भारतातील पहिला 'हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉर' अद्याप कार्यान्वित झालेला नाही आणि २०२९ पर्यंत कार्यान्वित होण्याची शक्यता कमी आहे. या अर्थसंकल्पात रेल्वेच्या भांडवली खर्चासाठी वाढीव तरतूददेखील समाविष्ट आहे. २०१४-१५ पासून केंद्रीय अर्थसंकल्पात भारतीय रेल्वेला भांडवली खर्चासाठी विक्रमी निधी मिळत आहे आणि गेल्या तीन वर्षांमध्ये दर वर्षी दोन लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त विक्रमी निधीचे वाटप झाले आहे. या वर्षीचे हे वाटप गेल्या वर्षीच्या तुलनेत सुमारे २५ टक्के जास्त आहे. अतिरिक्त अर्थसंकल्पीय संसाधनांमधून मिळणारा १२ हजार कोटी रुपयांचा निधी जोडल्यास २०२६-२७ चा एकूण भांडवली खर्च दोन लाख नव्वद हजार कोटी रुपयांपर्यंत वाढतो. तो २०२५-२६ च्या सुधारित अर्थसंकल्पातील दोन लाख ६२ हजार कोटी रुपयांच्या तुलनेत जास्त आहे. या पार्श्वभूमीवर हाय स्पीड आणि मालवाहतूक कॉरिडॉरची घोषणा भारताला वेगवान रेल्वेच्या जागतिक नकाशावर नेण्याचा महत्वाचा प्रयत्न ठरत आहे.

भांडवली खर्च वाटप आणि विविध मागणी शीर्षकांमध्ये त्याचे वितरण यांचे विश्लेषण करण्यापूर्वी अर्थसंकल्पात जाहीर केलेल्या प्रस्तावित सात 'हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉर' आणि एका समर्पित मालवाहतूक कॉरिडॉरच्या खर्च घटकाचे मूल्यांकन करणे आवश्यक आहे. प्रस्तावित सात नवीन 'हाय-स्पीड' कॉरिडॉरमध्ये अंदाजे चार हजार किलोमीटरच्या 'हाय-स्पीड रेल्वेलाईन्स' टाकाव्या लागणार आहेत. त्यासाठी अंदाजे १६ लाख कोटी रुपये खर्च करावा लागू शकतो. दानकुनी आणि सुरतदरम्यानचा पूर्व-पश्चिम समर्पित मालवाहतूक कॉरिडॉर अंदाजे दोन हजार किलोमीटर लांबीचा असेल. त्यासाठी अंदाजे २.७ लाख कोटी रुपये खर्च येईल. या सर्व प्रस्तावित कॉरिडॉरना अद्याप मंजुरी मिळालेली नाही. अहमदाबाद ते मुंबई हा भारतातील पहिला 'हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉर' ५०८ किलोमीटर लांबीचा आहे. त्याचा मूळ खर्च अंदाजे एक लाख कोटी रुपये इतका होता. ताज्या अहवालांनुसार या प्रकल्पाला बराच वेळ लागल्यामुळे खर्च जवळजवळ दुप्पट होऊन अंदाजे दोन लाख कोटी रुपये झाला आहे. हा 'हाय-स्पीड' प्रकल्प २०१६ मध्ये मंजूर झाला होता आणि २०२९ पर्यंत पूर्णपणे कार्यान्वित करण्याचे लक्ष्य आहे. सात नवीन 'हाय-स्पीड कॉरिडॉर' पूर्ण होण्यास एक दशकाहून अधिक काळ लागू शकतो. या 'हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉर'साठी नावीन्यपूर्ण वित्तपुरवठा यंत्रणादेखील उभारावी लागेल. कारण त्यांना रेल्वेसाठीच्या भांडवली खर्चासाठी सध्याच्या बजेट वाटपाद्वारे निधी दिला जाऊ शकत नाही.

असे असले तरी या प्रकल्पांच्या पूर्णत्वाची आवश्यक गती सुनिश्चित करून, जागतिक बँकेसारख्या बहुपक्षीय वित्तीय संस्था आणि खासगी क्षेत्राला सहभागी करून घेतले पाहिजे. ते अहमदाबाद ते मुंबईला जोडणाऱ्या सध्याच्या 'हाय-स्पीड रेल कॉरिडॉर'पेक्षा कमी कालावधीत पूर्ण केले जाऊ शकतात. हा एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे आणि त्याला प्राधान्य देऊन, २०४० पर्यंत 'हाय-स्पीड रेल नेटवर्क' असलेल्या जगातील पहिल्या पाच देशांमध्ये भारताला निश्चितच स्थान मिळेल. २२० किलोमीटर प्रति तास पेक्षा जास्त वेग असलेले 'हाय-स्पीड रेल नेटवर्क' जगभरात विस्तारत आहेत. चीन 'हाय-स्पीड रेल नेटवर्क'च्या विकास आणि विस्तारात आघाडीवर आहे. त्यानंतर स्पेन, फ्रान्स, जर्मनी, जपान, स्वीडन, दक्षिण कोरिया, ब्रिटन आणि इटली यांचा क्रमांक लागतो. मोरोक्को, सौदी अरेबिया, हाँगकाँग, इंडोनेशिया आणि तुर्कीसह अनेक विकसनशील अर्थव्यवस्थांनीही 'हाय-स्पीड रेल नेटवर्क' सुरू केले आहेत. सध्या चीनमध्ये पन्नास हजार किलोमीटरपेक्षाही जास्त 'हाय-स्पीड रेल नेटवर्क' आहे. इतर सर्व देशांच्या एकत्रित 'हायस्पीड रेल्वे नेटवर्क'पेक्षा ते जास्त आहे. चीननंतर स्पेन, जपान, फ्रान्स आणि जर्मनीमध्ये अंदाजे तीन ते चार हजार किलोमीटर लांबीचे 'हाय-स्पीड रेल्वे नेटवर्क' कार्यरत आहेत. या पार्श्वभूमीवर भारतात निर्माणाधीन असलेल्या आणखी सात 'हाय-स्पीड कॉरिडॉर'च्या प्रस्तावात एकूण साडेचार हजार किलोमीटरचे 'हाय-स्पीड रेल्वे नेटवर्क' असेल. हे सात कॉरिडॉर पूर्ण झाल्यानंतर भारताला या संदर्भात जगातील पहिल्या तीन देशांमध्ये स्थान मिळेल.

'हाय-स्पीड रेल्वे नेटवर्क'च्या कामाची गती समजून घेण्यासाठी चीनने या क्षेत्रात केलेल्या प्रगतीकडे पाहणे आवश्यक आहे. २०२१ ते २०२५ दरम्यानच्या १४ व्या पंचवार्षिक योजनेच्या काळात चीनचे 'हाय-स्पीड रेल्वे नेटवर्क' ३३ टक्क्यांनी वाढले आहे. ३८ हजार किलोमीटरवरून ५० हजार चारशे किलोमीटरपर्यंत म्हणजेच पाच वर्षांच्या कालावधीमध्ये अंदाजे १२ हजार किलोमीटर 'हाय-स्पीड रेल्वे नेटवर्क' पूर्ण झाले आहे. अहवालांनुसार २०३० पर्यंत चीनने आपले एकूण रेल्वे नेटवर्क एक लाख ऐंशी हजार किलोमीटरपर्यंत वाढवण्याची योजना आखली आहे. त्यात अंदाजे साठ हजार किलोमीटर 'हाय-स्पीड रेल्वे'चा समावेश आहे. भारताला असे मोठे प्रकल्प हाती घ्यायचे असतील तर भारतीय रेल्वे प्रकल्पांसाठी लागणारा खर्च आणि वेळ लक्षणीयरीत्या कमी करणे आवश्यक आहे. या मेगा प्रकल्पांना रेल्वेसाठी वाटप केलेल्या भांडवली खर्चातून वित्तपुरवठा करता येत नाही. जागतिक बँकेने प्रदान केलेल्या नावीन्यपूर्ण 'पीपीपी' वित्तपुरवठा यंत्रणांचा शोध घेणे आवश्यक आहे. खासगी क्षेत्र 'ईस्टर्न डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर' आणि 'हाय-स्पीड रेल्वे नेटवर्क'चा विचार करू शकते. घोषित केलेल्या 'फ्रेट कॉरिडॉर'ला जागतिक बँकेसारख्या बहुपक्षीय वित्तीय संस्थांकडून वित्तपुरवठा येऊ शकतो. या मालवाहतूक कॉरिडॉरसाठी खासगी भांडवलदेखील मिळवता येईल. 'हाय-स्पीड कॉरिडॉर'पेक्षा या मालवाहतूक कॉरिडॉरमधून खूप जास्त आर्थिक परतावा मिळतो. भारतीय रेल्वेने उद्योगांच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी आणि भारतीय रेल्वेच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी मालवाहतूक क्षमता वाढावी या उद्देशाने तीन नवीन समर्पित मालवाहतूक कॉरिडॉरचा विचार केला आहे. या समर्पित मालवाहतूक कॉरिडॉरमध्ये उत्तर-दक्षिण समर्पित मालवाहतूक कॉरिडॉर आणि पूर्व किनारपट्टी समर्पित मालवाहतूक कॉरिडॉर यांचा समावेश आहे. विद्यमान पूर्व आणि पश्चिम समर्पित मालवाहतूक कॉरिडॉरच्या कामगिरीवरून दिसून आले आहे, की हे समर्पित मालवाहतूक कॉरिडॉर भारतीय रेल्वेसाठी सर्वात आवश्यक प्रकल्प आहेत. ऊर्जा/खनिज/सिमेंट वाहतूक, बंदर कनेक्टिव्हिटी आणि उच्च वाहतूक घनता असलेल्या विभागांसाठी विशिष्ट मार्गांवर हे कॉरिडॉर फायदेशीर ठरणार आहेत. भारतीय रेल्वे बहुतेक व्यस्त मार्गांवर पूर्ण क्षमतेसह काम करत आहे. यामुळे, वाढलेली मालवाहतूक हाताळण्याची तिची क्षमता मर्यादित होते. आता पूर्ण झालेल्या पूर्व आणि पश्चिम समर्पित मालवाहतूक कॉरिडॉरने हे दाखवून दिले आहे, की सध्याच्या भारतीय रेल्वेमार्गावरची गर्दी कमी करण्यासाठी आणि उद्योग आणि ऊर्जा क्षेत्रांच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी अधिक समर्पित मालवाहतूक कॉरिडॉरची आवश्यकता आहे. भारतीय रेल्वेने अर्थसंकल्पात जाहीर केलेल्या समर्पित मालवाहतूक कॉरिडॉर आणि इतर समर्पित मालवाहतूक कॉरिडॉरना जलद मंजुरी देणे आणि खर्च तसेच वेळेचा अतिरेक न करता निर्धारित वेळेत पूर्ण करण्याचा प्रयत्न करणे शहाणपणाचे ठरेल.

**(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)**

# भारत-पाक सामन्यावर पावसाचे सावट

■ बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा ■ पावसाने विश्रांती घ्यावी क्रिकेटप्रेमींचे देवाकडे साकडे

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

भारत आणि पाकिस्तानच्या पावणे दोनशे कोटी जनतेसह अवघे क्रिकेटविश्व ज्या क्रिकेटयुद्धाची आतुरतेने वाट पाहतेय, त्या युद्धावर पाऊसहल्ल्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. त्यामुळे या सामन्यादरम्यान पावसाने विश्रांती घ्यावी म्हणून क्रिकेटप्रेमींनी देवाकडे साकडे घातले आहे.



कोलंबोतल्या या सामन्याच्या आयोजनाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. अखेर तीन दिवसांपूर्वी पाकिस्तानने बहिष्कार मागे घेतला होता. ते संकट दूर होत नाही तोच आता पावसाच्या संकटाने सामन्याला वेढले आहे. भारत आणि पाकिस्तान सामन्यावरील अनिश्चिततेचे सावट दूर करण्यासाठी आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद तसेच भारत-पाक लढतीचे यजमान श्रीलंकेने केलेल्या प्रयत्नांना यश आले. या सामन्यात पावसाचा मोठ्या प्रमाणावर व्यत्यय अपेक्षित आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार रविवारी पावसाची शक्यता दिवसभर पन्नास टक्के आहे. श्रीलंका हवामान खात्याने बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला आहे, त्यामुळे कोलंबोसह दक्षिण श्रीलंकेत जोरदार पावसाचा इशारा दिला आहे. या परिस्थितीत सामन्याच्या निकालावर पावसाचा परिणाम होऊ शकतो.

१५ फेब्रुवारीला दिवसभर पावसाची हजेरी राहणार असून सकाळी ९ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत ५० ते ६० टक्के पावसाची शक्यता आहे. यादरम्यान पाऊस किती जोरात कोसळतो यावर सर्वांचे लक्ष लागले आहे. सकाळ आणि दुपारच्या तुलनेत रात्री पावसाची तुरळक शक्यता आहे. पावसामुळे हा सामना होऊ शकला नाही तर याचा खूप मोठा आर्थिक फटका आयसीसीला बसू शकतो.

पावसाने हजेरी लावल्यानंतर स्टेडियममधील पाणी वेगात काढण्यासाठी लंकेने मोठ्या संख्येने मदतनीसांची फौज उभारली आहे.

पावसामुळे संपूर्ण सामना झाला नाही तरी किमान दहा-दहा षटकांचा तरी सामना व्हावा यासाठी क्रिकेटप्रेमींनी देवाचा धावा केला आहे. हा सामना जो जिंकेल तो संघ सर्वप्रथम सुपर एटमध्ये धडक मारेल आणि जर पावसाने खेळ बिघडवला तर दोन्ही संघांना एकेक गुण दिला जाईल.

२०२६ च्या टी-२० विश्वचषकात भारत आणि पाकिस्तान यांच्यात एक सामना नियोजित आहे. हा सामना कोलंबोच्या आर. प्रेमदासा स्टेडियमवर खेळला जाईल. हा सामना भारतीय वेळेनुसार संध्याकाळी ७:०० वाजता सुरु होईल. दोन्ही संघांच्या कर्णधार भारतीय वेळेनुसार संध्याकाळी ६:३० वाजता नाणेफेकीसाठी येतील. भारत आणि पाकिस्तानने २०२६ च्या टी-२० विश्वचषकात प्रत्येकी दोन सामने खेळले आहेत.

### वादळी पाऊसच अपेक्षित

गुगलच्या एआय मोडनुसार दुपारी चार ते संध्याकाळी सात या वेळात पावसाची शक्यता आहे. दुपारी चार वाजता जोरदार पावसाची शक्यता ५२ टक्के आहे. संध्याकाळी पाच वाजता वादळी पावसाचा अंदाज ४८ टक्के आहे. संध्याकाळी सहा वाजता वादळी पाऊसच अपेक्षित असला, तरी शक्यता ३६ टक्के आहे. हा सामना संध्याकाळी सात वाजता आहे. त्या वेळी हलक्या सरी असतील, असा कयास वर्तवतानाच २० टक्के अंदाज आहे. रात्री आठनंतर कमालीचे ढगाळ वातावरण असेल. त्या वेळी पावसाची शक्यता २० टक्के आहे.

## डायमंड डेअरडेव्हिल संघ विजयी

| पोयनाड | प्रतिनिधी |

पोयनाड येथील झुंझार युवक मंडळाच्या क्रीडांगणावर शुक्रवारी (दि.१३) फेब्रुवारी रोजी जैन युथ ग्रुप पोयनाडच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या जैन प्रीमियर लीग पर्व पाचवे, बॉक्स टाईप क्रिकेट स्पर्धेत किशोर जैन यांच्या डायमंड डेअरडेव्हिल संघाने स्पर्धेच्या अटीतटीच्या झालेल्या अंतिम सामन्यात पनेश जैन यांच्या धान्यम ९ संघाचा ११ धावांनी पराभव करत संपूर्ण स्पर्धेत चॅम्पियन्स ठरले आहेत. पोयनाड जैन युथ ग्रुप आयोजित जैन प्रीमियर लीग स्पर्धेत एकूण सहा संघाने सहभाग घेतला होता.स्पर्धा प्रथम लीग व त्यानंतर बाद फेरीनुसार खेळविण्यात आली. स्पर्धेत सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्यां प्रीत जैन याला मालिकावीर, उत्कृष्ट फलंदाज रिदेश जैन तर उत्कृष्ट गोलंदाज म्हणून दिक्षित जैन यांना चषक देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेच्या बक्षीस वितरणाच्या कार्यक्रमासाठी पोयनाड व्यापारी असोसिएशनचे सदस्य मनोज जैन, विक्रम जैन, भरत जैन, किशोर जैन, जितेंद्र जैन, ऋषिकुमार जैन, अशोक जैन यांच्या सह जैन बांधवांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली होती. पोयनाड येथे आयोजित स्पर्धेत जिल्ह्यातील जैन बांधवांसाठी क्रिकेट लीग स्पर्धेचे आयोजन जैन युथ ग्रुपतर्फे करण्यात आले असून रायगड जिल्ह्यातील २० संघांचा स्पर्धेत सहभाग असणार आहे. दोन दिवस पोयनाड येथे क्रिकेट खेळाचा मेळावा भरला असल्याने आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.




## आयुष म्हात्रेला खेलरत्न पुरस्कार

**विरार :** नालासोपाऱ्याच्या नाळे गावातील आयुष म्हात्रेच्या नेतृत्वात भारतीय संघाने विश्वविजेतेपद मिळवले. या यशाबद्दल पान मार्केटिंग चॅरिटेबल ट्रस्टतर्फे वसईचे माजी आ. दिवंगत डॉ. मणिक घोन्सालवीस खेलरत्न पुरस्काराने त्याला सन्मानित केले जाणार आहे.



दिवंगत डॉ. मणिक घोन्सालवीस यांच्या द्वितीय स्मृतिदिनानिमित्त ७ एप्रिलला हा सोहळा होणार आहे. सहकार क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सहकारी संस्थांना देण्यात येणाऱ्या सहकार महर्षी डॉ. मणिक घोन्सालवीस पुरस्कार वितरण समारंभातच हा खेलरत्न पुरस्कार प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती रोहन घोन्सालवीस यांनी दिली आहे.




## सिद्धीकाची ॲथलेटिक्स स्पर्धेत यश

| भाकरवड | प्रतिनिधी |

अलिबाग तालुक्यातील ग्रामपंचायत पोयनाड हद्दीतील भाकरवड गावातील सिद्धीका पाटील सुहित जीवन ट्रस्ट, पेण, येथील बौद्धिक अक्षम (मतिमंद) विद्यार्थ्यांनी स्पेशल ऑलिम्पिक नॅशनल ॲथलेटिक्स गेम्समध्ये दैदीप्यमान यश मिळवून महाराष्ट्राचे नाव उंचावले आहे. ५ व ६ फेब्रुवारी रोजी रोहतक, हरियाणा येथील ऑलिम्पिक भारत आयोजित नॅशनल ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप स्पर्धा उत्साहात पार पडल्या. या स्पर्धात ५१० दिव्यांग खेळाडूंनी सहभाग घेतला होता. स्पर्धामध्ये सुहित जीवन ट्रस्ट, पेण येथील विद्यार्थीनी सिद्धीकाने १०० मीटर धावणे यात रौप्यपदक तसेच जॅवलिंग थ्रो रौप्यपदक पटकावले. यशामागे, विद्यार्थ्यांचे पालक, तसेच क्रिडा प्रशिक्षक अमोल काईनकर व प्रीती म्हात्रे, डॉ. सुरेखा पाटील यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले. विद्यार्थ्यांच्या चमकदार कामगिरीमुळे सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## आरसीबीला मिळाल होम ग्राऊंड



| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू इंडियन प्रीमिअर लीग २०२६ मध्ये आता त्यांच्या हक्काच्या घरच्या मैदानावर खेळणार, हे निश्चित झाले आहे. कर्नाटक सरकारने चिन्नास्वामी स्टेडियमवर आयपीएल २०२६ सामने खेळण्यास कर्नाटक राज्य क्रिकेट संघटनेला परवानगी दिली आहे. आयपीएल २०२५ च्या जेतेपदाच्या जल्लोषासाठी चिन्नास्वामी स्टेडियमवर झालेल्या चेंगारचेंगरीत ११ जणांचा मृत्यू झाला आणि त्यानंतर या स्टेडियमवर एकही सामना झालेला नव्हता. सध्या सुरू असलेल्या भारतीयस्थानिकहंगामातयामैदानावर कोणताही आंतरराष्ट्रीय किंवा अगदी स्थानिक सामना झालेला नाही. चेंगराचेंगरीच्या घटनेमुळे मैदानाला आयसीसी महिला वर्ल्ड कप २०२५ च्या आयोजनाचा अधिकार गमवावा लागला. आयसीसी वेळापत्रकानुसार येथे महिला वर्ल्ड कप स्पर्धेचा पहिला सामना, एक उपांत्य फेरी आणि अंतिम सामना होणार होता. न्यायमूर्ती जॉन मायकेल डीकुन्हा आयोगाने एक चौकशी समिती नेमली आणि ज्यात स्टेडियम सामने आयोजित करण्यासाठी अयोग्य आणि असुरक्षित असल्याचे म्हटले आणि अनेक बदल करण्याची मागणी केली. परंतु मंत्रिमंडळाने गृह विभागाला कर्नाटक राज्य क्रिकेट असोसिएशन आणि आरसीबीला विशेष आदेश जारी करून अटी निश्चित करण्यास सांगितले आहे.



## श्रीलंका-ऑस्ट्रेलिया सामना निर्णायक

**नवी दिल्ली :** आयसीसी टी २० विश्वचषक २०२६ स्पर्धेचा थरार सुरु आहे. बी ग्रुपमधील झिंबाब्वेने कोलंबोतील आर प्रेमदासा स्टेडियममध्ये झालेल्या या सामन्यात कांगारुंना झटपट आणि ठराविक अंतराने झटके देत १९.३ ओव्हरमध्ये १४६ रन्सवर रोखत हा सामना जिंकला. श्रीलंका-ऑस्ट्रेलिया सामन्याच्या निकालानंतर अधिक स्पष्ट होणार आहे. श्रीलंका विरुद्ध ऑस्ट्रेलिया यांच्यातील सामना १६ फेब्रुवारीला होणार आहे. दोन्ही संघांचा हा तिसरा सामना असणार आहे. श्रीलंकेने दोन्ही सामने जिंकलेत. तर ऑस्ट्रेलियाने २ पैकी १ सामना जिंकला आहे. त्यामुळे श्रीलंकेने सोमवारी कांगारुंना पराभूत केले तर ते सुपर ८ मध्ये पोहचतील.

## लोकमान्य शिक्षण संस्थेला जेतेपद

| मुंबई | प्रतिनिधी |

चेंबूरच्या लोकमान्य शिक्षण संस्थेने सचिन्द्र आयरे फाऊंडेशनच्या विद्यमाने शालेय विद्यार्थ्यकारिता आयोजित केलेल्या कबड्डी स्पर्धेचे जेतेपद मिळविले. लोकमान्य शिक्षण संस्थेचा रजाक खान स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू म्हणून गौरविण्यात आले. लालबाग, गॅस कंपनी लेन येथील बिंदूमाधव ठाकरे मनोरंजन मैदान येथे झालेल्या अंतिम सामन्यात लोकमान्य शिक्षण संस्थेने गिरगांवच्या मारवाडी हायस्कूलचा ५८-३५ असा पाडाव करीत विद्यार्थी चषक व रोख रु. दोन हजार आपल्या नावे केले. उपविजेत्या मारवाडी हायस्कूल संघाला चषक व रोख रु. एक हजार पाचशेवर समाधान मानावे लागले.



लोकमान्यने आक्रमक सुरुवात करीत ५ व्या मिनिटाला लोण देत १२-०६ अशी आघाडी घेतली. पुन्हा अकराव्या मिनिटाला दुसरा लोण देत आपली आघाडी २७-१५ अशी वाढविली. पण विश्रांती पूर्वी मारवाडी हायस्कूलने लोणची परतफेड करीत ही आघाडी २५-३० अशी आघाडी कमी केली. मध्यंतराला ३१-२५ अशी लोकमान्य संघाकडे आघाडी होती. विश्रांती नंतर पुन्हा आक्रमकते वर भर देत आणखी २ लोण देत सामना सहज आपल्या बाजूने झुकविला. रजाकचा अष्टपैलू खेळ त्याला यश व अरुण यांची मिळालेली चढाई व पकडीची साथ यामुळे लोकमान्यने हा विजय मिळविला. मारवाडी हायस्कूलच्या सचिन तिवारी यांने एकाकी लढत दिली. या अगोदर झालेल्या उपांत्या सामन्यात लोकमान्यने कुर्ल्याच्या विनोबा भावेचा ६२-६० असा पराभव केला. तर मारवाडी हायस्कूल विरुद्ध संघ अनुपस्थित राहिला. लोकमान्यच्या अरुण जावळे व मारवाडीच्या सचिन तिवारी यांची स्पर्धेतील उत्कृष्ट पकड व चढाईचे खेळाडू म्हणून निवड करण्यात आली. त्यांना देखील मेडल देऊन सन्मानित करण्यात आले. तारक राऊळ, योगेश पवार, संध्या काळे, रविंद्र करमरकर, जीवन पैलकर, प्रकाश साळुंखे यांच्या उपस्थितीत स्पर्धेचे बक्षीस वितरण करण्यात आले. सचिन्द्र आयरे फाऊंडेशनच्या सचिन्द्र आयरे, सुरेश गोरिवले, सुरेश मोरे, अशोक लोटलीकर, हरिश्चंद्र साळुंखे, संतोष गावडे व इतर सदस्यांनी स्पर्धा यशस्वी करण्याकरिता अथक परिश्रम घेतले.

नेवल डॉक, बँक ऑफ इंडियाची विजयी सुरुवात | अजितदादा पवार क्रीडा नगरीत उत्साह

## पुरुष व महिला खो-खो स्पर्धेचा प्रारंभ

| मुंबई | प्रतिनिधी |

मुंबईतील खो-खो रसिकांसाठी पर्वणी ठरलेल्या मुंबई खो-खो संघटनेच्या मान्यतेने अमर हिंद मंडळ आयोजित उमेश शेणॉय स्मृती चषक पुरुष व महिला व्यावसायिक 'डायनॅमिक' खो-खो स्पर्धेला अजितदादा पवार क्रीडा नगरीत उत्साहपूर्ण वातावरणात धमाकेदार प्रारंभ झाला. नगरसेवक यशवंत किल्लेदार यांच्या हस्ते शोभेच्या आतिषबाजीसह चषकांचे अनावरण करण्यात आले. त्यानंतर नाणेफेक करून स्पर्धेचा अधिकृत श्रीगणेशा करण्यात आला आणि मैदानावर व्यावसायिक खो-खोचा वेगवान, चित्तथरारक आणि रोमांचक खेळ रंगू लागला. नेवल डॉक, बृहन्मुंबई महानगरपालिका, बँक ऑफ इंडिया आणि महावितरण कंपनीने विजयी सलामी दिली.या सामन्यात गंधेकर इलेक्ट्रीकल्स प्रा. लि. ने नाणेफेक जिंकून संरक्षण स्वीकारले; मात्र नेवल डॉकने २९-२२ असा ३.३५ मि. राखून ७ गुणांनी शानदार विजय मिळवला. सामन्यावर गणेश गवंडी यांनी पंच प्रमुख म्हणून जबाबदारी सांभाळली.





बृहन्मुंबई महानगरपालिकेची रिझर्व बँक ऑफ इंडिया या सामन्यात बृहन्मुंबई महानगरपालिकेने नाणेफेक जिंकून आक्रमण स्वीकारत रिझर्व बँक ऑफ इंडियाचा ३१-२८ असा ३ गुणांनी पराभव केला. बँक ऑफ इंडियाचा दत्तकृपा ट्रॅव्हल्स या सामन्यात दत्तकृपा ट्रॅव्हल्सने नाणेफेक जिंकून आक्रमण स्वीकारले; मात्र बँक ऑफ इंडियाने २२-१४ असा ६.३० मि. राखून ८ गुणांनी विजय मिळवला. या सामन्यावर विराज कोठमकर यांनी पंच प्रमुख म्हणून जबाबदारी पार पाडली.

महावितरण कंपनीचा डी. डी. ॲडव्हर्टायझिंग या सामन्यात डी. डी. ॲडव्हर्टायझिंगने नाणेफेक जिंकून संरक्षण स्वीकारले; मात्र महावितरण कंपनीने २४-१८ असा ५.३० मि. राखून ६ गुणांनी विजय मिळवत दमदार सुरुवात केली. या सामन्यावर गणेश गवंडी यांनी पंच प्रमुख म्हणून काम पाहिले.

### स्पर्धेचा नवा अध्याय सुरू

उमेश शेणॉय स्मृती चषक स्पर्धेच्या उद्घाटनाच्या दिवसापासूनच व्यावसायिक दर्जाचा वेगवान आणि थरारक खेळ पाहायला मिळत असून, प्रत्येक संघ विजेतेपदासाठी पूर्ण ताकदीने मैदानात उतरला आहे. अजितदादा पवार क्रीडा नगरीत रंगणारी ही स्पर्धा खो-खोच्या इतिहासात नवा सुवर्णअध्याय लिहिण्याच्या दिशेने वेगाने पुढे सरकत आहे.

## निवडक



### शारदाश्रमने पटकावला आपटे करडंक

**मुंबई :** मनोरमाबाई आपटे स्मृती क्रिकेट स्पर्धेच्या १६ वर्षांखालील मुलींच्या अंतिम सामन्यात शारदाश्रम विद्यामंदिर इंग्लिश शाळेने पराग इंग्लिश शाळेवर मात करत जेतेपद पटकावले. प्रथम फलंदाजी करताना पराग इंग्लिशने २२ षटकांत ३ बाद १७३ धावा केल्या. प्रत्युत्तरात शारदाश्रमने २१.४ षटकांत २ बाद १७४ धावा करून लक्ष्य गाठले. स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ माजी क्रिकेटपटू वामन आपटे, प्रदीप सुंदरम आणि नदीम मेमन यांच्या हस्ते झाले.




### आंबोली बॉईजने कोरले जेतेपदावर नाव

**मुंबई :** अंधेरी पश्चिम गेले दोन दिवस क्रिकेटमय झाला होता. संजय कदम यांच्या पुढाकाराने आयोजित 'प्रसिद्ध कार्यसम्राट भव्य चषक २०२६' टेनिस क्रिकेट स्पर्धेत आंबोली बॉईजने बाजी मारली. त्यांनी कपासवाडी बॉईजचा पराभव करत आपले नाव जेतेपदावर कोरले. डी. एन. नगरच्या महात्मा फुले क्रीडांगणात रंगलेल्या या स्पर्धेत अंधेरी व परिसरातील तब्बल ४० संघांनी सहभाग घेतला. दोन दिवसांच्या चुरशीच्या सामन्यांनी प्रेक्षकांची उत्सुकता शिगेला पोहोचवली. अंतिम लढतीत आंबोली बॉईज यांनी अचूक फलंदाजी व शिस्तबद्ध गोलंदाजीच्या जोरावर कपासवाडी बॉईज संघावर मात करत विजेतेपद पटकावले. विजेत्या संघाला रु. ५० हजार तर उपविजेत्यांना रु. २५ हजार रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी खेळातून शिस्त आणि एकजूट निर्माण होते. त्यामुळे अंधेरीत तरुणांना प्रोत्साहन देण्यासाठी सातत्याने अशा स्पर्धा आयोजित केल्या जातील, असे आश्वासन आयोजक संजय कदम यांनी दिले. या दिमाखदार स्पर्धेच्या उद्घाटन व समारोप सोहळयास उपनेते अमोल कीर्तिकर, आमदार हारून खान, विभाग संघटिका अनिता बागवे, माजी नगरसेविका ज्योत्ना दिघे यांच्यासह स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### यूएईचा कॅनडावर थरारक विजय

**नवी दिल्ली :** कॅनडा विरुद्ध युनायटेड अरब अमिराती यांच्यातला टी-२० वर्ल्ड कप स्पर्धेतील 'ड' गटातील सामना रोमहर्षक राहिला. कॅनडाच्या १५१ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना यूएईची गाडी रुळावरून घसरली होती, परंतु आर्यांश शर्मा आणि सोहैब खान यांच्या अर्धशतकी खेळीने यूएईला थरारक विजय मिळवून दिला. त्यापूर्वी जुनैद सिद्धीकने पाच विकेट्स घेत कॅनडाला धक्के दिले होते आणि विक्रमाला गवसणी घातली. हर्ष ठाकेरने ४१ चेंडूंत २ चौकार व ३ षटकार मारून ५० धावांची खेळी केली. त्याला नवनीत धलिवाल (३४) व श्रेयस मोव्वा (२१) यांची साथ मिळाली आणि कॅनडाने ७ बाद १५० धावांपर्यंत मजल मारली. जलदगती गोलंदाज जुनैदने ३५ धावांत ५ विकेट्स घेतल्या आणि वर्ल्ड कपमध्ये पाच विकेट्स घेणारा तो यूएईचा पहिला गोलंदाज ठरला. यापूर्वी मैयप्पना कार्तिक याने यूएईसाठी १९ धावांत ३ विकेट्स घेऊन सर्वोत्तम गोलंदाजी केली होती. टी-२० विश्वचषकात पाच विकेट्स घेणारा तो दुसरा संलग्न देशाचा गोलंदाज ठरला. यापूर्वी नेदरलँड्सच्या अहसान मलिकने दक्षिण आफ्रिकेविरुद्ध १९ धावांत ५ बळी टिपले होते. लक्ष्याचा पाठलाग करताना यूएईने ६६ धावांत ४ विकेट्स गमावल्या होत्या. साद बिन जाफरने तीन विकेट्स घेतल्या. पण, आर्यांश शर्मा व सोहैब खान यांनी पाचव्या विकेटसाठी ९४ धावांची भागीदारी केली. शेवटच्या दोन षटकांत यूएईला विजयासाठी १२ चेंडूंत २६ धावांची गरज होती. कलीम सनाने १९ व्या षटकात १८ धावा दिल्या आणि सामन्याला कलाटणी मिळाली. शर्माने पहिल्या ४ चेंडूंत ११ धावा जोडल्या आणि त्यानंतर खानने ७ धावा जोडल्या. २० व्या षटकाच्या पहिल्याच चेंडूवर षटकार खेचून शर्माने यूएईचा विजय पक्का केला. विजयासाठी एक धाव हवी असताना खान बाद झाला. त्याने २९ चेंडूंत ४ चौकार व ४ षटकारासह ५१ धावांची खेळी केली. जस्करन सिंगने विजयी धाव घेतली. आर्यांश ५३ चेंडूंत ६ चौकार व ३ षटकारांसह ७४ धावांवर नाबाद राहिला.

### रियान परागची कर्णधारपदी नियुक्ती

**नवी दिल्ली :** संजू सॅमसनने चेन्नई सुपर किंग्जकडून खेळण्याचा निर्णय घेतल्यानंतर इंडियन प्रीमिअर लीग २०२६ मध्ये राजस्थान रॉयल्सचा कर्णधार कोण? हा सर्वांना पडलेला प्रश्न पडला होता. अखेर त्यांच्या नव्या कर्णधारची घोषणा केली. या शर्यतीत भारताचा ओपनर यशस्वी जैस्वाल हाही होता, परंतु रियान परागची रॉयल्सचा कर्णधार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. २०१९ मध्ये आयपीएलमध्ये पदार्पण करणारा रियान



ागील सात पर्वात राजस्थानकडूनच ळतोय. गेल्या वर्षी सॅमसन खापतीमुळे बाहेर पडला तेव्हा, यानने आठ सामन्यांमध्ये संघाचे तृत्व केले होते. त्यात त्याला दोन वजय आणि सहा पराभव पत्करावे ागले. मागील पर्वात राजस्थान नवव्या स्थानावर राहिला होता. कर्णधार म्हणून रियान पराग अपयशी ठरला असला तरी त्याने फलंदाजीने प्रभावित केले. त्याने त्या ८ सामन्यांत ३८.५७ च्या सरासरीने धावा केल्या, ज्यामध्ये ईडन गार्डन्सवर कोलकाता नाईट रायडर्सविरुद्ध कारकिर्दीतील सर्वोत्तम ९५ धावांचा समावेश आहे. रियानने ८४ आयपीएल सामन्यांमध्ये खेळले आहे, ज्यामध्ये त्याने १४१.८४ च्या स्ट्राईक रेटने १५६६ धावा केल्या आहेत. २०२४ मध्ये त्याने १४९.२१ च्या स्ट्राईक रेटने ५७३ धावा केल्या होत्या.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)